यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# वार्तापत्र

१२ मार्च २०१४

मा. यशवंतराव चव्हाण यांची १०१ वी जयंती





मा. झुबिन मेहता

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार - २०१३


यशवंतराव चव्हाण
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई पुरस्कृत
न्यायमूर्ती वायू. व्ही. चंद्रचूड पारितोषिक
मा. श्री. गोविंदराव तळवलकर
यांना यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य-संस्कृती / कला-क्रीडा
राज्यस्तरीय पारितोषिक २०१३
यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१३
मा. शरद पवार

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम.एम.एच./बी.ओ.एम.-५३९/८५

यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९८, २२८५२०८१, २२०४५४६० • फॅक्स : २२८५२०८१/८२


## ⁘ विश्वस्त मंडळ सदस्य ⁘

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरूण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श.गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ७. | मा. प्रा. पी. बी. पाटील | |
| ८. | मा. श्री. राम प्रधान | |
| ९. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| १०. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | |
| ११. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| १२. | मा. श्री. अजित निंबाळकर | |
| १३. | मा. श्री. अमित डहाणूकर | |
| १४. | मा. श्री. समीर दलवाई | |
| १५. | मा. श्री. ना. धो. महानोर | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर
आयुक्त विक्रीकर विभाग

## ⁘ कार्यकारिणी मंडळ सदस्य ⁘

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरूण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श.गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. रा. सु. गवई
१०. मा. श्री. विनायकराव पाटील
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री. जीवनराव गोरे
१४. मा. श्री. विजय शिर्के
१५. मा. श्री. जयराज साळगांवकर
१६. मा. श्री. अप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील
१७. मा. श्री. अंकुशराव टोपे
१८. मा. श्री. शामराव पा. पाटील
१९. मा. श्री. यशवंतराव गडाख - पाटील
२०. मा. श्री. चंद्रकांत घुले - पाटील
२१. मा. अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)
महाराष्ट्र शासन प्रतिनिधी
२२. मा. श्री. नितीन करीर
आयुक्त विक्रीकर विभाग

## ⁘ कार्यकारी समिती ⁘

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरूण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श.गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. अजित निबांळकर
७. मा. श्री. जीवनराव गोरे
८. मा. श्री. यशवंतराव गडाख

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## विभागीय केंद्रे

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. जयंत पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | श्री. रा. सु. गवई |

## विविध उपक्रम

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| अपंग हक्क विकास मंच | समन्वयक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजक | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी | श्री. अनिल पाझारे |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर - श्री. सुशील गुप्तन |
| | मुख्य विपणन अधिकारी | श्री. विक्रम वासुदेव |

## मुख्य कार्यालय

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | प्रमुख लेखाधिकारी | श्री. महेश चव्हाण |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस |
| सांविधिक लेखा परीक्षक | | मे.सी.व्ही.के. असोसिएटस, मुंबई |
| अंतर्गत हिशोब तपासनीस | | मे. वैशंपायन आणि पाध्ये, चार्टर्ड अकाउन्टंट |

Website : www.ybchavanpratishthan.org E-mail: ybchavan@vsnl.com

## संपादकीय

मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वार्तापत्राचा हा अंक तुमच्या हाती देत आहे. यशवंतराव चव्हाण साहेबांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवून त्यांच्या स्वप्नातील महाराष्ट्राच्या निर्मितीकरिता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नेहमीच कार्यरत आहे.

यशवंतराव चव्हाण साहेबांचा जीवनपट उलगडून दाखवणाऱ्या ज्या चित्रपटाची आपण सर्वजण वाट पाहत होतो तो 'यशवंतराव चव्हाण – बखर एका वादळाची' चित्रपट लवकरच प्रदर्शित होत आहे. जब्बार पटेलांसारखे संवेदनशील दिग्दर्शक आणि त्यांच्या सोबतच्या कुशल तंत्रज्ञ आणि अभिनेत्यांच्या चमूकडून एक उत्कृष्ट कलाकृती सादर होईल याबद्दल मला विश्वास वाटतो. यशवंतराव चव्हाण साहेबांचे जिवन मुळात अत्यंत प्रेरणादायी आहे. आपल्या सुदैवाने त्यांनी स्वतः अत्यंत ओघवत्या भाषेत लेखन करून आपल्या आयुष्यातील प्रसंग आणि विचार आपल्या समोर मांडले आहेत. चित्रपटासारख्या एका जीवंत माध्यमातून यशवंतरावांचे जिवन आणि विचार अधिक लोकांपर्यंत पोहचतील याची मला खात्री वाटते. या चित्रपटाच्या निर्मितीदरम्यान महाराष्ट्र शासनाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानला केलेल्या सहकार्याबद्दल मी हार्दीक आभारी आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्रातर्फे सातत्याने यशस्वीरित्या चालविलेले कार्यक्रम इतर विभागांमार्फत घेण्यात यावेत याकरिता लोकसंवाद, चित्रपट चावडी, शिक्षण कट्टा आणि सृजन असे उपक्रम अनेक विभागांमध्ये नियमितपणे सुरू झाले आहेत. या उपक्रमांद्वारे शैक्षणिक, सामाजिक आणि कलेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अनेक व्यक्तिंपर्यंत पोहचण्यात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानला यश मिळाले आहे.

देशभरामध्ये १५ व्या लोकसभेच्या निवडणूका नुकत्याच जाहीर झाल्या. लोकशाही भारतात रुजावी म्हणून सतत प्रयत्नशील असलेल्या नेतृत्वामध्ये यशवंतराव चव्हाण साहेबांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. लोकशाही समाजाच्या जडणघडणीमध्ये निवडणूक प्रक्रियेचे महत्व अनन्य साधारण आहे. चव्हाण साहेबांनी आपल्या पहिल्या निवडणूकांचे अनुभव, त्या वेळचे भारावलेपण योग्य शब्दांमध्ये मांडले आहे. त्यांच्या लेखाचा वार्तापत्रामध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यांचे लोकशाही आणि प्रशासनाबद्दलचे विचार नेहमीच आपल्याला मार्गदर्शक ठरले आहेत. त्याच प्रमाणे त्यांनी निवडणूक प्रक्रियेचे केलेले समर्पक वर्णन आणि त्यावरील तत्वचिंतन देखील आपल्याला मार्गदर्शन करीत राहतील.

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्काराकरिता मा. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने ज्येष्ठ संगितकार मा. झुबिन मेहता यांची निवड केली आहे. मा. झुबिन मेहता यांनी संगिताच्या क्षेत्रामध्ये भारताचे नाव जगभरात पोहचवले. मुंबईतील त्यांच्या शाळेमध्ये वर्गातील ४० विद्यार्थ्यांमध्ये ५ ते ७ धर्मांचे विद्यार्थी होते. त्यांचे असे मत आहे की, ''ह्या शाळेत गेल्यामुळे भारताच्या सर्वधर्म समभाव हया तत्वाविषयी अत्यंत आदर निर्माण झाला. तसेच इतर धर्मांचा आदर करण्याची भावना निर्माण झाली. मला दोन तासांकरिता जरी लोकांना शत्रुत्व किंवा त्यांच्यातील वैमनस्य विसरायला लावता येणार असेल, तर मला असे वाटेल की मी खरच आयुष्यात काहीतरी करू शकलो.'' असं म्हणणारे मा. झुबिन मेहता म्हणजे खरोखर विश्वशांतीदूत होत. त्यांनी या पुरस्काराचा स्विकार केला याचा आम्हाला आनंद होत आहे.

मागील महिन्यात मा. प्राचार्य डॉ. पी.बी.पाटील यांच्या निधनाची दुःखद बातमी कळली. शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रामध्ये प्रा. पी. बी. पाटील यांचे कार्य उल्लेखनीय आहे. पंचायतराज अंतर्गत लोकसहभागाच्या माध्यमातून महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामाची दिशा ठरवण्यामध्ये त्यानी ऐतिहासिक कार्य केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई च्या स्थापनेत त्यांचा महत्वाचा सहभाग होता. प्रतिष्ठानचे पहिले सरचिटणीस म्हणून त्यांनी या संस्थेच्या कार्यास दिशा दिली व संस्थेस नावलौकिक मिळवून दिला. त्यांच्या जाण्याने मी आणि प्रतिष्ठानने एक ज्येष्ठ सहकारी आणि मार्गदर्शक व्यक्तीमत्व गमावले आहे.

चव्हाण साहेबांच्या विचारांनी प्रेरीत झालेल्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या गावागावांतील कार्यकर्त्यांमुळे प्रतिष्ठानचे कार्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचत आहे याचा आम्हाला अभिमान आहे. प्रतिष्ठानचे कार्य असेच उत्तरोत्तर वाढत जावो हीच सदिच्छा !

सुप्रिया सुळे

मानद संपादक

# वार्तापत्र

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**

वर्ष : १८वे ◆ अंक : ३३वा ◆ प्रकाशन : १२ मार्च २०१४ मा. यशवंतराव चव्हाण यांची १०१वी जयंती

◆
सल्लागार
**मा. शरद काळे**
**मा. हेमंत टकले**

◆
मानद संपादक
**सुप्रिया सुळे**

◆
कार्यकारी संपादक
**दत्ता बाळसराफ**

◆
सह-संपादक
**सुरेश पाटील**

◆
विशेष सहाय्य
**निलेश पुराडकर**
**अनिल पाझारे**
**माधव सूर्यवंशी**
**वैभव भाष्टे**
**रमेश मोरे,**
**विजय कसबे**
**उमाकांत जगदाळे**

◆
सहाय्यक
**मीनल सावंत**

◆
**केंद्रातील सहकारी :**
संजय बनसोडे, अरूण शिंदे, विद्याधर खंडे, संगीता गवारे, स्मिता रायकर, महेश चौधरी, यतीन घोडेकर, राजेंद्र रूपवते, शोभा लोंढे, अनिल चिंदरकर, सुहास बाभल, प्रियंका देसाई, विजय नागरे, जयेश गुजराथी, विश्वदत्त मुळे, सुरेश कोठावळे, महादेव सगरे, सुरेश सावंत, अशोक जाधव, प्रकाश आंबेरकर, मंगेश शिंदे, सतिश लाड यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

## अनुक्रम...

- लोकमताचा कौल आणि त्याचा अर्थ - मा. यशवंतराव चव्हाण ..... ५
- पहिली निवडणूक - मा. यशवंतराव चव्हाण ..... ७
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार-२०१३, मा. झुबिन मेहता, सन्मानपत्र ..... १०
- नवमहाराष्ट्र युवा अभियान ..... १२
- अपंग हक्क विकास मंच ..... १६
- शिक्षण विकास मंच ..... २०
- सृजन ..... २३
- वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान ..... २४
- कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम ..... २६
- महाराष्ट्र महिला व्यासपीठ ..... ३०
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय ..... ३१

**विभागीय केंद्र कार्यवृत्त**

- विभागीय केंद्र, कोकण ..... ३५
- विभागीय केंद्र, औरंगाबाद ..... ३९
- विभागीय केंद्र, पुणे ..... ४३
- विभागीय केंद्र, नागपूर ..... ४६
- विभागीय केंद्र, कऱ्हाड ..... ५१
- विभागीय केंद्र, नाशिक ..... ५३
- विभागीय केंद्र, लातूर ..... ६५
- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ..... ६८

मुखपृष्ठ व मलपृष्ठ रचना : इंडियन मॅजिक आय प्रा. लि. पुणे, अक्षरजुळणी आणि छपाई : हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-कार्यकारी संपादक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, नाईन स्क्वेअर प्रिंटस् (इंडिया) प्रायव्हेट लि., २४ बी, राजा बहादूर कपाऊंड, अंबालाल दोशी मार्ग, १०३, तळ मजला, फोर्ट, मुंबई - २३ , दूरध्वनी :- ४०७८५६५६ येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई-४०० ०२१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्रं. ७१५८७/९९.

# लोकमताचा कौल आणि त्याचा अर्थ

**- स्व. यशवंतराव चव्हाण**

काँग्रेसने आपल्या स्थापनेपासून राष्ट्राच्या जीवनामध्ये ऐतिहासिक भूमिका बजावली आहे. काँग्रेसने देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व तर केलेच आहे, शिवाय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तीस वर्षे देशाला स्थिर आणि प्रागतिक शासन दिले. या कालावधीत तिने लागोपाठ पाच सार्वत्रिक निवडणुका जिंकल्या. लोकांनी वेळोवेळी व्यक्त केलेल्या या विश्वासामुळे काँग्रेसने देशाची अनेकविध क्षेत्रांमध्ये प्रगती घडवून आणली.

नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मात्र प्रथमच काँग्रेसला लोकसभेतील बहुमत गमवावे लागले. काही राज्यांमध्ये काँग्रेसला घवघवीत यश मिळाले असले, तरी बऱ्याच राज्यांतील मतदारांनी काँग्रेसऐवजी नवोदित जनता पक्षाला यशस्वी केले. लोकमताचा हा कौल आम्ही मानतो आणि नव्या सरकारला आणि पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांना सुयश चिंतितो. नुकत्याच झालेल्या निवडणुकीने पुन्हा एकदा भारतीय लोकशाहीच्या आंतरिक सामर्थ्याचे दर्शन घडविले आहे. भारतीय जनतेने कमालीची राजकीय प्रगल्भता आणि सुज्ञता दाखवली, याचा साऱ्या देशाला अभिमान वाटतो. कोणता पक्ष यशस्वी वा पराभूत झाला, हे या संदर्भात महत्त्वाचे नाही.

लोकमताच्या ताज्या कौलावरून केवल काँग्रेसनेच नव्हे, तर साऱ्या देशाने योग्य बोध घेतला पाहिजे. राष्ट्रीय एकता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि लोकशाही यांचा काँग्रेसने नेहमीच पुरस्कार केलेला आहे. लोकमताचा कौल या मूलभूत तत्त्वांच्या विरुद्ध गेलेला आहे काय? शतकानुशतकांचे आर्थिक दारिद्र्य, सामाजिक कुचंबणा आणि सास्कृतिक ऱ्हास यांच्या गर्तेतून देशाला बाहेर काढून लोकांच्या जीवनाची गुणवत्ता वाढवण्यासाठी नियोजनबध्द विकास आवश्यक आहे, असे काँग्रेस मानते. लोकमताचा कौल या भूमिकेविरुद्ध आहे काय? उद्योधंद्यांचा द्रुतगतीने विकास करून आर्थिक जीवनाच्या अधिकाधिक क्षेत्रांत देश स्वयंपूर्ण व्हावा हे काँग्रेसचे धोरण आहे. गेल्या ३१ मार्च रोजी संपलेल्या वर्षामध्ये देशांतील पोलाद कारखान्यांनी उत्पादनाचा नवा विक्रम प्रस्थापित केला, हे या धोरणाचेच निर्देशक आहे. लोकमत याविरुद्ध गेले काय? देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विशेषतः ८० टक्के भारतीय जेथे राहतात, त्या ग्रामीण भागाच्या समन्वित विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा उपयोग करून घेतला पाहिजे, असेही काँग्रेसचे धोरण आहे. गेल्या वर्षात आपल्या शेतकऱ्यांनी अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन केले आहे. सुयोग्य नियोजनामुळेच देशात ही हरीत क्रांती घडून आली. ती लोकांना मान्य नाही काय? अलिप्तावाद, आफ्रिकी देशांच्या मुक्तिलढ्यांना पाठिंबा, अरब लोकांच्या न्याय्य मागण्यांचा पुरस्कार आणि शेजारी देशांबरोबर मैत्रीचे संबंध ही काँग्रेस सरकारच्या पराराष्ट्रीय धोरणाची सूत्रे होती. लोकांनी त्याविरुद्ध मतप्रदर्शन केले काय?

या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी आहेत, हे मला स्पष्टपणे सांगीतलेच पाहिजे. काँग्रेसची मूलभूत धोरणे किंवा तिने घडवून आणलेली प्रगती यांविरुद्ध लोकांनी कौल दिलेला नाही. यांपैकी काही धोरणांची आणीबाणीमध्ये जी अतिरेकी आणि कठोर अंमलबजावणी झाली, तिच्याविरुद्ध लोक संतापले, हे खरे आहे, अधिकाराचा हा असा गैरवापर ही मी राष्ट्रीय शोकांतिका मानतो. या अनुभवापासून काँग्रेसला मोठाच धडा मिळाला आहे. लोकहितकारी धोरणे आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांत अंतर पडले की, काय घडते, हे यावरून कळून आले. दीर्घकालीन राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला कुटुंबनियोजनाचा कार्यक्रमही काही राज्यांमध्ये अशा रितीने हाताळण्यात आला की, त्यामुळे तेथे संतापाची लाट उसळली. आणीबाणीचे आणि निवडणुकीचे धडे काँग्रेस शिकली आहे, असे मी देशाला आश्वासन देतो; परंतु त्याचबरोबर मला असेही सांगायचे आहे की, या एका विशिष्ट घटनेमुळे, काँग्रेसने जी प्रदीर्घ देशसेवा केली आहे, तिचे विस्मरण होता कामा नये.

भारत हा विशाल आणि वैविध्यपूर्ण देश आहे आणि

त्यामुळे त्याचे शासन सांभाळणे ही सोपी गोष्ट नाही. हे कार्य नव्या सरकारने स्वीकारले आहे.

श्री. मोरारजी देसाई यांच्यासारख्या स्वातंत्र्यसंग्रामातील नेत्याने आणि काँग्रेसच्या राज्य व केंद्र शासनामधील महत्त्वाची अधिकारपदे सांभाळलेल्या प्रशासकाने या नव्या सरकारचे धुरीणत्व अंगीकारले आहे. राष्ट्रउभारणीच्या कार्यामध्ये आमचा पक्ष नव्या सरकारशी सहकार्य करील, असे मी त्यांना आश्वासन देतो. नवे सरकार आमच्या सहकार्याचा आदर करील, अशी मला आशा आहे.

राज्यकारभार करताना नकारात्मक दृष्टिकोण उपयुक्त ठरणार नाही, असे मला आग्रहाने सांगावेसे वाटते. म्हणून सूडबुध्दीने वागयाचा मोह कटाक्षाने टाळला पाहिजे. आपण सर्वचजण लोकशाही मूल्ये मानतो. म्हणून भूतकाळात जे प्रमाद घडले असतील, हे विसरून जाऊन परस्परसहकार्याने पुढील वाटचाल केली पाहिजे. गेल्या काही वर्षांमध्ये देशात जो कडवटपणा निर्माण झाला, तेवढा तो बस्स झाला, असे मानून विशाल राष्ट्रीय सामंजस्याचा मार्ग चोखाळू या. तसे झाले, तरच आपल्या या प्रिय मातृभूमीचा आपण सर्व क्षेत्रांमध्ये विकास घडवून आणू शकू. तसेच आपल्या सर्व देशबांधवांना सामाजिक मुक्तता, आर्थिक प्रगती आणि बौद्धिक नि आध्यात्मिक विकास यांचा लाभ करून देता येईल.

–'भूमिका'
या ग्रंथातून साभार

❑❑❑



# पहिली निवडणूक

**- स्व. यशवंतराव चव्हाण**

निवडणुकीचा दौर संपला. महाराष्ट्राच्या सगळ्या जिल्ह्यांतून मी जाऊन आलो होतो. आता माझे मतदानही झाले होते. एका झंझावाती कालखंडातील दुसऱ्या पर्वाकडे आता लक्ष लागले होते. दिल्लीच्या वाटेवर साताऱ्याहून पुण्याकडे गाडी धावत होती. मनात अनेक विचारांची गर्दी होती. मधूनच झालेल्या सभा आठवत होत्या. मधूनच एखादा मतदार-संघ मनचक्षूंसमोर सरकून जात होता; आमच्या उमेदवाराचे पारडे जड आहे, हा कार्यकर्त्यांचा दिलासा सुखकारक वाटत होता, पण तेवढ्यात विरोधी पक्षांच्या इशाऱ्याचीही आठवण होत होती; आणि याच आठवणीत अधूनमधून एखादी जुनी निवडणूक मोहीम डोळ्यांपुढून सरकत जात होती. मोटारीतून रस्त्याच्या कडेची झाडे वेगाने मागे पळत होती आणि माझे मनही तसेच वेगाने वर्षेच्यावर्षे मागे टाकून भूतकाळात खेचले गेले होते आणि सातारा जिल्हा काँग्रेसच्या एका तरुण विद्यार्थी कार्यकर्त्याच्या रूपात काळाच्या त्या दर्पणपटात माझे मलाच दर्शन होऊ लागले होते.

या निवडणूक-प्रकरणाशी माझा संबंध प्रथम केव्हा आला बरे? १९३७ सालावर माझे लक्ष एकदम स्थिरावले. होय, निवडणुकांशी आज जितका माझा जिव्हाळ्याचा संबंध आहे, जेवढी जबाबदारी आहे, तेवढाच संबंध आणि जबाबदारी, आमच्या जिल्ह्यापुरता विचार केला, तर माझ्याकडे तेव्हाही होती. सातारा जिल्हा काँग्रेसचा मी एक कार्यकर्ता होतो आणि जिल्ह्याच्या राजकारणात मनापासून लक्ष घालू लागलो होतो स्वातंत्र्य-आंदोलनात भाग घेतला होता, तो देशभक्तीच्या प्रेरणेने; पण तरुंगात वाचनाने, चिंतनाने स्वातंत्र्याच्या आशासंबंधीची विचारचक्रे सुरू झाली. होती.

आर्थिक व सामाजिक क्रांतीची स्वातंत्र्य-आंदोलनाला जोड मिळाली पाहिजे, या काँग्रेसमधील प्रवाहात मनाने मी गुंतलो गेलो होतो आणि तेवढ्यातच १९३७ च्या निवडणुका लढविण्याचे काँग्रेसने जाहीर केले होते.

सातारा जिल्हा काँग्रेसच्या छोट्या संसारात काँग्रेस हायकमांडच्या या निर्णयाने खळबळ उडून गेली होती. कोणाला तिकीट मिळणार? या जिल्ह्याचे प्रतिनिधित्व कोण करणार? आमच्या आपापसांतील चर्चा सुरू झाल्या होत्या आणि तरुण पिढीचे प्रतिनिधी म्हणून आत्माराम पाटील यांनी निवडणूक लढवावी, असे आमच्या मनाने घेतले आणि आम्ही त्यांच्या नावाचा धोशा जिल्हा काँग्रेसच्या नेत्यांकडे लावला. मला तेव्हाचे आमचे वादविवाद, साताऱ्याला होणाऱ्या आमच्या फेऱ्या आता अगदी स्पष्ट आठवताहेत. आत्माराम पाटलांच्या नावाला जिल्ह्याच्या काही नेत्यांनी केवढा विरोध केला होता. आमच्या जिल्ह्यातील बहुजनसमाज ब्राह्मणेतर चळवळीच्या पकडीतून सुटून काँग्रेसमध्ये आला होता खरा, पण अजून तो घरात रुळायचा होता. कौन्सिलची ती जागा म्हणजे मोठी प्रतिष्ठेची जागा मानली जात होती आणि त्यासाठी आत्माराम पाटील यांचे नाव आमच्या नेत्यांना भावत नव्हेत. ज्या जागेवर रावबहादूर काळे बसले, त्या जागेवर आत्माराम पाटील बसणार, ही कल्पनाच त्यांना सहन होत नव्हती आणि आत्माराम पाटील यांचे नाव त्यांनी जवळजवळ निकाली काढले होते. जिल्ह्याच्या निर्णयावर प्रदेश काँग्रेसनेही शिक्कामोर्तब केल्यासारखे होते. पुण्याची आमची फेरी जवळजवळ वाया गेली होती. शंकरराव देवांकडे केलेल्या वकिलीची डाळ शिजली नव्हती. पण आत्माराम पाटलांच्या उमेदवारीसाठी आम्ही तरुण पोरांनी कंबर कसली होती.

आज मला आमच्या तेव्हाच्या त्या जिद्दीचे केव्हा केव्हा हसू येते. क्वचित कौतुकही वाटते. शंकरराव देवांचा नकार घेऊन साताऱ्याला परतायचे नाही, असे मी ठरविले होते. मी पुण्याहून मुंबईला आलो. आत्माराम पाटलांचे तिकीट जिंकून आणायचे, अशा निर्धाराने मी सरदार पटेलांचे घर गाठले. मरीन लाईन्सवरील आपल्या चिरंजीवांच्या घरी सरदार तेव्हा राहत होते. माझी आणि त्यांची ओळख नव्हती, म्हणजे व्यक्तिगत ओळख नव्हती. काँग्रेस हायकमांडचे एक जबरदस्त नेते म्हणून मी त्यांना ओळखत होतो; पण मला त्यांनी ओळखावे, असा माझा संबंध केव्हा आला नव्हाता. सकाळी मुंबईत उतरल्यावर थेट सरदार पटेलांच्या घरीच मी दाखल झालो.

'मी यशवंत चव्हाण, सातारा काँग्रेसचा कार्यकर्ता...' माझा मीच सरदारांना परिचय करून दिला आणि आत्माराम पाटील यांच्या तिकिटाचे सारे प्रकरण त्यांच्या कानांवर घातले.

सातारा काँग्रेसच्या तरुण कार्यकर्त्यांचा आग्रह त्यांना सांगितला. वल्लभभाईंशी मी जवळजवळ अर्धा-पाऊण तास तरी बोलत होतो. त्यांनी माझे सगळे बोलणे ऐकून घेतले.

सरदारांना भेटून मी लगेच सातारला परतलो आणि पाठोपाठ आत्माराम पाटील यांना तिकीट मिळाल्याची बातमीही आली. सरदारांनी प्रदेश काँग्रेसला सांगितले की, प्रदेश काँग्रेसने आपणहून निर्णय घेतला, हे आम्हांला केव्हाच समजले नाही, पण आमचा आग्रह पुरा झाला होता. आमचा उमेदवार उभा राहणार होता. त्याचा आनंद मात्र वर्णनातीत होता.

एकदा आत्माराम पाटील उभे राहिल्यानंतर त्यांच्यासाठी प्रयत्न करण्यात आम्ही कसूर करणे शक्यच नव्हते. निवडणुकीने आम्ही पुरते झपाटलो होतो. एकीकडे ब्राह्मणेतर चळवळीचे खरे उमेदवार, दुसरीकडे लोकशाही स्वराज्य पक्षाचे प्रतिष्ठित उमेदवार यांच्याशी आमचा मुकाबला होता आणि आम्ही शर्थीने ती लढाई लढविली. माझ्या मंतरलेल्या काही दिवसांत त्या मोहिमेचा काळ नक्कीच समाविष्ट करावा लागेल. दिवस-रात्र निवडणूक-प्रचाराचे व्यवधान असे. मी सायकलवर बसत असे, यावर आज कोणी कदाचित विश्वासही ठेवणार नाही. पण १९३७ च्या निवडणूक-मोहिमेत मी निम्मा जिल्हा तरी सायकलवरून हिंडलो असेन. बहुतेक वेळा सोबतीला जोडीदार कार्यकर्तेही सायकलवर असत. गप्पा मारत मारत एका गावाहून दुसऱ्या गावाला जावे. अनेक वेळा मी एकटाही गेलो होतो. तिथे गावकऱ्यांना जमवावे, ओळखीपाळखी करून घ्याव्यात, काँग्रेसचे ध्येयधोरण समजून सांगावे, असा आमचा कार्यक्रम असे. मध्यरात्रीपर्यंत आमच्या छोट्या छोट्या सभा चालू असत. लाऊडस्पीकर, कलापथके इत्यादींच्या वापराचा जमाना अजून यायचा होता. प्रौढ-मतदान नसल्याने तेव्हा मतदारही मर्यादित असत. गावातून तेवढी जागृतीही नसायची आणि त्यातून प्रतिष्ठितांच्या शब्दाबाहेर बोलण्या-वागण्याची बंडखोरी गावकऱ्यांत आलेली नव्हती. आम्हांला या सगळ्या अडथळ्यांतून मार्ग काढावा लागला. काँग्रसचे स्वातंत्र्य-आंदोलन, सत्याग्रहाच्या चळवळी यांचे कुतूहल होते; ते तर आम्ही सांगतच होतो, पण स्वराज्य मिळाल्यावर शेतकरी कसा सुखी होईल, याची चित्रे आम्ही रंगवत होतो. 'सावकारी पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता' ही आमची घोषणा तेव्हा जास्त कुतूहलाची झाली.

निवडणुका संपल्या. आत्माराम पाटील विजयी झाले. त्यांना आम्ही एवढी मते मिळवून दिली की, त्यांची मते हा तेव्हाच्या मुंबई राज्यातील उच्चांक ठरला होता. आमच्या खटपटीला यशच आले होते, असे नाही, तर सगळी खटपट सार्थकी लागली होती. ती माझी पहिली निवडणूक-मोहीम होती.

या निवडणुकीनंतर तब्बल नऊ वर्षे लोटली. मध्यंतरीच्या काळात स्वातंत्र्ययुध्दातील अखेरची लढाई लढली गेली होती. बेचाळीसच्या क्रांतियुद्धातील आम्ही सैनिक त्या युद्धाच्या ज्वालांतून तावून सुलाखून बाहेर पडलो होतो. तुरुंगातून सुटका झालेली होती. दिल्लीत वाटाघाटींची गुऱ्हाळे चालू होती. एकीकडे पुन्हा एकदा अखेरचा संग्राम करावा लागणार, अशी हवा होती. दुसरीकडे सत्तांतराची तयारी सुरू होती. आंदोलन थंडावले होते. वातावरण अनिश्चित होते. तेवढ्यातच १९४६ च्या निवडणुकीच्या नौबती झडू लागल्या होत्या.

खरे म्हणजे, या वेळी माझा मूड एकदमच वेगळा झाला होता. बेचाळीसच्या आगीत आमच्या घराची दाणादाण झाली होती. मी स्वतः तर त्यात उडी घेतली होतीच, पण माझ्यापाठोपाठ माझे बंधूही पकडले होते. या आघातांनी आमचे घर बसले होते. माझे बंधू गणपतराव तुरुंगातून सुटून आले, पण आले, ते क्षयाची बाधा घेऊन. अशा परिस्थितीत कुटुंबाची जोखीम आपण घेतली पाहिजे, आपल्यामुळे कुटुंबाचा गाडा अडला, तर त्याला थोडा चालता करणे ही आपली जबाबदारी आहे, अशा एका विचाराने मला घेरले होते. घरावर पाटी लावून मी थोडीफार वकिलीची प्रॅक्टिसही करू लागलो होतो. काँग्रेसचे काम चालू होते. पण खरे सांगायचे, तर मन थोडे वकिलीचे बस्तान बसविण्याच्या मागे होते. त्यामुळे निवडणुकीच्या नौबती झडू लागल्या, तरी मी त्यांकडे विशेष लक्ष दिले नव्हते. कोर्टकचेरीची कामे पाहावयाची, बंधूंच्या आजारपणाकडे लक्ष द्यावयाचे, असा माझा दिनक्रम चालू होता. गणपतरावांना आम्ही मिरजेच्या हॉस्पिटलमध्ये ठेवले होते. शनिवार-रविवार त्यांच्या समाचाराला, सेवाशुश्रूषेला मी मिरजेला जात असे.

अशाच एका रविवारी मिरज हॉस्पिटलमध्ये गणपतरावांच्या शेजारी मी बसलो असताना माझ्याकडे कोणी मित्र आल्याचे मला सांगण्यात आले. कालच ज्यांच्याशी गप्पा मारून मी निघालो, ते कराडचे आमचे दोस्तच आले होते आणि मी निवडणुकीला

उभे राहावे, म्हणून विनंती करायला आल्याचे ते सांगत होते. मी त्यांना अक्षरशः झटकून टाकले. मला निवडणुकीशी काही कर्तव्य नाही, मला उभे राहावयाचे नाही, तुम्ही गळ घालू नका, असे मी त्यांना वारंवार सांगत होतो आणि 'तुम्ही उभे राहिलेच पाहिजे, तुमची जोड असल्याशिवाय काँग्रेसचे पॅनेल येणार नाही', असे माझे मित्र मला पुन्हा पुन्हा ऐकवत होते. माझी मनःस्थिती, बंधूचे आजारपण सगळ्या गोष्टी मोकळ्या मनाने सांगून मी उमेदवारीला ठाम नकार दिला. पण माझ्या मित्रांचा हट्ट काही थांबेना. व्हरांड्यात आम्ही जवळजवळ तासभर वादविवाद घालत उभे होतो.

मला वाटते, माझ्या बंधूंचे या सगळ्या वादविवादाकडे खाटेवर पडल्या पडल्या लक्ष असावे. मी जेव्हा निर्वाणीच्या स्वरात नकार दिला आणि माझे मित्र जेव्हा आता निराश होऊन जाणार, असे दिसू लागले, तेव्हा गणपतरावांनी मला हाक मारली,

'यशवंतराव, जरा आत ये!'

त्यांच्या हाकेसरशी मी आत गेलो. मला वाटले, गणपतरावांना पाणी वगैरे हवे असेल; पण त्यांना हवे होते वेगळेच.

'काय म्हणताहेत मंडळी?' त्यांनी मला विचारले.

माझ्या मागोमाग आमचे मित्रमंडळही वॉर्डात त्यांच्या खाटेभोंवती आले होते आणि यशवंतरावांनी निवडणुकीला उभे राहणेच आवश्यक आहे, असे त्यांनी बंधूंना पटवून दिले होते.

शेवठी गणवतरावांनी मला थोडे जामलेच म्हणा ना. ते म्हणाले,

'अरे, आमची कसली चिंता करतोस? कुटुंबाचे दिवस, आज नाही, उद्या सुधारतील. मला विश्वास वाटतो आहे. तू मागे वळून बघू नकोस. निवडणुकीला उभा राहा. पुढले पुढे पाहता येईल. आतापर्यंत आम्ही नाही का दिवस काढले, तसेच पुढेही काढू. तू नाही म्हणू नकोस.'

रुग्णशय्येवरील माझ्या बंधूंचा उत्साह बघून मी आश्चर्यचकित झालो होतो. क्षणभर माझी मलाच लाज वाटली. मी काहीच बोललो नाही. माझे मित्र गणपतरावांच्या शब्दाने खूष झाले होते. माझ्या संमतीची त्यांना आता आवश्यकता नव्हती आणि १९३७ च्या निवडणुकीत सातारा जिल्हा काँग्रेसचा एक युवक कार्यकर्ता म्हणून काम केलेला मी १९४६ च्या निवडणुकीत एक उमेदवार म्हणून उभा राहिलो होतो.

अनेक वेळा मनात येते, कराडच्या गल्लीपासून दिल्लीपर्यंत झालेली माझी राजकीय प्रगती, मी माझा हेका चालू ठेवला असता, तर झाली असती का? माझ्या बंधूंनी जर तेव्हा मला हाक मारून उत्साह दिला नसता, तर? माझ्या आयुष्यातील अत्यंत मोक्याच्या क्षणांपैकी तो एक क्षण मी कधीच विसरू शकणार नाही.

१९४६ची निवडणूक-मोहीम म्हणजे एक विजय-मोर्चा होता. रणांगणात कोणी शत्रूच नव्हता, म्हटले तरी चालेल, आमचा 'व्हिक्टरी-मार्च' या गावाहून त्या गावाला जायचा. बेचाळीसच्या आंदोलनाची पार्श्वभूमी, सत्तांतराची शक्यता यांमुळे सर्वत्र उत्साह होताच. त्यामुळे लोक मुळी पाहावयालाच जमायचे. मी, बाबूराव गोखले, व्यंकटराव पवार व के. डी. पाटील असे आमचे पॅनेल होते. आम्ही चौघांनी मिळून एक टूरिंग ठरविलेली होती. मला आठवतेय, ती काळी 'डॉज' होती. या गाडीतून आम्ही जिल्ह्याचा दौरा केला. ही आमची गाडी मध्येच केव्हातरी बंद पडायची. मग आम्हां उमेदवारांना खाली उतरून तिला ढकलावी लागे. ती निवडणूक अवघड नव्हती. तरी गावोगाव आलेले अगत्याचे, औत्सुक्याचे अनेक प्रसंग मी अनुभवले, ते माझ्या स्मृतिपटलावर रेखीव असे कोरलेले आहेत. स्वातंत्र्याची चाहूल लागलेली ती निवडणूक होती. माझी स्वतःची ती पहिलीच निवडणूक होती. आयुष्यात सगळ्यातच पहिल्याच गोष्टीचे महत्त्व असते. राजकारणातल्या माझ्यासारख्या व्यक्तीला पहिल्या निवडणुकीचे महत्त्वही असणारच; त्या निवडणुकीपासून संसार मागे लागावा, तशा निवडणुका मागे लागल्या आहेत. एका धुंदीत, बेहोशीत या साऱ्या निवडणुका मी लढलो आहे. पण लढाई संपवून छावणीत परतताना १९३७ आणि १९४६ च्या त्या पहिल्यावहिल्या निवडणुकांच्या आठवणी मात्र मनात नेहमी रेंगाळतात.

– 'ऋणानुबंध'

या ग्रंथातून साभार

❑❑❑

# YASHWANTRAO CHAVAN NATIONAL AWARD, 2013 FOR NATIONAL INTEGRATION, DEMOCRATIC VALUES OR, SOCIAL AND ECONOMIC DEVELOPMENT IN INDIA

## CITATION

The human world is a tower of Babel. But, there is one language that can transcend the barriers. It is the universal language of love when two hearts begin to beat in one rhythm. Equally powerful is the language of music. Shakespeare called it the 'food of love'. In fact, music is so universal that it is not restricted to human expressions. The plaintive notes of the koel, usher in the spring season, and bird songs can regale the human heart with their variety. The murmur of the meandering brook and the whistling wind in a forest can soothe the emotions of man. It can express deep desires and aspirations which words cannot. Wordsworth has talked of music as :

'A presence that disturbs me with the joy
Of elevated thoughts; a sense sublime
Of something far more deeply interfused,
Whose dwelling is the light of setting suns,
And the round ocean and the living air,
And the blue sky, and in the mind of man;

Given the extraordinary power of music over the mind of man, it is not surprising that musicians who scale the peaks of excellence almost have the world at their command. Among Indian musicians whose names spring to the mind are Sitar Maestro Pandit Ravi Shankar and Mr. Zubin Mehta, the world renowned Conductor of Orchestras.

Zubin Mehta was born on 29th April, 1936 in a Parsi family in Mumbai, a son of Mehli and Tehmina Mehta. His father was a self-taught violinist and founding conductor of the Bombay Symphony Orchestra in 1935 and also the Bombay String Quartet. Mehta is an alumnus of St. Mary's School, Mumbai and St. Xavier's College, Mumbai. Mehta records in his autobiography that "I was wrapped up in and surrounded by music. Music was my daily pleasure. The records, the practice sessions of the quartet and my father playing music, all this meant no more and no less to me than a very early access to paradise. I entered this musical pleasure garden as a very young person and so far nothing and no one has managed to drive me away from it".

Mehta's family wanted him to study medicine but, Mehta soon realized that medicine was not the right choice for him. He was then sent to Vienna, which proved to be a turning point in his life. From then on, music was going to determine the rhythm of his life. He has said, "he felt like Columbus on a musical expedition". He has proudly declared that, "everything that I carry in me as a musical legacy comes from Vienna. I learnt a tremendous lot there, not only because of the excellent training that I got but also because I constantly heard everything there was to listen to". Eventually, he became a music student in Vienna at the age of 18, under Hans Swarowsky.

In 1958, Mehta made his conducting debut in Vienna. The same year he won the International Conducting Competition in Liverpool and was appointed Assistant Conductor of the Royal Liverpool Philharmonic. Mehta soon rose to the rank of Chief Conductor when he was made Music Director of the Montreal Symphony Orchestra in 1960, a post he held until 1967. At the same time, Mehta was named Music Director of the Los Angeles Philharmonic and held the post from 1962 to 1978. In 1978, Mehta became the Music Director and Principal Conductor of the New York Philharmonic and remained there until his resignation in 1991, becoming the longest holder of the post.

The Israel Philharmonic Orchestra (IPO) appointed Mehta as its Music Advisor in 1969, Music Director in 1977, and made him its Music Director for Life in 1981. He had developed a special emotional bond with Israel. In 1967, when the Six-Day war broke out, he felt compelled to be amongst the Israeli people. With difficulty he got on to a flight to Tel Aviv from Rome. Shortly before landing on a blacked out airport, a member of the crew asked him if he really knew what he had been sitting on at that time. Apparently, he had been flying in a plane, which was filled, all the way from the cockpit to the tail with neatly packed boxes of ammunition! Despite his close bond with Israel, he continued to make efforts in his own way to promote mutual understanding among the Israelis and the Arabs. As he has said "I think people should try to talk to each other instead of shooting at each other. I have the ability to communicate through music. If I can stop people from being enemies even for two hours, or if I can at least help them to forget their hostility, then I feel I have already achieved something"

Mehta conducted the prestigious Vienna New Year's Concert in the years 1990, 1995, 1998 and 2007. He has also made a recording of Indian instrumentalist Ravi Shankar's Sitar Concerto No.2, with Shankar and the London Philharmonic Orchestra.

Mehta is a firm believer in the power of music to heal and reconcile. It is in that spirit, that in June 1994, Mehta performed the Mozart Requiem along with the members of the Sarajevo Symphony Orchestra and Chorus at the ruins of Sarajevo's National Library in a fund raising concert for the victims of armed conflict and remembrance of thousands of people killed in the Yugoslav wars. In August, 1999, he conducted Mahler Symphony No.2, in the vicinity of Buchenwald concentration camp in the German city of Weimar, with both, the Bavarian State Orchestra and the Israel Philharmonic Orchestra, sitting alongside each other. On 26th December, 2005, the first anniversary of the Indian Ocean tsunami, Mehta and the Bavarian State Orchestra performed for the first time in Chennai. In September, 2013, he appeared with the Bavarian State Orchestra at a special concert named Ehsaas-e-Kashmir at the historic Mughal Gardens, Srinagar.

Zubin Mehta has received numerous awards and prizes. To mention only a few, in 1999, Zubin Mehta was presented the Life Time Achievement Peace and Tolerance Award of the United Nations. He was honoured by the Government of India in 1966 with Padma Bhushan and in 2001 with the Padma Vibhushan. In 2007, he received the prestigious Dan David Prize and Conductor Karl Bohm awarded Mehta the Nikisch Ring – the Vienna Philharmonic Ring of Honour. In October, 2012, Shimon Peres, the President of Israel awarded him the Presidential Medal of Distinction for his outstanding contribution to Israeli culture. On 6th September, 2013, the President of India conferred on him the Tagore Award for his outstanding contribution towards cultural harmony.

In his autobiography he has written about the St. Mary's High School, where he met students from different religious backgrounds. The approximately 40 students in his class belonged to six or seven religions. He believes that going to this school indoctrinated in him a high esteem for the great diversity among people and taught him to respect differences. He has a strong attachment to the motherland and still continues to hold his Indian passport. By his extraordinary worldwide success as a Conductor, he has become a source of inspiration for the young musicians in India. He has been a bridge between India and the wider world of Western classical music. His iconic status in the field has made Indians proud. He is virtually a cultural ambassador of India to the world.

The Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai feels privileged in conferring the Yashwantrao Chavan National Award 2013 on Mr. Zubin Mehta for his outstanding contribution to social and cultural development in India.

| | | |
|---|---|---|
| Mumbai | Dr. Anil Kakodkar | Sharad Pawar |
| 12th March, 2014 | Chairman | President |
| | Panel of Jury | Yashwantrao Chavan Pratishthan |

# नवमहाराष्ट्र युवा अभियान
# कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, सहसंयोजक श्री. विश्वास ठाकूर, संघटक श्री. निलेश राऊत हे पहातात. श्री. विजय कान्हेकर आणि मा. वैशाली मोटे या संमन्वयक आहेत. तर कार्यालयीन संघटक म्हणून श्री. सुरेश पाटील व सहाय्यक म्हणून मिनल सावंत, वैभव भाष्टे, निलेश पुराडकर, भाऊसाहेब सुरवसे, महेंद्र पंडागळे हे काम पाहतात.

**स्वातंत्र्यज्योत रॅली : १४ ऑगस्ट २०१३.**

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येला राष्ट्र पुरुषांना अभिवादन करण्यासाठी व तरुणांमध्ये स्वातंत्र्यदिनाविषयी आदराची जाणिव जागृती निर्माण व्हावी यासाठी नवमहाराष्ट्र युवा अभियान, आयोजित युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले.

रॅलीची सुरुवात भारताच्या सरहद्दीचे रक्षण करत असताना पाकिस्तानच्या भ्याड हल्ल्याला बळी पडलेले शहीद जवान पुंडलिक माने यांना अभिवादन करुन, करण्यात आली. मा. नरेंद्र राणे, श्रीमती वंदनाताई माने, श्रीयुत महेंद्र पानसरे, अदिती नलावडे यांच्या उपस्थितीत प्रबोधनकार ठाकरेंच्या पुतळ्याला अभिवादन करून सुरुवात केली. मा. सूरज भोईरने गायलेल्या 'इस देश का यारो क्या कहना .....' या जोशपूर्ण गाण्याने रॅली मार्गस्थ झाली.

पुढे सेनापती बापटांचा पुतळा, शिवाजीपार्कातील शिवाजी महाराजांचा पुतळा, सावरकर स्मारकातील स्वातंत्र्यवीर सावरकरांचा पुतळा यांना अभिवादन करून कार्यकर्त्यांनी विशेषतः सिद्धार्थ कांबळे, अभिजित देशमुख, सुहास भागवत, यांनी या महान नेत्यांच्या कार्यकतृत्त्वावर भाषणे केली. चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात येऊन भारतीय राज्यघटनेचा सरनामा याचे सामुहिक वाचन करण्यात आले. आलेल्या पाहुण्यांचे कार्यकर्त्यांचे आभार, अभिजित देशमुख यांनी मानले. सामुहिक राष्ट्रगीताने रॅलीची सांगता झाली.

युवा स्वातंत्र्यज्योत रॅली यशस्वी करण्यासाठी यशवंत सामाजिक केंद्र या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. अकबर काझी यांनी मोलाचे सहकार्य केले. अभिजित देशमुख व मनोज टपाल यांनी घेतलेले श्रम व दाखवलेला हुरुप वाखाण्ण्यासारखा आहे. उमाकांत जगदाळे, हनुमंत पन्हाळकर, डॅनियल, गोपी अभिषेक कदम, राकेश कांबळे, राहूल चव्हाण यांचे मोलाचे सहकार्य लाभले. रॅलीमध्ये जवळपास ३०० कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**लोकसंवाद**

महाराष्ट्राचे शिल्पकार, मा. यशवंतरावजी चव्हाण यांचे मौलिक विचार व कार्य मार्गदर्शक मानून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई ही संस्था गेली २५ वर्षाहून अधिक काळ कार्यरत आहे. प्रतिष्ठानतर्फे राबवण्यात येणाऱ्या अनेक उपक्रमांपैकी एक उपक्रम म्हणजे ''लोकसंवाद'', माहितीपट, लघुपट, ग्रंथ तसेच चालू घडामोडींवर चर्चा, या आणि अशा अनेक वेगवेगळ्या कार्यक्रमांतून ''लोकसंवाद'' च्या व्यासपीठावर अनेक तज्ञ व्यक्तींशी संवाद साधला जातो.

दि. १६ ऑगस्ट २०१३ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई 'लोकसंवाद' या उपक्रमांतर्गत माहितीचा अधिकार – एक शस्त्र्य या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. मा. शरद काळे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते तसेच इतर मान्यवरही यासाठी उपस्थित होते.

रविवार दि. २२ सप्टेंबर २०१३ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि इंडियन ॲकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स, मुंबई यांच्या विद्यमाने **EMBICON 2013** यांच्या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद सकाळी ९.०० ते सायं. ६.०० यावेळेत मुख्य सभागृहात आयोजित करण्यात

आली आहे. या परिषदेसाठी वैद्यकीय क्षेत्रातील प्रमुख मान्यवर तसेच सामाजिक संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित राहिले होते.

दिनांक २७ डिसेंबर २०१३ रोजी – लोकसंवाद या उपक्रमांतर्गत ''महाराष्ट्र : एका संकल्पनेचा मागोवा'' या मा. माधव दातार यांनी लिहिलेल्या पुस्तकावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र नावातच राष्ट्र असणारे आणि स्वाभविकपणे संकुचितपणाला थारा न देणारे राज्य.... व्यापक विचारांचे शतकानुशतके संस्कार होत गेल्यामुळे पुरोगामी प्रतिमा मिरवणारे.

या नावामागे उभी आहे एक जिवंत संकल्पना. इतिहास काळपासून अस्तित्वात असणारी आणि तरीही वेळोवेळी बदलत जाणारी... विविध साधुसंतांनी आणि विचारवंतांनी आपापल्या परीने सजवलेली, रूजवलेली... 'महाराष्ट्रधर्म' ही तिची उपशाखादेखील वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून मांडली गेलेली. महाराष्ट्र निर्माण होऊन ५० वर्षे उलटून गेल्यानंतर कोणते चित्र दिसते आहे? आणि काय दिसायला हवे? या दोन प्रश्नाच्या अनुरोधाने मा. लेखक माधव दातार यांच्या ''महाराष्ट्र एका संकल्पनेचा मागोवा'' पुस्तकावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. शरद काळे हे होते तर मा. प्रकाश अकोलकर आणि पुस्तकाचे लेखक मा. माधव दातार हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

**समाजकार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग**

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील महाराष्ट्राचा थोर वैचारिक वारसा यांनी पुढे नेला. सामान्य माणसात आत्मविश्वास जागविण्याचे आणि त्यांच्या जागृत संघटित कर्तुत्वातून आधुनिक महाराष्ट्राची पायाउभारणी करण्याचे महान कार्य त्यांनी केले आहे. त्यांनी दिलेल्या दिशा आणि दृष्टी कैक पिढयांना मार्गदर्शक ठरणाया आहेत. त्यांचे हे विचार जनसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई ची स्थापना करण्यात आली आहे. वरील उदि्दष्टपूर्तीसाठी प्रतिष्ठानने नवमहाराष्ट्र युवा अभियान या युवा विभागाची उभारणी केली आहे. नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने समाजकार्यकर्ता प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासवर्ग यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे सुरु करण्यात आलेला आहे. हे वर्ग महिन्याच्या प्रत्येक रविवारी घेण्यात येतात. या कोर्सेसचे उदि्दष्ट साध्य करण्याकरिता हाताळले जाणारे विषय केवळ वैचारिक अथवा बौद्धिक पातळीवरचे नसून सध्याचे समाजस्थिती लक्षात घेता सदर विषयाची योग्य ती सांगड व्यवहारीक विषयांशी घातली जात आहे. तसेच केवळ ऐकण्यावर भर दिला जाणार नसून प्रशिक्षणार्थीकडून कार्यपाठ आणि प्रात्यक्षिकाच्या स्वरुपात कृती व त्याच्या प्रत्यक्ष सहभागावर भर दिला जातो.

**अभिसरण २०१४**

**पश्चिम महाराष्ट्र ते मराठवाडा**

(५ जाने ते १२ जाने २०१४)

मा. खा. सुप्रिया सुळे यांच्या संकल्पनेतून 'अभिसरण' हा उपक्रम गेल्या पाच वर्षांपासून महाराष्ट्राच्या विविध भागामध्ये राबविण्यात येतो. हा 'अभिसरण' उपक्रम म्हणजे वैविध्य आणि संपन्नतेने नटलेल्या या महाराष्ट्र देशातील युवांनी, आपापला भुभाग सोडून या मराठी मुलूखाच्या कानाकोपऱ्यात जावून तेथील माहितीचेच नव्हे तर तेथील आचार, विचार, भाषा, आवडी, निवडी, सवयी, व्यवहार, संस्कृती यांचे आदान प्रदान करण्याची एक जाणीव प्रक्रिया होय.

याच अनूषंगाने यावर्षी अभिसरण उपक्रमांतर्गत पश्चिम महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील एकूण ६० विद्यार्थी मराठवाडयाच्या नऊ दिवसांच्या अभ्यास दौऱ्याची सुरुवात पुणे येथील निसर्ग मंगल कार्यालयात विद्यार्थ्यांना अभिसरणविषयीची सविस्तर माहिती देवून करण्यात आली. या कार्यक्रमाला मा. विलास लोंढे, अभिजित खानविलकर, अमित नागरे, सुबोध जाधव, प्रविण देशमुख आदींची उपस्थिती होती. यावेळी मा. विलास लोंढे यांनी विविध खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना

बोलते केले. उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपला यावेळी परिचय दिला. पुढच्या सत्रात मा. अभिजित खानविलकर व मा. अमित नागरे यांनी नवमहाराष्ट्र युवा अभियानाबद्दल सहभागी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

शेवटच्या सत्रात प्रसिद्ध पत्रकार व लेखक मा. अरूण खोरे यांनी विद्यार्थ्यांशी गप्पा मारल्या व पश्चिम महाराष्ट्राविषयी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विषयांवर चर्चा केली. यावेळी अभिसरण म्हणजे स्वतःला व महाराष्ट्राला समजून घेण्याची प्रक्रिया होय असे मत व्यक्त केले. त्यांनतर सर्व विद्यार्थ्यांनी एस.टी. महामंडाळाच्या साध्या बसने मराठवाड्याची राजधानी औरंगाबादकडे प्रस्थान केले.

दुसऱ्या दिवसाची (६ जानेवारी २०१४) सुरुवात औरंगाबाद मधील महात्मा गांधी मिशन संस्थेच्या आर्यभट्ट सभागृहात मा. महेश अचिंतलवार यांच्या पहिल्या सत्रातील व्याख्यानाने झाला. त्यांनी अभिसरणार्थींना औरंगाबादच्या इतिहासाची माहिती दिली. दुसऱ्या सत्रामध्ये ज्येष्ठ पत्रकार मा. माधव सावरगावे यांनी विद्यार्थ्यांना 'माध्यमे व त्यांची भूमिका' याविषयावर मार्गदर्शन केले. चौथ्या सत्रात मा. प्रल्हाद लूलेकर यांनी विद्यार्थ्यांसमोर संपूर्ण मराठवाड्याच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक इतिहास मांडला. अभिसरणार्थींनी मराठवाड्यातील जालना, बीड, परभणी, लातूर, उस्मानाबाद, औरंगाबाद, कन्नड, परळी, नळदुर्ग, पैठण आदी विविध गावांना भेटी दिल्या व माहिती घेतली. शिवाय औरंगाबाद येथील सीड्स कंपन्यांना भेटी दिल्या. तसेच प्रसिद्ध उर्दू शायर मा. बशर नवाज यांची भेट घेतली. यावेळी बशर नवाज यांनी उर्दू साहित्यविश्वाशी अभिसरणार्थींची ओळख करून दिली. त्यानंतर अभिसरणार्थींनी साकेत प्रकाशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, कृषी महाविद्यालय या ठिकाणी भेटी दिल्या. तसेच ज्येष्ठ पत्रकार जयदेव डोळे, कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. भालचंद्र कांगो व विविध जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते प्रयोगशील शेतकरी, स्वातंत्र्यसेनानी यांची भेट घेऊन मराठवाड्याविषयी अधिक माहिती जाणून घेतली. यावेळी अभिसरणार्थींनी मराठवाड्यातील विविध जिल्ह्यातील सामान्य कुटुंबात राहून मराठवाड्याची संस्कृती अधिक जवळून अनूभवली.

अभिसरणाच्या समारोपाचा कार्यक्रम एम. जी. एम. मधील आईन्स्टाईन सभागृहात मान्यवरांच्या उपस्थित पार पडला. यावेळी अभिसरण उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपला मराठवाड्यातील विविध जिल्ह्यात आलेले अनुभव व्यक्त केले शिवाय या उपक्रमाच्या माध्यमातून मिळालेल्या नाविण्यपूर्ण माहितीचा उलगडा त्यांनी आपल्या मनोगताच्या माध्यमातून मांडला. या समारोप सोहळयाला नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक मा. दत्ता बाळसराफ, राज्य संघटक नीलेश राऊत, विजय कान्हेकर, सुहास तेंडूलकर, डॉ. नरेंद्र काळे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.

## युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली – २०१३

मुंबई व नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे 'युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली' चे आयोजन करण्यात येते. तरुणांमध्ये स्वातंत्र्याविषयी आदराची भावना निर्माण व्हावी हा या उपक्रमामागील हेतू आहे. रॅलीचा समारोप स्वातंत्र्यसैनिकांच्या उपस्थितीत करण्यात येतो. प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष मा. सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी आपण राज्यातील २५ ठिकाणी ही रॅली आयोजित करण्यात आली. विविध महाविद्यालयांच्या तरुण व तरुणींनी या रॅलीत उत्फूर्तपणे सहभाग नोंदवला. तसेच विविध सामाजिक संघटनांनीही या रॅलीत सहभाग नोंदवत स्वातंत्र्य दिन साजरा केला. बुधवार, दि. १४ ऑगस्ट २०१३ रोजी राज्यातील औरंगाबाद, जालना, बीड, माजलगाव, नाशिक, यवतमाळ, सटाना, सातारा, रत्नागिरी, नागपूर, सोलापूर, ठाणे, मुंबई, अंबाजोगाई, अकोला, बुलढाणा, रायगड, पुणे आदी शहरात.

युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली साधारणतः सायं ६ वा. शहरातील मुख्य चौकातून सुरु होते. सर्व महाविद्यालयातील युवक–युवती यात उत्फूर्तपणे सहभागी होतात. रॅलीची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते मशाल पेटवून झाली. रॅलीची समारोप संविधानाच्या सरनाम्याच्या वाचनाने व राष्ट्रगीताने करण्यात येतो.

**''पिनॅकल क्लब'' आणि नवमहाराष्ट्र युवा अभियान गिर्यारोहण कार्यक्रम**

''पिनॅकल क्लब'' आणि यशवंतरव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ऑगस्ट २०१३ ते जानेवारी २०१४ दरम्यान सहयाद्रीमध्ये अनेक गिर्यारोहण मोहिमा यशस्वीपणे आयोजित करण्यात आल्या. दि. ४/८/२०१३ रोजी तांदूळवाडी सफाळा, १४ ते १७ ऑगस्ट २०१३ रोजी पन्हाळा ते विशालगड, २५/८/२०१३ रोजी अशेरीगड, ८/९/२०१३ रोजी सागरगड, २९/९/२०१३ कोरीगड लोणवळा, दि ६/१०/२०१३ रोजी सुधागड पाली, दि. १८ ते २० ऑक्टोबर रोजी डुबेरगड, पर्वतगड, आडगड आणि सोनगड सिन्नर, नाशिक, दि. २७/१०/२०१३ रोजी प्रबळगड, दि. १०/११/१३ आणि १७/११/१३ रोजी कान्हेरी गुंफा तसेच गांधी स्मारक बोरीवली येथे प्रस्तरारोहण शिबिर, दि. २४/११/१३ रोजी परांडा किल्ला सोलापूर, ११/१२/१३ ते १५/१२/१३ रोजी नाशिकमधील अचला, अहिवंत, मार्कंडया, रावळया–जावळया आणि धोडप मोहिप यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले. वरील सर्व मोहिमांचा लाभ एकूण २५८ गिर्यारोहकांनी घेतला.

दि. २६/१/२०१४ रोजीच्या प्रजासताक दिन संस्थेने ऑफ्टर केअर वसतीगृह, चेंबूर येथील मुलांबरोबर साजरा केला. ध्वजवंदना नंतर एकूण ४३ मुलांना उंच इमारतीवरून रॅपलिंगचे प्रशिक्षण देण्यात आले व गिर्यारोहणात वापरण्यात येणाऱ्या साहित्याची ओळख करुन देण्यात आली.

❑❑❑

## नव्या पिढीकडून अपेक्षा

मला वाटते, विशाल आणि विधायक विचाराची स्वप्ने साकार करावयाची, प्रत्यक्ष कृतीने दर्शवयाची, तर त्यासाठी आणखी काही आत्मसात करावे लागत असावे. ज्यांनी ही स्वप्ने साकार केली, प्रत्यक्ष कृती केली, त्यांनी आपले विचार मेंदूत अडकवून ठेवले नाहीत. ते रक्तात भिनविले. म्हणूनच त्यांच्याकडून विधायक कृती घडली असली पाहिजे. क्रांतिकारकांनी इतिहास घडविला, तो त्यांचे रक्त तापलेल होते, असे आपण म्हणतो. याचा अर्थ, त्या तरूणंनी देशाच्या स्वातंत्र्याचे विचार रक्तात भिनविले होते, असाच केला पाहिजे. देश सर्वार्थाने सुखी बनविण्याचा विचार स्वातंत्र्योत्तर नव्या पिढीने असा रक्तात भिनविला, तर नव्या पिढीकडून विधायक कार्य घडू शकेल, यावर माझा विश्वास आहे.

– यशवंतराव चव्हाण

# अपंग हक्क विकास मंच
## कार्यवृत्त

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या संवाद व समन्वयाच्या भुमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत, विजय कसबे आणि संघटक रमेश मोरे आणि सुकेशनी मर्चंडे हे काम पाहतात.

**• धुळे, दिनांक : २ व ३ ऑगस्ट, २०१३ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर:**

अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर केले. निवासी मुकबधिर विद्यालय नकाणे रोड धुळे येथे दिनांक २ व ३ ऑगस्ट २०१३ रोजी संपन्न झाले.

या शिबिराच्या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून श्री. खेडकर (समाज कल्याण सभापती धुळे) तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रभारी समाज कल्याण अधिकारी श्री. गौतम पाटी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते श्री. व्हि. एम. पाटील, माजी प्राचार्य अनघा ओक, मुख्याध्यापिका सौ. कल्पना पाटील, शिक्षक वृंद, कर्मचारी यांच्यासह आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. या शिबिरात एकुण १४० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असुन गरजु लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. जयपूर फुट –०६, कॅलिपन–०९, व्हिलचेअर–०२, ट्रायसिकल–१०, क्रचेस–१५, श्रवणयंत्र–२६, अंधकाठी–०१, अंध गॉगल–०२ इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्याचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन संदीप शिरसाट तर आभार प्रदर्शन श्री. जितेंद्र दाभाडे यांनी केले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघाचे कर्मचारी नसीम खान, जाधव दादामियाँ पठाणसह आदी कर्मचारी वृंद उपस्थित होते.

**• नंदूरबार, दिनांक ४ व ५ ऑगस्ट २०१४**

अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कलयाण विभाग जिल्हा परिषद नंदुरबार यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर नंदुरबार येथे दिनांक ४, ५ ऑगस्ट रोजी संपन्न झाले.

या शिबिराच्या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून श्री. सिद्धार्थ वाघमोरे (निरीक्षक, स.क.वि. नंदुरबार) तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मुख्याध्यापक श्री. भामरे, श्री. साळुंखे सर, शिक्षक वृंद, कर्मचारी यांच्यासह आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. या शिबिरात एकुण ११० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असुन गरजु लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. जयपूर फुट–०४, कॅलिपर–०४, व्हिलचेअर–०४, ट्रायसिकल–०३, क्रचेस – ०४, श्रवणयंत्र–०९, अंधकाठी –१५, गॉगल–१५ इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघाचे कर्मचारी श्री. जितेंद्र दाभाडे, संदीप शिरसाठ, जाधव दादामियाँ पठाणसह आदी कर्मचारी वृंद उपस्थित होते.

**• जळगांव, दिनांक १५,१६ व १७ ऑगस्ट, २०१३**

अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद यांच्या

सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर जळगांव येथे दिनांक १५, १६ व १७ ऑगस्ट २०१३ रोजी संपन्न झाले.

या शिबिराच्या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून श्री. प्रभाकर सोनवणे (जिल्हा परिषद काँग्रेसचे गटनेते) तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. भरत चौधरी, पोलीस निरीक्षक नागेश जाधव, जिल्हा परिषद माजी सदस्य शरद महाजन, सहाय्यक निरीक्षक पुरुषोत्तम भूसारी, प्रकल्प संचालक विजय कान्हेकर, प्रकल्प समन्वयक सुहास तेंडुलकर, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष प्रा. मुकेश येवले, अयाज खान, असलम शेख, मोहन चौधरी, दत्तात्रय कोळी यांच्यासह आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.
या शिबिरात एकूण १८० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असुन गरजु लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले.

जयपुर फुट–०८, कॅलिपर–१९, व्हिलचेअर–०१५, ट्रायसिकल–२५, क्रचेस–२८, श्रवणयंत्र–२०, अंधकाठी–०२, गॉगल–०२, सर्जिकल शुज–०३, नि ब्रेस ०१ इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघाचे कर्मचारी श्री. जितेंद्र दाभाडे, संदिप शिरसाठ, जाधव दादामियाँ पठाणसह आदी कर्मचारी वृंद उपस्थित होते.

श्री. प्रभाकर सोनावणे, श्री. भरत चौधरी, श्री. नागेश जाधव, श्री. शरद महाजन, पुरुषोत्तम भुसारी, विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर, प्रा. मुकेश येवले, आदी उपस्थित होते.

**• सांगली, दिनांक २९ ऑगस्ट, २०१३**

अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद सांगली यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर वसंतदादा पाटील सभागृह जिल्हा परिषद सांगली विश्वास प्रतिष्ठान, पोंडा येथे दिनांक २९ ऑगस्ट, २०१३ रोजी संपन्न झाले.

या शिबिराच्या स्वागताध्यक्ष मा. छायाताई अरुण खरमाटे (सभापती, समाज कल्याण समिती जिल्हा परिषद, सांगली) अध्यक्ष म्हणुन श्री दिलीप पाटील (अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी), सौ. एस. एम. कुलकर्णी (समाज कल्याण अधिकारी), तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पशुसंवर्धन अधिकारी श्री. मोरे सर, श्री. विजय कान्हेकर, प्रकल्प संचालक महात्मा गांधी सेवा संघ, सौ. अनुसयाबाई खांबे (स.क.सं. सदस्या जि.प.सांगली) सौ. एस.एस. गायकवाड (वैद्यकिय सामाजिक अधिकारी), श्री. प्रशांत हर्षल सर ओ.एल. जि.प.स.क.सांगली, सर्व कर्मचारी यांच्यासह आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.
या शिबिरात एकूण ११० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असुन गरजु लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. जयपूर फुट–०१, कॅलिपर–०१, व्हिलचेअर–१३, ट्रायसिकल–३०, क्रचेस–०५, श्रवणयंत्र–२६, अंधकाठी–०५, गॉगल–०५ इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरल कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघाचे कर्मचारी श्री. जितेंद्र दाभाडे, संदिप शिरसाठ, जाधव दादामियाँ पठाणसह आदी कर्मचारी वृंद उपस्थित होते.

**• गोवा : दिनांक १९ व २० ऑक्टोबर २०१३ कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर:**

अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी संघ, परभणी, शाखा गोवा, समाज कल्याण विभाग गोवा यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर लोक विश्वास प्रतिष्ठान, पोंडा येथे दिनांक १९ व २० ऑक्टोबर २०१३ रोजी संपन्न झाले. या शिबिरास ना. महादेव नाईक (समाज्यकल्याण मंत्री), श्रीमती. मीना गोलतेकर (संचालक समाजकल्याण) श्री. जगदीश कुमार (उपसचिव), श्री. फर्नांडिस (उपसंचालक) सुदेश गावडे

(सहाय्यक संचालक), श्री. अनुप प्रियोळकर, विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर, श्री. शशिकांत देशपांडे सह आदी कर्मचारी व मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या शिबिरात एकुण १५२ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असुन गरजु लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मांन्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरीत कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

• **औरंगाबादः दिनांक २१ व २२ नोव्हेंबर, २०१३ : मराठवाडा विभागातील कर्णबधिर मुलांना मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर** : स्टारकी फाउंडेशन, अमेरीका, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाड्यातील पंधराशे कर्णबधिर मुलांना मोफत श्रवणयंत्र वाटप शिबिर संत तुकाराम नाट्यगृह, औरंगाबाद येथे दिनांक २१ व २२ नोव्हेंबर २०१३ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी स्टार्की फाउंडेशन, अमेरीका या संस्थेचे, पदाधिकारी व स्वयंसेवक मिळून २५ जणांची एक टीम अमेरीकेहून औरंगाबादमध्ये उपस्थित होती.

दिनांक २० नोव्हेंबर २०१३ रोजी स्टारकी फांउडेशनची टीम सायंकाळी औरंगाबाद विमान तळावर दाखल झाले. यावेळी त्यांचे डॉ. बिल ऑस्टिन व श्रीमती ऑस्टिन यांचे व त्यांच्या टीमचे स्वागत डॉ. कल्याणी मांडके श्री. विजय कान्हेकर, श्री. सुहास तेंडुलकर, श्री. निलेश राऊत्त सह आदी स्वयंसेवक यांनी पाहुण्यांना गुलाबपुष्प देवून त्यांचे स्वागत केले.

कार्यक्रम यशस्विरीत्या पार पाडण्यासाठी पूर्व तयारी म्हणून सर्व स्वयंसेवकांना श्री. विजय कान्हेर, श्री. सुहास तेंडुलकर, श्री. निलेश राऊत्त, श्री. सुबोध जाधव व स्टारकीचे समन्वयक सतिश निर्मळ यांनी मार्गदर्शक केले.

दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ रोजी सकाळ पासूनच शाळांनी त्यांचे विद्यार्थी ३ ते १४ वयोगटातील विद्यार्थी गट निहाय क्रमाने बसवले होते. आलेलया प्रत्येक कर्णबधिर विद्यार्थ्याला आगोदरच दिलेल्या व सविस्तर अशा फॉर्मसह त्यांच्या क्रमानुसार नोंदणी करण्यात आली.

नोंदणी झालेले विद्यार्थ्यांचे कान स्वच्छ आहेत किंवा नाही याची पडताळणी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या समारोपासाठी मा. खा. सुप्रियाताई सुळे आणि मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे उपस्थित होते. यावेळी स्टारकीच्या सर्व कर्मचाऱ्यांचे मा. यशवंतराव चव्हाण साहेब लिखित ''कृष्णाकाठ'' पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती व स्मृतिचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद कर्मचारी वृंद, स्वयंसेवक, नागपूर, मुंबई, पुणे विभागाचे कार्यकर्ते, स्वयंसेवकाची टीम, अपंग हक्क विकास मंचचे कार्यकर्ते आदींनी परिश्रम घेतले.

• **अमरावती : दिनांक ३,४ व ५ जानेवारी २०१४ : राज्यस्तरीय अपंग मुला–मुलींच्या क्रिडा स्पर्धेनिमित्त मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यासाठी नाव नोंदणी व तपासणी शिबिर**: सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, मा. आयुक्त अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी संचलित जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र औरंगाबाद, पुणे, नागपूर, हिंगोली, कृत्रिम अवयव निर्माण व प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद अमरावती, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३, ४ व ५ जानेवारी २०१४ रोजी राज्यस्तरीय अपंगांच्या क्रिडा स्पर्धेनिमित्त विशेष शाळांतील अपंग मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना लागणारे कृत्रिम अवयव व साधने मिळण्यासाठी या शिबिराचे अयोजन अमरावती येथे करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अपंगकल्याण आयुक्त मा. बाजीराव जाधव, प्रमुखपाहुणे आमदार वसंतराव खोटरे, आमदार अनिल बोंडे, आमदार रवी राणा, विभागीय आयुक्त डी.आर. बनसोड, पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, विभागीय उपायुक्त पी.बी.नाईक, समाजकल्याण अधिकारी व्ही.एल. जाधव, किशोर

बोरकर, डॉ. सुरेश सावदेकर, अपंग हक्क विकास मंचचे राज्य समन्वयक विजय कान्हेकर, डॉ. श्रीकांत चेंडके, प्रा. संजय तिरथकर, अनिल तरडेजा आदी मान्यवर उपस्थित होते. या तीन दिवसीय शिबिरामध्ये राज्यातील ३५ जिल्ह्यातील ३५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांची मोजमाप व तपासणी करण्यात आली. यामध्ये ६८० कर्णबधिर, १६४० अंध प्रवर्ग, ७४५ अस्थिव्यंग, ३९८ मतिमंद विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. क्रिडा स्पर्धेच्या समारोप प्रसंगी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या चमूने क्रिडा ध्वज सन्मानाने खाली उतरवून तो अपंग कल्याण आयुक्तालयांचे आयुक्त बाजीराव जाधव यांच्याकडे सुपुर्द केला. यावेळी बिगुल वाजवून सलामी देण्यात आली. राष्ट्रगीताने क्रिडा स्पर्धेचा समारोप करण्यात आला.

**• मुंबई : दिनांक १९ व २० जानेवारी २०१४**

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग मुंबई शहर यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप व तपासणी शिबिर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या बेसमेंट हॉल येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरास अध्यक्ष म्हणून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस, मा. शरद काळे, अपंग हक्क विकास मंचचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर, श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात एकूण १०० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली होती. यापैकी गरजू अपंग ७२ लाभार्थ्यांना कृत्रिम साहित्याचे वाटप करण्यात आले. जयपूर फुट १०, श्रवणयंत्र २०, तिनचाकी सायकल २५, व्हिलचेअर १५, अंधकाठी ७, गॉगल ३, कुबडी जोड २ इत्यादी साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. तर उर्वरित २८ लाभार्थी प्रतिक्षा यादीत आहेत. सर्व उपस्थित लाभार्थ्यांना स्वयंरोजगार, शैक्षणिक विषयी, अपंगाच्या शासन निर्णयाविषयी, अपंगांच्या विविध योजना याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबादचे कर्मचारी, श्री. प्रभाकर वावरे, चांदोबा बिरगड, अनिल बाराते आणि अपंग हक्क विकास मंच, मंबईचे संघटक कु. सुकेशनी मर्चंडे, अनिल चाळके, विजय कस्बे, रमेश सांगळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

❑❑❑

## आयुष्य आणि नियती

आयुष्य हे घोडेस्वारासारखं आहे असं मला नेहमी वाटतं. दऱ्याखोऱ्यांतून घोडस्वाराला नेहमीच धावावं लागतं. डोंगरदऱ्या पार कराव्या लागतात. आणि सुखरूप तर राहावं लागतंच. एखाद्या घोडस्वाराच्या चित्राकडे मी पाहतो, तेव्हा वैयक्तिक काय किंवा राजकीय जीवनात काय, असंच संकटातून एकसारखं धावावं लागलं, असं दिसतं. संकटांशिवाय आजवर काही मिळालं नसलं, तरी एक खरं की, कामाचं समाधान आहे.

कराडात वकील म्हणून जम बसवीत राहिलो असतो, तर राजकारणातले नंतरचे अध्याय कदाचित दिसले नसते. नियतीच्या मनातच ते होतं. सर्वज्ञ असो, बहुज्ञ असो, नियतीच्या मनातच ते होतं. सर्वज्ञ असो, बहुज्ञ असो, नियतीला, सृष्टिनियमाला बदलण्यास कुणीही समर्थ नाही हेच खरं ! म्हणूनच नाश पावलं असेल, त्याची उपेक्षा करावी लागते आणि जीवनात जे प्राप्त होतं, त्याचा अंगीकार करावा लागतो.

– यशवंतराव चव्हाण

# शिक्षण विकास मंच
# कार्यवृत्त

## राष्ट्रीय शिक्षण दिन कार्यक्रम

शिक्षण विकास मंचाने आपल्या कतृत्वाच्या जोरावर महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रिया सुळे ह्या शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक म्हणून तर डॉ. कुमुद बन्सल यांच्या पश्चात डॉ. वसंत काळपांडे, मुख्य संयोजक आणि श्रीमती बसंती रॉय विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी सांभाळात आहेत. श्री. दत्ता बाळसराफ हे संयोजक, श्री सुरेश पाटील, माधव सूर्यवंशी, वैभव भाष्टे हे समन्वयक तर सहाय्यक म्हणून मिनल सावंत हे काम पहातात.

### दि. २५ नोव्हेंबर २०१३ राज्यस्तरीय परिषद

भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय शिक्षण दिनाचे आयोजन करण्याचा निर्णय केंद्र शासनाने २००८ मध्ये घेतला. त्यानुसार राष्ट्रीय शिक्षण दिनाचे आयोजन करण्यास सुरुवात करणारी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ही देशातील पहिली संस्था आहे. प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी राष्ट्रीय दिनाचे औचित्य साधून विविध विषयावर विचारमंथन करणाऱ्या अर्थपूर्ण परिषदा घेण्यात आल्या आहेत.

या वर्षी ही परिषद २५ नोव्हेंबर २०१३ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे घेण्यात आली. केंद्र शासनाच्या National policy on ICT in School Education या धोरणाची अंमलबजावणी महाराष्ट्रासह सर्वच राज्यामध्ये सुरु आहे. अनेक शाळा आणि शिक्षक या क्षेत्रात स्वतः पुढाकार घेऊन नवनवीन उपक्रम राबवीत आहेत. या पार्श्वभूमीवर या वर्षी आयोजित केलेल्या परिषदेसाठी ''शालेय शिक्षणात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा या वर्षी आयोजित केलेल्या परिषदेसाठी वापर'' या विषयाची निवड करण्यात आली होती. या परिषदेसाठी राज्यभरातून ३०० प्रतिनिधी उपस्थित होते. यात शिक्षण क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा आधार घेऊन विविध उपक्रम राबविणारे तज्ञ उपस्थित होते. शिक्षण क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षण क्षेत्रात काम करणारे प्रयोगशील प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक हे होते. याचबरोबर शिक्षण क्षेत्रात येऊ घातलेले प्रशिक्षणार्थी विद्यार्थी शिक्षक हे हि उपस्थित होते. या परिषदेचे प्रास्ताविक डॉ. वसंत काळपांडे यांनी केले. परिषद आयोजना मागील भूमिका त्यांनी विशद केली. या परिषदेचे उदघाटन शालेय राज्यमंत्री प्रा. ना. फौजिया खान यांनी केले. परिषदेच्या सुरुवातीला ''कट्टा शिक्षणाचा'' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षणतज्ञ कै. डॉ. कुमुद बन्सल यांच्या मार्गदर्शनाने हा शिक्षण कट्टा सुरु झाला. यावर झालेल्या चर्चेचे संकलन या पुस्तकांत करण्यात आले आहे. यानंतर 'डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ठ शैक्षणिक ग्रंथ' पुरस्काराचे वितरण झाले. हा पुरस्कार रेणू दांडेकर याना देण्यात आला सोबतच नरेंद्र लांजेवार यांच्या 'एका ग्रंथपालाची प्रयोगशाळा' यांनाही दुसरा पुरस्कार देण्यात आला. राजेंद्र बाबर यांच्या inmyschool.in या वेबसाईटला विशेष पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

शिक्षणातील गुणवत्तवाढ हे शासनाने ध्येय असून तंत्रज्ञानाची कास धरणे, आयआयटी ब्रिटीश कौन्सिल अशा नामवंत संस्थानाही सोबत घेऊन कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे. शिक्षण प्रशिक्षांची व्याप्ती व दर्जा वाढविण्याचा प्रयत्न हि शासनाकडून होत आहे. याकामी या परिषदेने केलेल्या सूचना आम्हांस नक्कीच उपयुक्त ठरतील असे त्या म्हणाल्या.

शिक्षण विकास मंच च्या निमंत्रक खा. सुप्रिया सुळे यांनी या परिषदेचे महत्व विशद केले. त्याच बरोबर 'शिक्षण कट्टा' या उपक्रमाचे कौतूक करुन हा उपक्रम राज्यातील प्रमुख शहरात राबवावा असे सांगितले. शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, अभ्यासक, तज्ञ शिक्षक यांनी या विषयावर दिवसभर सर्वांगीण चर्चा करावी व त्यातून आलेल्या सूचना आपण शासनाकडे सादर कराव्यात, जेणेकरून शिक्षणातील गुणवत्तावाढीसाठी आपण दूताची भूमिका बजावावी, शिक्षणाचा दर्जा उंचवून त्यात सखोलता यावी. मुलांमध्ये विश्लेषण व विचारवृत्ती वाढीस लागावी. शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा दर्जा वाढावा यासाठी शालेय शिक्षणात माहिती संप्रेषणाचा वापर केला जावा. ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

परिषदेची सुरुवात ''माझी डिजिटल शाळा'' याच्या सादीकरणाने झाली. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील पाष्टेपाडा हे ५० घरे असलेला पाडा. तेथील जिल्हा परिषद शाळातील तरुण शिक्षक संदीप गुंड यांनी इंटरनेटचा प्रभावी वापर करुन त्या शाळेतील गुणवता सुधारून दाखविलेली आहे. मुलांचे शिकणे, अभ्यास, सराव, मूल्यमापन, करमणूक सारे काही हायटेक रितीन तेथे होते. संदिप गुंडसारख्या महत्वाकांक्षी, होतकरु शिक्षकाने पालक, ग्रामस्थ, लोक प्रतिनिधी यांची मदत घेऊन पष्टेपाड्याची झेड.पी. शाळा डिजिटल केली. आता इतर शाळांसाठी हा रोल मॉडेल ठरत आहे.

या उदघाटन सत्रानंतर या क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांची सादरीकरणे झाली. महाराष्ट्राच्या माध्यमिक शिक्षण संचलनालयाचे सहसंचालक डॉ. सुनील मगर यांनी ''महाराष्ट्रातील शालेय शिक्षणात माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाची सद्यस्थिती'' विशद केली. राज्यात शालेय शिक्षणात माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा समावेश करण्यामागची उदिष्टे, आव्हाने व प्रयत्न यांचा आढावा यांनी घेतला. माध्यमतज्ञ डॉ. केशव साठे यांनी मल्टीमिडीयाचा वापर करुन शालेय शिक्षणात कसे दर्जेदार, रंजक, कल्पक, प्रोत्साहनात्मक होते ते त्यांनी सांगितले. तंत्रज्ञान हाताशी घेऊन शिक्षकाने त्याचा वापर करावा मात्र तंत्रज्ञानाचे आपण गुलाम होऊ नयेत असे आवाहन त्यांनी केले. प्राचार्य डॉ. गजानन पाटील यांनी ई-लर्निंगचे महत्व विशद करुन शिक्षक, प्रशासक, पालक यांनी ते कसे उपयुक्त आहे. हे सांगितले. शालेय व्यवस्थापन ज्या ज्या गोष्टी लागतात. त्या सर्व इंटरनेटच्या सहाय्याचे करण्याची सुविधा देणारी inmyschoo.in ही वेबसाईटची श्री राजेंद्र बाबर यांनी विकसित केली आहे. रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. नानासाहेब गायकवाड यांनी त्यांच्या समूहातील सर्व शाळांमध्ये शिक्षण प्रक्रियेत आणि शाळा प्रशासनात वेबसाईटचा अत्यंत प्रभावी वापर कसा केला जात आहे ते सांगितले. मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील मुलांसाठी व्हर्चुअल स्कूल हा उपक्रम राबविला जातो. दादरला त्यासाठी स्टुडिओ उभारला गेला आहे. यामुळे चार माध्यमांच्या सुमारे ४८० शाळेतील पाचवी ते दहावी च्या मुलांना उत्तम शिक्षणाचा लाभ होते आहे. या प्रकल्पाची माहिती कैलास आर्य यांनी दिली. भाऊसाहेब चासकर या अकोले येथील शिक्षकाने www.sahayagiri.com ही वेबसाईट तयार केली आहे. यात एका तालुक्यात स्थानिक इतिहास, भूगोल, सचित्र दर्शन केले आहे. त्या तालुक्यातील भाषा, पिके, दुर्ग, वनसंपदा, नद्या, धरणे आदी माहितीचे त्यांनी बनविलेले जे लर्निंग टूल आहे त्याचे ही सादरीकरण यावेळी झाले.

भोजनोत्तर सत्रामध्ये खरी रंगत आणली ती राम सालगुडे यांनी केलेल्या ब्लॉगच्या अनुभव कथनाने सातारा जिल्ह्यातील मार्डी येथे ते प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. शिक्षणासाठी काय पण... हा ब्लॉग ते चालवितात. त्यांच्या या ब्लॉगवर शिक्षण विभागासाठी उपयुक्त अशी माहिती तर आहेच पण त्याशिवाय सुविचारांपासून चालू घडामोडीपर्यंत शिक्षकांच्या उपयोगी पडणारी बरीच माहिती त्यात आहे असे त्यांनी सांगितले. अंजुमन इस्लाम शाळेच्या मुख्याध्यापिका सबा पटेल यांनी मुंबईतील एच वॉर्डमधील सर्व शाळांना जोडणारी प्रशासनाला उपयोगी पडणारी तसेच विद्यार्थ्यांचा अभ्यास योग्य पद्धतीने करुन घेणारी प्रणाली विकसित केली आहे. त्याचे सादरीकरण केले. त्याचबरोबर मोबाईल फोनच्या माध्यामातून विविध उपक्रमाची माहिती विध्यार्थ्यांना कशी दिली जाते याचे थेट प्रात्यक्षिक यांनी करुन दाखवले. याच बरोबर श्रीमती शैलजा शाह यांनीही आपली सादरीकरणे सादर केली. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून एक नवीन प्रवाह आपल्यासमोर आला आहे. त्याचं आपण योग्य वापर करुन घ्यावा असे या सर्व तज्ञांनी सुचविले.

तज्ञांच्या मार्गदर्शनानंतर खुली चर्चा ठेवण्यात आली होती. खुल्या चर्चेमध्ये अनेक उपस्थित शिक्षकांनी आपण तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध प्रयोग राबवीत असल्याचे सांगितले. काहींनी यातील आव्हाने, त्रूटी सांगण्याचा प्रयत्न केला. त्रूटी व आव्हाने सांगत असताना आपण वेबसाईटवर, ब्लॉगवर माहिती देणार आहेत ती अचूक, निर्दोष असावी इंटरनेटच्या माध्यमातून जो माहितीचा प्रचंड प्रवाह आपल्यासमोर उभा असतो त्यातील योग्य ती माहिती आपण घ्यावी, अन्यथा या प्रवाहात आपण वाहून जाऊ अशीही शक्यता व्यक्त करण्यात आली. तंत्रज्ञानाच्या मायाजालात आपण जाताना जबाबदारीचे भान ठेवावे अशाही सूचना मांडण्यात आल्या.

या परिषदेचा समारोप केंद्रीय कृषीमंत्री आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. ना. शरदचंद्रजी पवार यांच्या भाषणाने झाला. यावेळी ते म्हणाले, माहिती तंत्रज्ञानाच्या शिक्षणात अधिकाधिक वापर झाल्यास ज्ञानाचा प्रसार सहज आणि दर्जेदार होऊ शकणार आहे. या दृष्टीने या तंत्राचा प्रभावी वापर शिक्षणात

करणाऱ्या राज्यभरांती लोकांना एकत्रित आणण्याचा हा कार्यक्रम फार महत्वाचा आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी सदैव आग्रही असणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनी हा कार्यक्रम होणे हे फार सयुक्तिक आहे. असे उदगार त्यांनी यावेळी काढले. या समारोपाच्या सत्रात डॉ. वसंत काळपांडे यांनी दिवसभर चाललेल्या या परिषदेचा अहवाल सुरुवातीला सादर केला. या परिषदेस दर वर्षी मिळणारा वाढता आणि उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता ही परिषद पुढील वर्षी २५ नोव्हेंबर रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या मुख्य सभागृहात घेतली जाईल अशी माहिती दत्ता बाळसराफ यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करताना जाहीर केली. या परिषदेसाठी प्रा. माधव सूर्यवंशी, सुरेश पाटील, वैभव भाष्टे, निलेश पुराडकर मिनल सावंत, रमेश मोरे, यांनी विशेष परिश्रम घेतले.

**दि. ९ डिसें. २०१३**

२५ नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय परिषद झाली त्याचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. या परिषदेबद्दल प्रसिद्धी माध्यमातून जे लेख आले होते त्याची चर्चा करण्यात आली. ई-लर्निंग कार्यशाळा, शिक्षण कट्टा, आगामी कार्यक्रमाबद्दल चर्चा करण्यात आली. या बैठकीस डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय, दत्ता बाळसराफ, माधव सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

**विशेष बैठक - २८ डिसेंबर २०१३**

डॉ. वसंत काळपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत आगामी काळात जे कार्यक्रम राबवायचे आहेत त्यांनी प्रमुख चर्चा झाली. यात प्रामुख्याने एप्रिल २०१४ मध्ये ९ लर्निंगची कार्यशाळा सातारा येथे घेण्याचे ठरले. रयत शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने प्रतिष्ठान कडून ही कार्यशाळा एप्रिलमध्ये आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. यात प्रामुख्याने राज्यभरातून ३०० शिक्षक या परिषदेला आमंत्रित करण्यात येणार आहेत.

❑❑❑

## आयुष्य आणि नियती

आयुष्य हे घोडेस्वारासारखं आहे असं मला नेहमी वाटतं. दऱ्याखोऱ्यांतून घोडेस्वाराला नेहमीच धावावं लागतं. डोंगरदऱ्या पार कराव्या लागतात. आणि सुखरूप तर राहावं लागतंच. एखाद्या घोडस्वाराच्या चित्राकडे मी पाहतो, तेव्हा वैयक्तिक काय किंवा राजकीय जीवनात काय, असंच संकटातून एकसारखं धावावं लागलं, असं दिसतं. संकटांशिवाय आजवर काही मिळालं नसलं, तरी एक खरं की, कामाचं समाधान आहे.

कराडात वकील म्हणून जम बसवीत राहिलो असतो, तर राजकारणातले नंतरचे अध्याय कदाचित दिसले नसते. नियतीच्या मनातच ते होतं. सर्वज्ञ असो, बहुज्ञ असो, नियतीच्या मनातच ते होतं. सर्वज्ञ असो, बहुज्ञ असो, नियतीला, सृष्टिनियमाला बदलण्यास कुणीही समर्थ नाही हेच खरं ! म्हणूनच नाश पावलं असेल, त्याची उपेक्षा करावी लागते आणि जीवनात जे प्राप्त होतं, त्याचा अंगीकार करावा लागतो.

– यशवंतराव चव्हाण

# सृजन
## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर/सृजन विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि विविध कलांची तोडओळख करुन त्याचे विद्यार्थी जीवन समृध्द व्हावे या करीता सृजन हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्तकलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना व संयोजन सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सुप्रसिध्द चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग सन्माननीय सल्लागार म्हणून काम पाहतात. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम करीत आहे.

दिनांक ४ ऑगस्ट २०१३ रोजी अग्नीशामक दल मुंबई यांच्या वतीने अग्नीशामक दलाची माहिती, आग प्रतिबंधक उपाय, याविषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत आग लागू नये म्हणून घ्यावयाची काळजी, आग लागल्यानंतर आपण घेण्याची दक्षता आणि सुरक्षा, त्याचबरोबर अग्नीशामक साधने कशी वापरायची यांची प्रात्यक्षिके, त्याचबरोबर स्कॉय स्कायपर, स्कायपर लिफ्टमध्ये यांची प्रत्याक्षिके इ. गोष्टीची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली

१ सप्टेंबर २०१३ रोजी टाटा इन्स्टिटीटयुट ऑफ फंडामेंटल रिसर्च सेटर यांच्या वतीने प्रा. अनीब भट्टाचार्य यांनी थंडा मतलब लिक्विड नॅट्रोजन आणि आरोगामी आणि मॅथेमॅटिक या विषयावर यांनी कार्यशाळा घेण्यात आली या कार्यशाळेत – १९६ सी या लो टेम्परेचरला घडणाऱ्या विविध गोष्टीची माहिती देण्यात आली झटपट आईस्क्रिम तयार कसे होईल. त्याचबरोबर आरोगामी आणि मॅथेमॉटिक या विषयावर या विषयावर मुलांना माहिती दिली.

६ ऑक्टोबर २०१४ रोजी श्री शुभानंद जोग, श्री विवेक टेटविलकर यांनी मुलांना फाटोग्राफी बदल माहिती दिली. या मध्ये मुलांना कॅमेरा कसा वापरावयाच मुलांनी एखादा गोष्ट निश्चित केलेल्या त्या गोष्टीचा फोटो कसा काढावयाचा, प्रकाश योजना कशी ठेवायची इ. गोष्टी मुलांना प्रत्यक्ष कॅमेरा वापरायाला देवून शिकवल्या.

२० ऑक्टोबर २०१४ रोजी टाटा इन्स्टिटीटयुट ऑफ फंडामेंटल रिसर्च सेटर चे श्री सुरेश चंदावणकर यांनी आवाजाचा इतिहास आणि त्याचे सायन्स या विषयवार मुलांना माहिती दिली. विविध स्लाईडशो माध्यमातून आवाज या विषयाचे विज्ञान मुलांना समजवून सांगीतले. गाण्याची तबकडी कशी तयार केली जाते सांगितले तांब्याच्या तारापासून वीज निर्माण करुन पंखा कसा फिरावला जातो. यांचे प्रात्यक्षिक करुन दाखवले.

३ नोव्हेंबर २०१३ रोजी श्री गंगाधर मेमन यांनी मुलांना विविध वाक्ये, प्रसंग, घटना याचा स्लाईड शो दाखवून गोष्टी तयार करावयाला सांगितले. या सर्व गोष्टी एकत्र गंफून याची एक कल्पनिक गोष्ट तयार कशी करावी हे मुलांना शिकवले मुलांना अशा प्रकारे गोष्टी लिहून घेतल्या काही मुलांना यशस्वीपणे गोष्टी लिहून दाखवल्या

सृजन २०१३ या सृजनच्या वार्षिक कार्यक्रमांची सांगता १ डिसेंबर २०१३ मध्ये प्रविण काथे यांच्या चार्लीचॅप्लीन या कार्यक्रमाने झाली. मुलांचे विविध सांघिक खेळ, नृत्य गोष्टी आणि मिमिक्री अशा विविध मनोरंजनाच कार्यक्रमाचा सहभाग होता.

५ जानेवारी २०१४ रोजी बनस्थळी विद्यापीठ राजस्थान येथील प्रा. शर्मिला आणि प्रा. श्याम गुजर, या दामंत्यांनी गमत्त धाग्याची या विषयावर कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेमध्ये धाग्यामधून अनेक विविध आकाराची खेळणी, आकार आणि वस्तूची प्रात्याक्षिके दाखवून विद्यार्थ्यांकडून बनवून घेतल्या.

❑❑❑

# वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान
## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान तर्फे सन २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षामध्ये शाळांमध्ये हवामान बदल विषयक शिक्षण व कृती प्रकल्प राबविण्यात आला. मुंबईतील १० शाळांमधील जवळजवळ १००० विद्यार्थी या प्रकल्पात सहभागी झाले होते.

हवामान बदल ही संपूर्ण जगाला ग्रासून टाकणारी एक पर्यावरणीय समस्या आहे. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच तिचे दुष्परिणाम भारतात सुद्धा दिसू लागले आहेत. हवामान बदलामुळे समुद्रकिनाऱ्यांवरील जीवन धोक्यात येत आहे, चक्रीवादळांची तीव्रता वाढत आहे, पिकांच्या प्रजाती कमजोर पडत आहेत, पाण्याच्या उपलब्धतेवर विपरीत परिणाम होत आहे, जैवविविधतेचा ठेवा नष्ट होत आहे.

म्हणूनच यावरील उपाययोजना गावापासून शहरांपर्यंत आणि कारखान्यांपासून शाळांपर्यंत सर्वत्र अंमलात येणे अपेक्षित आहे. ही व्यापक संकल्पना घेऊन सन २०१३-१४ या वर्षात मुंबईतील दहा शाळांमध्ये दर महिन्याला एक शिक्षण व कृती उपक्रम याप्रमाणे प्रकल्प राबविले गेले.

ऑगस्ट महिन्यात जलसंवर्धनाच्या सत्रामध्ये चमच्यातून पाणी पुढे पास करण्याचा खेळ घेण्यात आला. त्यानंतर खेळताना मुलांनी सांडलेले पाणी याबरोबरच जलचक्र, पाण्याचा अपव्यय, जलप्रदूषण, हवामान बदल व जागतिक तापमानवाढीचा पाण्याच्या उपलब्धतेवर होणारा परिणाम, पाण्याच्या वापराचे प्राधान्यक्रम यावर चर्चा करण्यात आली. शाळेतील पाण्याच्या वापराचे ऑडीट शिक्षकांच्या सहकार्याने करण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांना देण्यात आला. या वेळी गळती होणाऱ्या नळांतील पाणी मोजून एका महिन्याला पिण्याच्या पाण्याचा किती अपव्यय होतो या निरीक्षणांचा अहवाल विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापकांनी दिला व त्यांनीही लागलीच गळक्या नळांना दुरुस्त करुन घेतले.

सप्टेंबर महिन्यात वृक्षारोपणाच्या सत्रात विद्यार्थ्यांबरोबर वनस्पतींचे वर्गीकरण, त्यांचे उपयोग, तसेच हवामान बदल व जागतिक तापमानवाढीचा त्यांच्यावर होणारा परिणाम याबद्दल चर्चा केली. या समस्येवर उपाय योजना म्हणून वृक्षसंवर्धन करणे हाच मोठा उपाय आहे. कडुलिंब, अडुळसा, तुळस, शतावरी, पानफुटी, पानओवा यासारख्या औषधी वनस्पती आणि ज्या शाळांमध्ये भरपूर सूर्यप्रकाश येईल अशी जागा उपलब्ध होती तेथे फुलपाखरांना आकर्षित करणाऱ्या वनस्पतींची लागवड करण्यात आली. तसेच जेथे शाळेत जागा उपलब्ध नव्हती तेथे रोपे विद्यार्थ्यांना घरी देण्यात आली. या रोपांना पाणी घालणे, त्यांची काळजी घेणे यासारख्या गोष्टंची जबाबदारी प्रकल्पातील सहभागी विद्यार्थ्यांना देण्यात आली.

नोव्हेंबर महिन्यात कचराव्यवस्थापनाच्या सत्रात विद्यार्थ्यांबरोबर कचऱ्याबद्दल चर्चा करण्यात आली. कचऱ्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाबद्दल माहिती देऊन शाळेत आढळून येणाऱ्या कागदाच्या कचऱ्याबद्दल चर्चा केली. कागद वाया घालवणे म्हणजेच तेवढी वृक्षतोड वाढवणे हे मुलांना पटवून दिले. रद्दी कागदापासून नवीन हँडमेड पेपर कसा तयार करावा आणि नारळाच्या करवंटीवर कागदाचा लगदा थापून कासव कसे तयार करावे याचे प्रात्यक्षिक दाखविले.

डिसेंबर आणि जानेवारी महिन्याच्या शेवटच्या सत्रात स्थानिक जैवविविधतेचा अभ्यास करण्यासाठी शाळेच्या जवळील जैवविविधता संपन्न ठिकाणी क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. यासाठी शाळेजवळील बाग, मैदान, समुद्रकिनारा, खारफुटीचे जंगल, रोपवाटीका यासारख्या ठिकाणांची निवड करण्यात आली. तेथील वनस्पती व जीवसृष्टीचे निरीक्षण तसेच जाणवत असलेले धोके यांची नोंद घेण्यात आली.

सर्व उपक्रम जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात पार पाडल्यानंतर बालसाहित्यिक श्री. अनंत भावे व निसर्ग शिक्षिका श्रीम. हर्षदा मिश्रा यांसारख्या सन्माननीय परिक्षकांच्या मंडळाचे प्रत्येक शाळेला भेट दिली. विद्यार्थ्यांना हा विषय कितपत कळला आहे, शाळा हवामान बदल विषयक कोणते कृती प्रकल्प हाती घेत आहे याचे त्यांनी मूल्यमापन केले. त्या अनुसार यावर्षी या दहा शाळांपैकी ३ सर्वोत्कृष्ट पर्यावरणस्नेही शाळांची निवड करण्यात आली.

या उपक्रमांची अंमलबजावणी वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियानचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. यासाठी श्री. प्रशांत शिंदे, संगीता खरात आणि ज्योती खोपकर यांनी विशेष परिश्रम घेऊन हे उपक्रम यशस्वी केले.

❑❑❑

## प्रगती व समस्या

एखादी योजना आपण आखतो, ती पार पाडू लागतो, त्यावेळी तिच्या सामाजिक, आर्थिक परिणामांची समग्र जाणीव अनेकदा आपल्यास होत नाही. जसजसे आपण त्या मार्गाने पुढे जातो, तसतसे आपणांस नवे प्रश्न दिसू लागतात. उदाहरणच द्यावयाचे झाले तर शिक्षणाचे देता येईल. शिक्षणाचा अनिर्बंध प्रसार व्हावा, अशा मताचा मी होतो आणि आजही आहे. शेकडो वर्षे निरक्षरतेच्या, अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणाऱ्या भारताला विज्ञानाचा प्रकाश लवकर दिसावा, ही त्यामागची तळमळ होती. ही विज्ञानाची कवाडे उघडली, प्रकाश आला आणि त्यामुळे नवा, तंत्रज्ञांचा वर्ग निर्माण झाला, त्यातूनच बेकार तंत्रज्ञांची व शिक्षितांची समस्या आज आपल्यापुढे उभी आहे. एखाद्या वर्गाला पुढचे भवितव्य स्पष्ट दिसले नाही, की तो अस्वस्थ होतो. काही तरी नवा मार्ग शोधतो. शासन अशा वर्गाबाबत थंड व उदासीन राहिले, तर त्या वर्गाच्या असंतोषाला राजकीय स्वरूप येते. हा राजकीय असंतोष एका शैक्षणिक धोरणातून निर्माण झालेला आहे, असे लक्षात येते. समाजातील तंग परिस्थिती अशा अनेक कारणांमुळे निर्माण होते.

– यशवंतराव चव्हाण

# यशंवतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम कार्यवृत

समाजातील गोरगरीब, दीनदुबळे व मागास वर्गाच्या लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रतेमुळे किंवा मागासलेपणामुळे अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये यासाठी उपाय योजावेत अशा प्रकारचे मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतुदीला अनुसरुन शासकीय संसदेने १९८७ मध्ये विविधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केला आहे. या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविला जातो.

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमात अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत.

**फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारची कामे केली जातात:-**

१. समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.

२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.

३. कांही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.

४. पक्षकारांच्या तंटयामध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणणे.

५. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सूचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

६. कायद्यांची विशेष माहिती करुन देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.

७. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी राज्याच्या वेगवेगळया ठिकाणी वेळोवेळी विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे.

८. संबंधित न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या सहकार्याने लोकन्यायालयाचे आयोजन करणे.

९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकिलांची व्यावसायिक नितिमत्ता या विषयावर परिसंवादांचे आयोजन करणे.

त्यानुसार गेल्या सहा महिन्यांत म्हणजेच १ ऑगस्ट २०१३ ते ३१ जानेवारी २०१४ या अवधीमध्ये फोरमकडून करण्यात आलेल्या कामांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**फोरमच्या बैठका:-** कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमल बजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात. त्यानुसार गेल्या सहा महिन्यांमध्ये दि. १६.८.२०१३, दि. ६.९.२०१३, दि. ११.१०.२०१३, दि. ८.११.२०१३, दि. १३.१२.२०१३ व दि. १०.१.२०१४ अशा एकूण सहा बैठका झाल्या. सरासरी ९ सदस्य प्रत्येक बैठकीला उपस्थित होते. एकूण १३० बाबीसंबंधी निर्णय घेण्यात आले. तसेच या बैठकांची एकूण उपस्थिती ५४ इतकी होती.

**उपसमितीच्या बैठका :-** एखाद्या विषयांसंबधी सखोल अभ्यास करुन प्रस्ताव तयार करण्यासाठी वेळोवेळी फोरमच्या वेगवेगळया उपसमित्या नेमल्या जातात. त्यानुसार खालीलप्रमाणे उपसमित्यांच्या बैठका झाल्या.

**कायदेविषक सल्ला केंद्र :-** गोरगरीब व सामान्य लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० वाजता चव्हाण केंद्राच्या दुसऱ्या मजल्यावर प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविणे जाते. गेल्या सहा महिन्यांमध्ये या केंद्राच्या २६ बैठका झाल्या. अंदाजे ३१ लोकांनी या केंद्रामध्ये येऊन मोफत सल्ल्याचा लाभ घेतला आहे. या केंद्राचे काम सर्वश्री म. बा. पवार, भूपेश सामंत व निलेश पावसकर इत्यादी वकिलांनी पाहिले.

**मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र :-** दर मंगळवारी ५.०० ते ७.०० या वेळेत समुपदेशन व तडजोड केंद्राचे आयोजन करण्यात येते.

**आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या (know your Law Lecture Series) :-** या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायेपंडितांचे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

**विधी साक्षरता कार्यशाळाः -**

लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत असलेल्या कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ - पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या सहा महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये खालील कार्यक्रमांचा समावेश आहे.

१. फोरम व गायत्री चॅरिटेबल ट्रस्ट, बदलापूर (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १८.८.२०१३ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) वेगवेगळ्या कायद्यांवर महिलांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १५० पेक्षा जास्त महिला कार्यक्रमाला उपस्थित होत्या. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष श्रीमती दर्शना दामले हया होत्या.

२. फोरम व रोटरी कल्ब ऑफ डोंबिवली (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २२ सप्टेंबर २०१३ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत) डोंबिवली (पूर्व) येथे महिलांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. डोंगरे उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते.

३. जादूटोणा विरोधी अध्यादेशावर परिसंवाद आयोजित करण्यासंदर्भात व्ही.आय.पी. रुम, यशवंतराव चव्हाण सेंटर, चौथा मजला येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. १७ ऑक्टोबर २०१३ रोजी एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बेठकीस १२ सदस्य उपस्थित होते.

४. जादूटोणा विरोधी कायदा तयार करण्यासंदर्भात रंगस्वर, यशवंतराव चव्हाण सेंटर, चौथा मजला येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. ३ डिसेंबर २०१३ रोजी एका चर्चासत्राचे (सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत) आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून निवृत्त न्यायामूर्ती श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी हे होते.

५. फोरम व मैत्री संस्था, करी रोड, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २४ नोव्हेंबर २०१३ रोजी (सकाळी १०.०० से सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत) डॉ. शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई येथे महिला व पुरुषांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. सुरज भोईर उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते.

६. फोरम व गायत्री चॅरिटेबल ट्रस्ट, बदलापूर (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ८.१२.२०१३ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) विद्यार्थ्यांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १५० पेक्षा जास्त विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष श्रीमती दर्शना दामले ह्या होत्या.

७. फोरम व शिल्ड फाऊंडेशन, माटुंगा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २९ डिसेंबर २०१३ रोजी (सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत) मुंबई येथे अर्ध्या दिवसासाठी महिलांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त महिला कार्यक्रमाला उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून श्रीमती स्वाती इंगळे ह्या उपस्थित होत्या. व्याख्यानाचे माध्यम मराठी व हिंदी होते.

८. फोरम व अस्तित्व संस्था, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ५ जानेवारी २०१४ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) अस्तित्व संस्था, एम.आय.डी.सी., पेंढारकर कॉलेजच्या जवळ, डोंबिवली (पूर्व), येथे अपंग मुलांच्या पालकांसाठीसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १५० पेक्षा जास्त पालक कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणू सौ. राधिका गुप्ते ह्या उपस्थित होत्या. व्याख्यानाचे मराठी मराठ होते.

**शपथ कार्यक्रम** : - सर्व विधी साक्षरता कार्यशाळांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे सांघिक वाचन करण्यात येते. तसेच संविधानातील मूलभूत कर्तव्य पालनासंबंधी शपथा घेण्यात येतात. त्याचप्रमाणे अविवाहित मुले व मुली यांच्याकडून हुंडाबंदीसंबंधी शपथा घेण्यात येतात.

**कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे** : - विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करुन देण्यात येते त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश असतो. (१) भारतीय संविधान, (२) विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडाबंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड संहिता १९६० (५) ग्राहक संरक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छा पत्र कायदा, (८) गुंतवणूकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, (१०) माहितीची अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह कायदा १९५५, (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह अधिनियम १९५४, (१९) बाल विवाह बंदी अधिनियम २००५, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९८८, (२१) न्यायालयांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal oppurtunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995 (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Prevention) Act, 1956 (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॉपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई

विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३)( महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्रविकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७, (४०) नगरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटर वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५०.

❑❑❑

## समर्पणाची शक्ति

लहानपणी मी कराडला संगमावर बसत असे. कोठून तरी येणारे आणि कोठेतरी जाणारे ते 'जीवन' मी रोज पाहत असे. कोणासाठी तरी ते धावत होते. त्यात खंड नव्हता. 'जीवना'ला एक लय होती, पण ते लयाला गेलेले मी कधीच पाहिले नाही. ते जीवन नित्य नवीन होते. त्याचा जिव्हाळा कधी आटला नाही.

जीवन परकोटीचे समर्पित असेल, तर ते कधीच जीर्ण होत नाही. चंद्र कधी जुना होत नाही. सूर्याला म्हातारपण येत नाही. दर्या कधी संकोचत नाही. यांतील प्रत्येकाच्या जीवनात पराकोटीचे समर्पण आहे, पण अनंत युगे लोटली तरी विनाश त्यांच्याजवळ पोहोचलेला नाही. काळाने त्यांना घेरलेले नाही. त्यांचा कधी कायापालट नाही, स्थित्यंतर नाही. ते निःश्वसन अखंड आहे.

– यशवंतराव चव्हाण

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ
## कार्यवृत

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, येथील महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना संतोष पवार यांचे सहकार्य असते.

समाजाला उपयुक्त परंतु कोठेही उपलब्ध नसलेले अगदी अत्यल्प फी घेऊन उतम दर्जाचे प्रशिक्षण महिला व्यासपीठातर्फे दिले जाते. मुंबई मध्ये अनेक सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत व त्यांचे कार्य चांगले चालण्यासाठी बऱ्याचशया गोष्टींचे ज्ञान असणे गरजेचे आहे. हा विचार घेऊन २०१० पासून महिला व्यासपीठातर्फे पुरुष व महिलासाठी सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण घेण्यात आले. ह्यावर्षी नववा वर्ग ऑगस्टमध्ये सुरु झाला. गृहनिर्माण संस्थाबद्दलची संपूर्ण माहिती साधरण २७ दिवस दुपारी अडीच ते साडेपाच अश्या वेळात ह्या कार्यशाळेला मा. प्रभाकर चुरी, मा. प्रशांत कानविंदे, अड प्रमोद कुमार व सहकारी क्षेत्रातील इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळते. या कार्यशाळेचे फायदे म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्थेत पूर्णवेळ/अर्थवेळ नोकरी मिळू शकते. तसेच हे प्रशिक्षणार्थी सल्लागार म्हणूनही चांगले काम करु शकतात व आपल्या स्वतःच्या राहत्या सोसायटीत मनेजिंग कमिटीत चांगले काम करु शकतात. तसेच सामाजिक ज्ञान/भान याची जाणीव होते.

तसेच महाराष्ट्र महिला व्यासपीठ व निर्मला निकेतन कॉलेज ऑफ होम सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने ''गृहव्यवस्थापन प्रशिक्षण सातवी बाब कार्यरत होती. महिलांचा सर्वागीण विकास हा या प्रशिक्षणाचा हेतू आहे. या प्रशिक्षणात वेगवेगळे २७ विषय शिकविले जातात. महिलांचे कायदे, भरतकाम, साडी ड्रेपिंग, जेवणाची रुपरेषा, प्रांतीय पदार्थ, वेळेचे व पैशाचे नियोजन, संस्कारभारती रांगोळी, इ. अनेक विषयांची ओळख होते. महिनला नंतर टिफिन सर्विस सुरु करु शकतात, इतर घरांच्या व्यवस्थापनाचे कामहि सांभाळू शकतात.

समाजातील वाढता हिंसाचार व महिलावरील अत्याचार व विषयावर मार्गदर्शन व स्वसंरक्षण कसे करावे यांची प्रात्यक्षिके असा कार्यक्रम दिनांक ११ ऑक्टोबर रोजी दुपारी २ ते ५.३० या वेळेत आयोजित केला होता. मा. चेतना कोरगावकर यांचे मार्गदर्शन लाभले. मोठ्या संखेने लोक उपस्थित होते.

दिनांक ११ नोव्हें २०१३ ते २ डिसे २०१३ या कालावधीत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि बॉम्बे चाप्टर ओहरास्कूल ऑफ इकेबना जपान यांच्या संयुक्त विद्यमाने इकेबाना (जपानी पद्धीची फुलांची रचना) या प्रशिक्षणाचे वर्ग घेतले. या कार्यशाळेसाठी दिनांक २८ ऑक्टोबर २०१३ ला या प्रशिक्षणाचा निःशुल्क वर्ग घेण्यास आला होता. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. मा. नलिनी डुंगरसी व त्यांच्या दोन सहाय्यिका यांचे प्रशिक्षणाला मार्गदर्शन मिळाले. यात वेगवेगळी फुले व इतर साहित्य वापरुन सजावट कशी करावी याचे मार्गदर्शन प्रशिक्षनार्थिना मिळाले.

दिनांक २६/११/२०१३ ते १८/१२/२०१३ या कालावधीत वारली रंगकला याचे प्रशिक्षण घेतले गेले. १३ प्रशिक्षनार्थिनी हे प्रशिक्षण यशस्वी पूर्ण केले. मा. वंदना पवार यांनी ह्या प्रशिक्षणाला मार्गदर्शन केले. यात कपडया वर, लाकडावर रंगकाम तसेच पेपर बॅग, शुभेच्छा कार्ड, पाकिटे बनविणे व त्यावर वारली कलाकुसर शिकवली. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी प्रशिक्षनार्थिनी केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आयोजित केले गेले.

वर्षभरात महिला व्यासपीठातर्फे ''सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण'' वारली, इकेबाना मधुबनी रंगकला, रांगोळी असे प्रशिक्षणाचे वर्ग घेतले जातात.

❑❑❑

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय, मुंबई
# कार्यवृत्त

प्रस्तावना - आज तंत्रज्ञानाने प्रत्येक क्षेत्रात महत्वाचे स्थान प्राप्त केले आहे. त्यामुळे दैनंदिन जीवनातील प्रत्येक घडामोडी तंत्रज्ञानावार अवलंबू लागल्या आहेत. (उदा. इंटरनेट, भ्रमणध्वनी, वाहन) अशी बरेचशी उपकरणे आहेत ज्याशिवाय माणसाने जीवन विस्कळीत होऊ शकते. तंत्रज्ञानही आजच्या काळाची गरज आहे. तंत्रज्ञानाच्या बाबतीत ग्रंथालय कसे मागे राहू शकते, कारण प्रत्येक क्षेत्रात आज संगणकावर कार्यप्रणाली केल्या जातात त्याच प्रमाणे ग्रंथालय क्षेत्रात सुद्धा संगणकाचा वापर होऊ लागला आहे.

**ग्रंथालयाचे महत्त्व** - संगणकीय तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयाचे महत्त्वही मोठ्या प्रमाणात वाढत आहे ग्रंथालय फक्त ग्रंथांचेच ही संकल्पना तंत्रज्ञानाने मोडीत काढली आहे. ''ग्रंथालयामध्ये ग्रंथासोबत आणखी माहितीचे स्त्रोत, संदर्भ सेवा अशा अनेक सुविधांनी परिपूर्ण असे आजचे ग्रंथालय आहे. वाचकांना एका छताखाली त्यांच्या आवडीची तसेच अभ्यासाची ग्रंथ व चालू घडामोडी (current awareness service), वैशिष्ठपूर्ण माहिती (selective dissemination of information) अशा ग्रंथालयातील महत्वाच्या सेवा त्वरित तसेच विनामूल्य उपलब्ध करुन दिल्या जातात.

**ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली**(Library management Software) ग्रंथालय व्यवस्थापन प्रणालीमुळे ग्रंथलय कर्मचारी कमी वेळेत जास्तीत जास्त वाचकांना ग्रंथालयाच्या सोयी सुविधांबद्दल तसेच सेवांबद्दल माहिती देऊन वाचकांच्या गरजा भागवू शकतो.

ग्रंथालय संगणकीकरण - ग्रंथालय ही आज काळची गरज आहे. प्रत्येक क्षेत्रात संगणकाचा वापर वाढला आहे. त्याच प्रमाणे ग्रंथालयात संगणकाचा वापर होत आहे. पूर्वीच्या काळी ग्रंथालयातील सर्व प्रक्रिया हाताने केल्या जात असत ग्रंथालायतील देवघेव (Issue, Returning) तथा तालीकीकरण, (Cataloguing) साठा पडताळणी (Stock Verification) अशा मोठ्या प्रक्रिया हया ग्रंथपालास हाताने कराव्या लागत व हयासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ तसेच वेळ लागत असे. परंतु आज संगणक तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रंथ देवघेव, तालीकीकरण व साठा पडताळणी अवघ्या १ मिनटात होते. व हयामुळे मनुष्यबळ कमी लागते तसेच वेळेची बचत होते त्यामुळे ग्रंथालयाचा दर्जा व वापर वाढतो.

खाजकी अज्ञावली, मुक्तद्वार अज्ञावली, मोफत अज्ञावली

तीन प्रकारची अज्ञावली ग्रंथालय व्यवस्थापनेसाठी उपलब्ध आहे.

१. खाजगी अज्ञावली (Commercial Software):- ही अज्ञावली एका विशिष्ठ कंपनीने व्यवसायासाठी तयार केलेली अज्ञावली असते. ही अज्ञावली घेताना आपणांस कंपनीला संपर्क साधून मग त्यांच्या व्यक्तींकडून त्याचे प्रशिक्षण घेऊन आपल्या ग्रंथालयात घ्यावे लागते. व हयाची किमंत साधरणतः लाखांमध्ये असते. त्यामुळे प्रत्येक शालेय तसेच महाविद्यालीन ग्रंथालयांमध्ये आपणास अशी अज्ञावली दिसत नाही अशी अज्ञावली जास्त करुन मोठ मोठ्या खाजगी संस्था, विद्यापीठे अश्या ठिकाणी वापरली जाते.

२. मुक्तद्वार अज्ञावली (Open Source Software):- ही अज्ञावली जास्त करून परदेशांमध्ये तयार होते. तयार झाल्यावर इंटरनेटवर मोफत स्वरुपात ठेवली जाते. जेणे करुन कोणीही ही अज्ञावली कधीही कोठूनही इंटरनेटच्या सहाय्याने आपल्या संगणकावर घेऊ शकतो. तिचा वापर करु शकतो (GNU GPL) License च्या सहाय्याने तिच्या मध्ये हवे तसे बदल करु शकतो, तिचे प्रशिक्षण, कार्यशाळा तसेच वाटप करु शकतो. परंतु हे सर्व करण्यासाठी ग्रंथपाल संगणक शास्त्राचा पदवीधर अथवा त्यात प्रावीण्य असला पाहिजे.

३. मोफत अज्ञावली (free Ware Software):- मोफत अज्ञावली ही एका विशिष्ठ संस्थेद्वारे ना नफा ना तोटा या स्वरुपावर तयार केली जाते. त्यावर संस्थेचे बंधन असते. त्यामध्ये कोणीही बदल अथवा वाटप करु शकत

नाही ही आज्ञावली सुद्ध्या मोफत इंटरनेटवर संस्थेच्या संकेतस्थळावर ठेवण्यात येते. जेणे करुन कोणीही तिचा यापर करु शकेल. परंतु या अज्ञावलीचे प्रशिक्षण आपणांस त्याच संस्थेकडून घ्यावे लागते.

या सर्व वर्णनांवरून असे दिसून येते की, खाजगी अज्ञावली घेण्यासाठी शैक्षणिक संस्था, शाळा महाविद्यालय हे आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजेत. जेणे करुन त्यांचा वार्षिक देखभाल खर्च सोसता येईल जर मुक्तद्वार अज्ञावली घेतली तर त्यामध्ये तांत्रिक दृष्टया ग्रंथपाल सक्षम असला पाहिजे परंतु ग्रंथपाल संगणक शास्त्र क्षेत्रातून येत नसल्यामुळे त्यांना मुक्तद्वार अज्ञावलीमध्ये काम करणे अवघड जाते त्यामुळे ग्रंथपाल त्याकडे पण वळत नाही. त्यामुळे शेवटचा पर्याय जर ग्रंथपालाने निवडला तर तो ना आर्थिक ना तांत्रिक दृष्टया मागे पडतो मोफत अज्ञावली ही मोफत स्वपरुपात असून ती समजण्यास सोपी व स्थानिक भाषेमध्ये उपलब्ध असते. त्यामुळे ग्रंथपाल हिचीच निवड करतो त्यामुळे ग्रंथालयाच्या जगात ग्रंथालय अज्ञावलीचे महत्व वाढत चालले आहे.

ग्रंथालयातील मोड्यूल्स (modules)

**Administration:-** सर्वात महत्वाचे आणि सुरुवातीचे मोड्यूल्स हे यामध्ये अज्ञावलीचे व्यवस्थापन केले जाते यामध्ये जसे की ग्रंथालयातील पात्रांचे नमुने, ग्रंथ विक्रेते, ग्रंथालय समिती, ग्रंथालय डेटा बॅकप अशी काही महत्वाची आणि एकाच वेळा भरणारी माहितीची या ठिकाणी संचय करुन ठेवली जातो. जेणे करुन ज्या वेळेस आपण संबंधीत माहितीसंबंधी कृती करु त्यावेळेस ती माहिती आपणास त्वरित त्या त्या ठिकाणी भरता यावी.

**Book Acquisition :-** या मोड्यूल्समध्ये ग्रंथ खरेदीसाठी करण्यात येणारी जी पारंपारिक प्रक्रिया आहे. त्या संबंधी माहिती असते. ग्रंथाची मागणी जेव्हा ग्रंथालयात होते त्यावेळेस ग्रंथपाल त्या मागणीतील ग्रंथासाठी एक मागणी पत्र तयार करुन वरिष्ठांकडून परवानगी घेतो. वरिष्ठांशी त्या मागणीसाठी परवानगी दिल्यानंतर ग्रंथपाल त्याची मागणी ग्रंथविक्रेत्याकडे करतो. त्या नंतर ग्रंथ ग्रंथविक्रेत्याकडून प्राप्त झाल्यानंतर ग्रंथपाल त्याची नोंद दाखलनोंद वहीमध्ये करतो. त्याचे बिल तयार करून ग्रंथ विक्रेत्याला देतो. ही सर्व प्रक्रिया आधी ग्रंथपाल हाताने करत असत पण आता ग्रंथालयाच्या या मोड्यूल्समुळे हे काम संगणकीकृत झाले व हयासाठी अवघे १० मिनिटे लागतात.

**Cataloguing :-** या मोड्यूल्समध्ये ग्रंथ खरेदी केल्यानंतर ग्रंथांची नोंद सरळरीत्या केली जाते कोणतेही खरेदी पद्धत न वापरता. त्यानंतर हयामधून बारकोडिंग (bar coding) केली जाते. साठा पडताळणी (stock verification) या सारखी वेळखाऊ व जास्त मनुष्यबळाचे काम हया अज्ञावलीमुळे अवघ्या मिनिटांमध्ये होऊ लागले आहे. ग्रंथालयातील काही हरवलेली ग्रंथ, ग्रंथालयातून काढून टाकलेली, तसेच बायंडीग केलेले ग्रंथांची यादी आपणास येथे मिळू शकते.

**Circulation :-** या मोड्यूल्समध्ये ग्रंथालयातील सभासदांची वर्गवारी तसेच नोंद केली जाते. प्रत्येक वाचकांना त्यांचे बारकोडसहित ओळखपत्र अज्ञावालीद्वारे निर्मित केले जातात. ज्या वेळेस वाचक ग्रंथालयात येतो त्यावेळेस तो ते ओळखपत्र ग्रंथपालास देतो ग्रंथपाल त्यास बारकोड मशीन (barcode scanner) द्वारे पडताळणी करुन नवीन ग्रंथ त्यास देतो अथवा घेतो. व ही सर्व माहिती अज्ञावली लगेच समोर दाखवते. व त्यानंतर गेट पास तयार होतो व वाचकाला ग्रंथ दिला जातो.

**Serials :-** या मोड्यूल्समध्ये वार्षिक मासिके खरेदी संदर्भात जी प्रक्रिया केली जाते ती हया अज्ञावली द्वारे करावी लागते. त्यामुळे वर्षानुवर्षाची माहिती यात कायम राहते. मागच्या वर्षी कोणते मासिक घेतले या वर्षी कोणते हवे आहे. असे आपणास त्वरित बघता येते अन्यथा मागील वर्षाची नस्ती शोधावी लागते तीपण जीर्ण झालेली असते त्यामुळे ग्रंथालय अज्ञावलीमधील हे मोड्यूल अत्यंत गरजेचे आणि उपयुक्त असे आहे.

**News Paper Clipping :-** ग्रंथालयात वृतपत्र कात्रण करणे हे ग्रंथपालाचे एक महत्वाचे काम असते ती कात्रणे काढून कोऱ्या कागदावर चिटकवून ती जपून ठेवणे या सर्व प्रक्रीये मध्ये भरपूर वेळ वाया जातो. त्यामुळे या अज्ञावलीत वृतपत्र कापून ते स्कॅन (scan) करून त्याचा असंख्य इतका संचय तयार करता येतो. त्यानंतर कार्यशाळेचा आढावा (workshop report) (article) असे काही महत्वाचे कागदपत्र येथे साठवली

जातात, व गरजेनुसार त्यांचा संदर्भासाठी उपयोग केला जातो.

**WEBOPAC/OPAC:-** या मोड्यूल्समुळे ग्रंथालयात उपलब्ध असलेली सर्व ग्रंथ, मासिके, वृतपत्र कात्रणे, यांचा शोध ग्रंथालयात न जाता घेऊ शकता. यामुळे वाचकांचा वेळ तसेच ग्रंथपालाचा वेळ वाचतो. अज्ञावली नसलेल्या ग्रंथालयात ग्रंथपालास स्वतः कपाटाजवळ जाऊन ग्रंथ काढून द्यावी लागतात. परंतु या अज्ञावलीतील या मोड्यूल्समुळे वाचक स्वतः ग्रंथ, कपाट नंबर व जागा संगणकावर शोधून ग्रंथ काढून ग्रंथपालाकडे आणून देतात. यामुळे वाचकाला ग्रंथालयाची आवड निर्माण होते.

काही महत्वाच्या सेवा (special features)

१. **बारकोंडिग (Bar coding) -** बारकोर्डीग तंत्रज्ञानाचा वापर ग्रंथालयातील प्रत्येक ग्रंथावर केला जातो तसेच वाचकांच्या ओळखपत्रांवर याचा उपयोग होतो. जेणे करुन ज्यावेळेस वाचक ग्रंथालयात येतो त्यावेळेस ग्रंथपाल बारकोड मशीन ने कार्ड स्कॅन करताच वाचकांची सर्व माहिती संगणकावर येते. त्यानंतर वाचक ग्रंथ पसंत करुन ग्रंथपालास दिल्यास ग्रंथपाल त्यास स्कॅन करतो व वाचकाला ग्रंथ अवघ्या ५ सेकंदात मिळतो. बऱ्याचशा ग्रंथालयात बारकोड तयार करण्यासाठी वेगळी मशीन खरेदी करावी लागते. ही मशीन महाग असते परंतु ई-ग्रंथालयात बारकोड सुविधा विनामूल्य आहे.

२. **आय कार्ड्स (I-Cards) -** प्रत्येक ग्रंथालयात वाचकांना ओळखपत्र हे दिलेच जाते. परंतु प्रत्येक ग्रंथालयात कार्ड्स सदस्य नोंदणी झाल्यानंतर दिले जाते. अज्ञावली मुळे सदस्य नोंदणी झाल्याबरोबर ५ सेकंदात कार्य तयार होतात. व ते त्वरित वाचकांना दिले जातात. त्यामुळे वाचकांचा वेळ वाचून ग्रंथालयाचा प्रिंटिंगचा खर्च वाचतो.

३. **दाखल नोंदवही (Accession Register) -** प्रत्येक ग्रंथालयात नवीन ग्रंथांची नोंद दाखल नोंदवहीमध्ये करावीच लागते. परंतु काही वेळेस ग्रंथालयात ग्रंथ मोठ्या संख्येत येतात. त्यावेळेस ग्रंथपालास त्याकामासाठी काही शिकाऊ विद्यार्थी नेमून हे काम करून घ्यावे लागते. परंतु ग्रंथालय अज्ञावली च्या सहाय्याने ग्रंथालयात दाखल होणाऱ्या प्रत्येक ग्रंथांची नोंद सरळ ग्रंथालय अज्ञावलीत केली जाते. त्यानंतर ई-ग्रंथालय कार्यप्रणालीतून दाखलनोंद वही तयार होते व आपले लिहिण्याचे काम वाचते.

**सारांश (Conclusion) :-** ग्रंथालय फक्त ग्रंथाचे राहिले नसून ग्रंथपाल फक्त ग्रंथाचे पालक न राहता तो तंत्रज्ञानासोबत वाटचाल करतोय. आज ग्रंथपाल (Information Scientist, Information Officer, Documentalist Cataloguer, Classifier, Library Consultant.) अशा पदांवर कार्यरत आहे. हे सर्व शक्य झाले ते तंत्रज्ञानामुळे, प्रत्येक जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय सूचना केंद्राची (NIC) शाखा असल्यामुळे कोणत्याही अडचणी असल्यास आपणांस त्वरित उत्तर मिळते. सध्या अनेक शासकीय, निशासकीय तसेच खाजगी संस्थांच्या ग्रंथालयात याचा यशस्वी वापर होत आहे. ग्रंथालयाचे सर्व कामकाज संगणकाद्वारे करणे शक्य झाले आहे. त्यामुळे वाचक व ग्रंथालय यांच्यातील संबंध सुधारून ग्रंथालय कामाची कार्यतत्परता वाढली आहे.

**ग्रंथालयाविषयी माहिती:-**

यशंवतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शेती, सहकार, इतिहास, कायदा, संस्कृती इत्यादी विषयांवरील पुस्तके. चरित्रे व आत्मचरित्रे, धर्मकोष, विश्वकोष, मराठी विश्वकोष, गॅझेटियर ॲटलॉस इअर बुक, डिक्शनरीज इत्यादी संदर्भ ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध आहेत. तसेच वेळोवेळी संबंधित विषयाला अनुरुन नवीन पुस्तके ग्रंथालयासाठी घेण्यात येतात. ग्रंथालयामध्ये एकंदरीत २२००० इतका ग्रंथसंग्रह उपलब्ध करण्यात आली. ग्रंधालयामध्ये असलेली पुस्तके आणि नव्याने खरेदी करण्यात येणारी पुस्तके वाचताना सहज उपलब्ध व्हावी याकरीता **ओपॅक,** कॅटलॉग सुरु केला आहे. यामध्ये लेखक, ग्रंथनाम, प्रकाशन, विषय, वर्गांक यासंज्ञेच्या सहाय्याने वाचताना माहिती मिळविता येते आणि पाहिजे त्या ग्रंथाचा शोध घेता येतो.

२. **ग्रंथालयाचे नियम:**

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता नमुना अर्ज तयार केला आहे. या अर्जामध्ये स्वतःच्या हस्ताक्षरात परिपूर्ण माहिती भरुन त्यासोबत पुढीलप्रमाणे वर्गणी भरणे आवश्यक आहे.

अ) **सर्वसाधारण सभासदः**

सर्वसाधारण सभासदाकरीता रु. ५००/- वार्षिक वर्गणी तसेच रु. ५००/- अनामत रक्कम (१९९६ पासून)

ब) **विद्यार्थी सभासदः**

महाविद्यालयीन/उच्चशिक्षण/संशोधक विद्यार्थ्यांकरीता वार्षिक रु. ५०/- नाममात्र वर्गणी व अनामत रक्कम रु. १००/- दि. (१.८.०८ पासून)

क) यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये संदर्भाकरीता काही विद्यार्थी एक दिवस ते एक आठवडा या कालावधीकरीता ग्रंथालाचा लाभ घेतात. या विद्यार्थ्यांकडून रु. ५०/-

एका आठवडयाला फी आकारण्यात येते. त्यांच्याकडून फक्त एका कार्डवर त्यांची वैयक्तिक माहिती भरुन घेण्यात येते.

ड) माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी शिक्षण घेणारे विद्यार्थी संगणकविषयक पुस्तकांचा लाभ घेतात. त्याकरीता ग्रंथालय वेगळी फी आकारत नाही.

इ १) **संयुक्त संस्था सभासदत्व**

कार्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल. एकावेळची वर्गणी रु. ५०,०००/-, ५ वर्षासाठी.

**अनामत रक्कम :-** सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येणार नाही. परंतु एखाद्या दुर्मिळ व किमंती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी रक्कम घेण्यात येईल.

**एका वेळी देण्यात येणारी पुस्तके:-** एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देता येतील.

इ २) **संस्था सभासदत्व**

यासाठी शिक्षण व संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधन संस्था ही युजीसी आय.सी.एस.एस.आर., आय.सी.सी.आर किंवा आय.सी.एच.आर. यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली असावी, तर सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन केंद्र शासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

**संस्था सभादत्वासाठी :-** प्रवेश फी रु. १,०००/- ना परतावा

**वार्षिक वर्गणी :-** रु. ५,०००/-

**दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासद :-** एकावेळी ५ वर्षासाठी वर्गणी रु. २०,०००/-

**एका वेळी देण्यात येणारी पुस्तके :-** एखावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देण्यात येतील.

इ-१ व इ-२ येथील सभासदत्व हे संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येईल. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येईल. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्या वतीने पुस्तके घेणास/परत करण्यास नामनिर्देशित करु शकतील. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागेल. मात्र पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे यांची जबाबदारी संस्था प्रमुखांची असेल.

वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्ठानला राहील.

३. **सर्वसाधारण सभासद** : सभासदांना एकावेळी एक पुस्तक/ग्रंथ देण्यात येईल ते आठ दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकांच्या किमंतीएवढी अनामत रक्कम भरुन पुस्तक घरी नेता येईल.

४. महाविद्यालीयन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांना ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/संदर्भासाठी देण्यात येतात. घरी/ग्रंथालयाबाहेर नेण्याकरीता देण्यात येणार नाही.

❑❑❑

# विभागीय केंद्र कोकण
# कार्यवृत्त

- **स्वातंत्र्य ज्योत रॅली दि. १४ ऑगस्ट २०१३**

भारताचे पहिले पंतप्रधान स्व. पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री १२ वा. लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकविला. त्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी व राष्ट्रीय विचारांविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण व्हावी म्हणून दि. १४ ऑगस्टच्या मध्यरात्री ११.०० ते १२.०० या वेळेत रत्नागिरी जिल्हयाच्या ठिकाणी विविध सामाजिक संस्थांचे सहाय्य घेवून विभागीय केंद्र कोकण जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने स्वातंत्र्य ज्योत मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. याला रत्नागिरीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल. विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यासंह मान्यवर व्यक्ती संख्येने सहभागी झाले होते.

स्वातंत्र्य ज्योत मिरवणूकीची सुरूवात टिळक जन्मभूमी येथून होऊन जिल्हा शासकीय रूग्णालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या येथे समारोप करण्यात आला. मिरवणूकीदरम्यान लक्ष्मी चौकातील स्व. सावरकरांच्या पुतळयाला मानवंदना देण्यात आली. अनेक देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. रत्नागिरी जिल्हा रूग्णालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबडेकरांच्या पुतळ्याला अभिवादन करून स्वातंत्र्य ज्योत मिरवणूकीची सांगता करण्यात आली. यावेळी भारताच्या संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले त्याचप्रमाणे देशभक्तीपर गीते म्हणण्यात आली.

स्वातंत्र्य ज्योत मिरवणूकीला कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हाध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे, माजी जिल्हाध्यक्षा मा. युगंधरा राजेशिर्के, जिल्हा समिती सदस्य श्री. सिध्देश लाड, श्री. अभिजित खानविलकर, श्री. कृ. आ. पाटील, श्री. अविनाश काळे, श्री. राहुल सुर्वे तसेच नवनिर्माण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अभिजित हेगशेटये, फिनोलेक्स इंडस्ट्रीजसे जनसहभाग अधिकारी मा. श्री. अशोक तातुगडे, माहेर संस्थेचे श्री. सुनिल कांबळे, श्री. विनोद वायंगणकर, आभार संस्थेचे श्री. वासुदेव वाघे सकाळ मधुरांगणच्या सहसंयोजिका सौ. यशश्री पुरोहित, गुरूकुल प्रतिष्ठानच्या कु. पल्लवी राणे आदींचे सहकार्य मिळाले. वा मिरवणूकीमध्ये रत्नागिरी जिल्हयाचे पालकमंत्री मा. ना. उदय सामंत सहभागी झाले होते.

- **रक्षाबंदन कार्यक्रम २२ ऑगस्ट २०१३**

विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरीच्या वतीने दि. २२ ऑगस्ट २०१३ रोजी प्रतिष्ठानच्या कार्यालयामध्ये रक्षाबंधनाचा अनोखा कार्यक्रम करण्यात आला.

रक्षाबंधन म्हणजे बहिणींकडून भावाला रक्षणासाठी राखी बांधण्याची प्रथा पूर्वापार चालत आलेली आहे. मात्र आज समाजात घडणाऱ्या अनेक दुर्दैवी घटनांमध्ये एखाद्या महिलेवर अत्याचार होत असताना सर्व लोक बघ्याची भूमिका घेतात. त्यामुळे महिलांवरील होणारे अन्याय स्वसंरक्षातून रोखण्यासाठी रत्नागिरीतील महिलांनी एकत्र येऊन आपल्या रक्षणासाठी एकमेकींना राख्या बांधून समाजाला वेगळा संदेश दिला.

यावेळी रत्नागिरी जिल्हा समितीच्या अध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे व बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

- **दि. ४ सप्टेंबर २०१३**

कोकण विभागीय केंद्र, जिल्हा समिती रत्नागिरी व फिनोलेक्स इंडस्ट्रीज, रनपार, रत्नागिरी यांचे संयुक्त विद्यमाने दि. ४ सप्टेंबर २०१३ रोजी फणसोप, रत्नागिरी येथे महिलांसाठी खोबऱ्यापासून विविध पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी जिल्हा समिती रत्नागिरीच्या अध्यक्षा मा. श्रीम. प्राची शिंदे, फिनोलेक्स इंडस्ट्रीज, रनपार रत्नागिरीचे सहाय्यक जनसंपर्क अधिकारी मा. श्री. अभिषेक साळवी व बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

प्रशिक्षक सौ. स्वाती वारंग यांनी महिलांना कोकोनट कॅन्डी, कोकोनट बर्फी, लाडू, खोबऱ्यापासून पेढे व पोळी इ. पदार्थ करून दाखविले. महिलांनीही यामध्ये सहभाग घेतला.

- **दि. ६ सप्टेंबर २०१३**

विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने दि. ६ सप्टेंबर २०१३ रोजी 'शिक्षक दिनाचे' औचित्य साधून मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष मुंबई विद्यापिठाचे राज्यशास्त्राचे प्राध्यापक मा. डॉ. दीपक पवार यांचे व्याख्यानाचा कार्यक्रम रत्नागिरी येथील पटवर्धन हायस्कूलच्या ठाकूर सभागृहात सकाळी ११.०० वा. संपन्न झाला. यावेळी स्व. चव्हाण साहेबांच्या पुस्तकांचे व रेखाचित्रांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.

कार्यक्रमाला कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हाध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे, व्याख्याते मा. प्रा. डॉ. दीपक पवार, पटवर्धन हायस्कूलचे प्रा. वाघमारे, प्रा. कदम विभागीय समिती सदस्या मा. सौ. जानकीताई बेलोसे व जिल्हा समिती सदस्य तसेच बहुसंख्य शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुरुवातीला कै. डॉ. नरेंद्रजी दाभोळकर व कै. जयंतराव साळगावकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. जिल्हाध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे यांनी केले तर पाहुण्यांची ओळख जिल्हा समिती सदस्य मा. प्रकाश उर्फ बापू काणे यांनी करून दिली.

व्याख्याते मा. डॉ. दीपक पवार यांनी आपल्या व्याख्यानामध्ये स्व. चव्हाण साहेबांच्या राजकीय जीवनातील दोन्ही बाजू मांडल्या. 'असा माणूस या पृथ्वीतळावर होवून गेला याच्यावर विश्वास बसणार नाही' हे वाक्य स्व. यशवंतराव चव्हाण यांचेबाबत बोललो तर वावगे ठरणार नाही. ज्या राजकारणाची चव्हाण साहेबांनी महाराष्ट्राला सवय लावली त्यापेक्षा वेगळे राजकारण आज चालू आहे. जेथे वाचनाची, विचार करण्याची सवय लुप्त होत आहे तेथे चव्हाण साहेबांचे विचार मांडणे म्हणजे 'ब्रह्नहत्या' करण्यासारखे आहे, असे प्रा. दीपक पवार यांनी सांगितले.

अनेक लोकांशी चव्हाण साहेबांनी पत्रव्यवहार केला आहे. त्यातूनच चव्हाण साहेबांचे चरित्र लिहिले गेले आहे. त्यांनी जातीचे राजकारण कधी केले नाही. एका पत्रकार परिषदेमध्ये पत्रकारांनी त्यांना विचारले, 'हे राज्य मराठी का मराठा होणार आहे?' त्यावर 'हे राज्य मराठ्यांचे नसून मराठी लोकांचे आहे.' असे उत्तर चव्हाण साहेबांनी दिले. त्यांनी स्वतःची भूमिका लवादाची ठेवली. माणसं न तुटता जास्तीत जास्त कामं झाली पाहिजेत असं त्यांचे मत असे.

शिवाजी नंतरचा 'जाणता राजा' म्हणून चव्हाण साहेबांचा उल्लेख केला जातो परंतु शिवाजी महाराजांच्या स्वभावातील आक्रमकता चव्हाण साहेबांमध्ये नव्हती. त्यामुळे ते राजकारणातील अत्युच्च शिखर गाठू शकले नाहीत. अशी खंत मा. प्राध्य. डॉ. दीपक पवार यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की 'शिक्षक दिन' हा केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही वेगवेगळ्या तारखांना साजरा केला जातो. चव्हाण साहेबांनी आपले पूर्ण जीवन गोरगरीबांचे हितासाठी घालविले. चव्हाण साहेबांचे राजकारण हे पारदर्शक होते. मात्र त्यावेळेपेक्षा आजच्या राजकारणाचे चित्र विदारक आहे, अशी खंत मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनी व्यक्त केली.

माजी जिल्हाध्यक्षा मा. युगंधरा राजेशिर्के यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मा. विनायक हातखंबकर सर यांनी केले.

# विविध विभाग व विभागीय क्रेंदांच्या उपक्रमांची क्षणचित्रे




विभागीय केंद्र, औरंगाबाद
'लोकसंवाद' ग्रंथचर्चा गर्जा महाराष्ट्र



विभागीय केंद्र, औरंगाबाद
बिस्मिल्लाह खान शहनाई महोत्सव




विभागीय केंद्र, नाशिक
'शिक्षण कट्टा'




विभागीय केंद्र, नाशिक
नाशिक ऑन ग्रिन व्हील



विभागीय केंद्र पुणे
'दिवाळी पहाट' कार्यक्रम



विभागीय केंद्र, पुणे
'पर्वती चढणे – उतरणे' स्पर्धा



विभागीय केंद्र, कोकण
मा. यशवंतराव पुण्यतिथी कार्यक्रम



विभागीय केंद्र, कोकण
ज्येष्ठ नागरिक दिन आनंद मेळावा




विभागीय केंद्र, नागपूर
ज्येष्ठ नागरिक कृतज्ञता मेळावा



विभागीय केंद्र, नागपूर
लिहित्या स्त्रियांची कार्यशाळा





विभागीय केंद्र, लातूर





विभागीय केंद्र, कऱ्हाड

माहिती व तंत्रज्ञान प्रबोधनी





पर्यावरण संवर्धन अभियान
घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा

नवमहाराष्ट्र युवा अभियान आयोजित
'युवा स्वातंत्र्यज्योत रॅली', औरंगाबाद







शिक्षण विकास मंच आयोजित राष्ट्रीय शिक्षण दिन परिषद





नवमहाराष्ट्र युवा अभियान आयोजित
'युवा स्वातंत्र्यज्योत रॅली', बुलढाणा

नवमहाराष्ट्र युवा अभियान आयोजित
'युवा स्वातंत्र्यज्योत रॅली', सटाणा (नाशिक)





नवमहाराष्ट्र युवा अभियान - अभिसरण, पश्चिम महाराष्ट्र ते मराठवाडा





अपंग हक्क विकास मंच

- **ज्येष्ठ नागरिक दिन कार्यक्रम दि. १ ऑक्टोबर २०१३**

कोकण विभागीय केंद्राचे वतीने १ ऑक्टोबर या जेष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून राधाकृष्ण सांस्कृतिक भवन माणगाव तिठा, ता. कुडाळ, जि. सिंधुदूर्ग येथे निवडक जेष्ठ नागरिकांचा सत्कार व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सिंधुदूर्गचे प्रसिद्ध उद्योजक मा. काका खानोलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिक नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष मा. रा. बा. खानोलकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. प्रतिष्ठानचे कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. राजाभाऊ लिमये यांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्‍घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरूवात ईशस्तवन व स्वागत गीताने करण्यात आले. त्यानंतर स्व. चव्हाण साहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले. विभागीय समितीचे कोषाध्यक्ष मा. श्री. एम. के. गावडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ज्येष्ठांची आठवण करून त्यांचेसाठी कार्यक्रम केले जातात. ज्येष्ठांचे समाजावरील ऋण जाणून त्यांचा सत्कार केला जातो. आजही वृद्धांमध्ये मार्गदर्शन करण्याची जिदद आहे की जिदद पाहून आजच्या तरूणांनी त्यांचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. असे त्यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये सांगितले.

विभागीय समितीचे अध्यक्ष मा. राजाभाऊ लिमये यांनी सांगितेल की प्रतिष्ठानचे वतीने दरवर्षी १ ऑक्टोबरला ज्येष्ठ नागरिक दिन साजरा केला जातो. यादिवशी ज्येष्ठांचे मनोरंजन व्हावे यासाठी आनंद मेळावा घेतला जातो. राज्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान व्हावा हे सर्व क्षेत्रात सांगितले जाते पण प्रत्यक्षात तसे होत नाही. नवीन धोरणांप्रमाणे ज्यांच्या आई वडीलांना वृध्दाश्रमात पाठविले जाते त्यांच्यावर सरकार कारवाई करणार हा निर्णय सरकारने खरोखरच चांगला घेतला आहे, असे त्यांनी सांगितले.

यानंतर ज्येष्ठ नागरिकांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. ज्यावेळी ज्येष्ठांनी मनोगते व्यक्त केली. आई स्वतः उपाशी राहून आपल्या मुलांना मोठं करीत असते. पण मुलं मोठी झाली की आईचे हे ऋण विसरतात. अशी खंत श्री. जोशी यांनी व्यक्त केली. रत्नागिरीच्या जिल्हाध्यक्षा मा. श्रीम. प्राची शिंदे यांनी उपस्थित मान्यवरांचे व जमलेल्या ज्येष्ठांचे आभार मानून आयुष्याची संध्याकाळ सुखाने, समाधानाने घालविण्यासाठी सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा असे सांगून सत्काराचा कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले. सत्काराच्या कार्यक्रमानंतर उपस्थितांना स्नेहभोजन देण्यात आले. यानंतर ज्येष्ठांच्या करमणुकीसाठी कीर्तनकार श्री. श्रीराम झारापकर यांचे सुश्राव्य कीर्तन झाले.

- **प्रशिक्षण कार्यक्रम दि. ८ ऑक्टोबर २०१३**

मुंबई विभागीय केंद्र कोकण जिल्हा समिती रत्नागिरी व फिनोलेक्स इंडस्ट्रिज, रनपार रत्नागिरी यांचे संयुक्त विद्यमाने गोपळ येथील बौद्ध वाडी येथे दि. ८ ऑक्टोबर २०१३ रोजी खोबरापासून विविध पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी रत्नागिरीच्या जिल्हाध्यक्षा मा. श्रीम. प्राची शिंदे, फिनोलेक्सचे सहाय्यक जनसंपर्क अधिकारी मा. अभिषेक साळवी, प्रतिष्ठानचे जिल्हासमिती सदस्य मा. अविनाश काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रतिष्ठान व फिनोलेक्सच्या वतीने देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा महिलांनी सदूपयोग करावा. एखादा नवीन व्यवसाय सुरु करून त्यात यश संपादन करावे असे जिल्हाध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे यांनी उपस्थित महिलांना सांगितले.

प्रशिक्षिका सौ. स्वाती वारंग यांनी हे प्रशिक्षण दिले. यावेळी त्यांनी नारळाच्या पोळ्या, लाडू, कोकोनट चॉकलेट, बर्फी इ. पदार्थाचे प्रात्यक्षिक दाखविले. महिलांनीही त्यामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. प्रशिक्षिका सौ. स्वाती वारंग यांनी उपस्थित महिलांना पदार्थाचे पॅकींग कसे करावे व पदार्थाची किंमत कशी निश्चित करावी हे सांगितले.

उपस्थित महिलांनी आपल्याला उपयुक्त असे प्रशिक्षण दिल्याबद्दल प्रतिष्ठानचे व फिनोलेक्स इंडस्ट्रिजचे आभार मानले.

- **प्रशिक्षण कार्यक्रम दि. १६ ऑक्टोबर २०१३**

विभागीय केंद्र कोकण जिल्हा समिती रत्नागिरी व फिनोलेक्स इंडस्ट्रिज रनपार रत्नागिरी यांचे संयुक्त विद्यमाने फिनोलेक्स फाटा, गोळप येथील पाटणकर हॉल येथे दि. १६ ऑक्टोबर २०१३ रोजी मसाल्याच्या विविध पदार्थांचे प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षिका सौ. स्वाती वारंग यांनी उपस्थित महिलांना गरम मसाला, पनीर मसाला, सांबार मसाला, बिर्यानी पुलाव मसाला, गोडा मसाला, पावभाजी मसाला, चाट मसाला आदी मसाले कसे बनविले जातात याचे प्रात्यक्षिक तसेच मसाल्याचे पॅकींग कसे केले जाते हे दाखविले.

जिल्हाध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे यांनी उपस्थित महिलांना बचतगटाची माहिती सांगून बचतगट कसे स्थापन केले जातात, त्यांचा उद्देश काय हे सांगितले. यावेळी फिनोलेक्सचे सहाय्यक जनसंपर्क अधिकारी मा. श्री. अभिषेक साळवी, प्रतिष्ठानचे जिल्हा समिती सदस्य मा. श्री. अविनाश काळे आदी मान्यवर उपस्थित होते. बहुसंख्य महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

- **स्व. यशवंतराव चव्हाण स्मृतीदिन**

विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने दि. २५ नोव्हेंबर २०१३ रोजी स्व. यशवंतराव चव्हाण यांची २९वी पुण्यतिथी कार्यक्रम येथे प्रतिष्ठानच्या कार्यालयाचे आवारात संपन्न झाला. यावेळी विभागीय समितीचे अध्यक्ष मा. राजाभाऊ लिमये, रत्नागिरी जिल्हा समितीच्या अध्यक्षा मा. प्राची शिंदे, माजी नगराध्यक्ष मा. रविंद्र सुर्वे, जिल्हा समिती सदस्य मा. कृ आ. पाटील, माजी जिल्हा माहिती अधिकारी मा. प्रभाकर कासेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

माजी नगराध्यक्ष मा. रविंद्र सुर्वे यांचे हस्ते स्व. चव्हाण साहेबांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. जिल्हाध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी कार्यक्रम आयोजित करण्यामागचे उद्दिष्ट व महत्व सांगितले. विभागीय केंद्राचे उद्घाटन १६ जून २००५ रोजी झाले त्यावेळीही असाच शामियाना उभारण्यात आला होता. त्यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. केंद्रीय कृषी मंत्री शरद पवारजी आले होते. पवारसाहेबांनी त्यावेळी स्व. चव्हाण साहेबांच्या आठवणी सांगितल्या होत्या त्यांची आज प्रकर्षाने आठवण झाल्याचे मा. जिल्हाध्यक्षा यांनी यावेळी सांगितले.

जिल्हा समिती सदस्य मा. कृ. आ. पाटील यांनी स्व. चव्हाण यांचे व्यक्तीमत्त्वाचे महत्त्व सांगताना सर्व सामान्यांपर्यंत ते कसे पोहोचत याची उदाहरणे सांगितली. त्यानंतर मा. रविंद्र सुर्वे यांनी आपली विचार मांडताना स्व. चव्हाण यांनी महाराष्ट्राचा मंगल कलश आणला. यशवंतरावांचा आदर्श आबालवृध्दांनी घ्यावा, असे मत त्यांनी व्यक्त केले.

साप्ताहिकाचा संपादक या नात्याने त्यांच्या विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे भाग्य मला मिळाल्याने मी यशवंतराव चव्हाण यांना जवळून ओळखले. समाजातील सर्वच घटकांना न्याय कसा मिळवून द्यावा यासाठी त्यांचे प्रयत्न असायचे. त्यांचं कार्यकर्तृत्व भारतातच नव्हे तर साऱ्या जगात सर्वमान्य होते. असे मा. विभागीय अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले.

स्मृतिदिनानिमित्त उपस्थित महिलांना विविध मसाले बनविण्याचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानचे सदस्य, महिला बचत गटांच्या सदस्या आदी महिला उपस्थित होत्या.

❑❑❑

# विभागीय केंद्र, औरंगाबाद
## कार्यवृत्त

'युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली' दि. १४ ऑगस्ट २०१३ विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने दरवर्षी प्रमाणे 'युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली' चे आयोजन करण्यात आले आहे. तरुणांमध्ये स्वातंत्र्याविषयी आदराची भावना निर्माण व्हावी हा या उपक्रमामागील हेतू आहे. रॅलीचा समारोप स्वातंत्र्यसैनिकांच्या उपस्थितीत करण्यात येतो. प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष मा. सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी आपण राज्यातील ५० ठिकाणी या रॅलीचे आयोजन करण्यात आले. विविध महाविद्यालयांच्या तरुण व तरुणींनी या रॅलीत उत्फूर्तपणे सहभाग नोंदवला. तसेच विविध सामाजिक संघटनांनीही या रॅलीत सहभाग नोंदवत स्वातंत्र्य दिन साजरा केला. बुधवार, दि. १४ ऑगस्ट २०१३ रोजी 'युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली' चे सायं. ठिक ७ वा. आयोजन करण्यात आले होते. रॅलीचा मार्ग क्रांतीचौक ते पैठणगेट असा होता.

रॅलीचे उद्घाटन औरंगाबाद जिल्हा परिषद उपाध्यक्षा मा. विजयाताई चिकटगांवकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, कोषाध्यक्ष सचिन मुळे, सचिव मुंकूद भोगले, विश्वनाथ स्वामी, विभागीय संघटक सुबोध जाधव, दीपक जाधव, मंगेश निरंतर, उमेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

- **संगीत महोत्सव दि. ०१ सप्टेंबर २०१३**

मुंबई विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने प्रसिद्ध शहनाईवादक भारतरत्न मा. बिसमिल्ला खॉंन यांच्या पुण्यतिथीनिमित्त संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. खॉंन साहेबांचे शिष्य मा. कल्याण अपार यांनी यावेळी शहनाई वादन केले. 'वैष्णव जन तो' या गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी विशेष अतिथी म्हणून मुंबईचे पं. गजानन साळुंके यांनीही या महोत्सवात शहनाईवादनाने आपली कला सादर केली. त्यांनी विविध चित्रपटांचे गीत शहनाईवर वाजवून रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाला रसिकांनी भरभरुन प्रतिसाद दिला, महोत्सवासाठी सुमारे चारशे ते पाचशे रसिक उपस्थित होते. औरंगाबादसाठी वेगळी पर्वणी घेऊन प्रतिष्ठानने विभागीय केंद्रातर्फे हा महोत्सव दरवर्षी घेण्यात येईल असे यावेळी नीलेश राऊत यांनी जाहीर केले.

महोत्सवाचे उद्घाटन मा. पं. नाथराव नेरळकर व मा. प्रभाकराव भंडारी यांच्या हस्ते झाले. यावेळी मधुकरअण्णा मुळे, नीलेश राऊत, विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

रविवार, दि. ०१ सप्टेंबर २०१३ रोजी सायं ६ वा. तापडिया नाट्यगृह, निराला बाजार, औरंगाबाद येथे झालेला हा कार्यक्रम विभागीय संघटक सुबोध जाधव, मंगेश निरंतर, ऊमेश राऊत, रेणूका कड, दीपक जाधव, राजेंद्र वाळके यांनी यशस्वी केला.

- **'शिक्षण कट्टा' दि. १९ ऑक्टोबर २०१३**

विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीन 'शिक्षण कट्टा' हा शैक्षणिक उपक्रम औरंगाबादेत सुरु करण्यात आला. औरंगाबादेतील पहिल्या शिक्षण कट्ट्याचे आयोजन एम.जी.एम.च्या आईन्स्टाइन सभागृहात, शिक्षण विकास मंचचे मुख्य संयोजक मा. डॉ. वसंत काळपांडे यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आला. या शिक्षण कट्ट्यात 'शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी' या विषयावर चर्चा करुन शिक्षण हक्क कायद्याविषयी सादरीकरण करण्यात आले. तसेच या कायद्यातील चांगल्या बाबी व अंमलबजावणीतील अडचणी यावर विविध शाळांतील प्रयोगशील शिक्षक, विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, पत्रकार व पालक यांना एकत्र आणून सर्वांगीण चर्चा घडवून आणण्यात आली. तसेच शासनस्तरावर प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या

अनुषंगाने होत असलेल्या विविध निर्णयांची योग्य रितीने अंमलबजावणी व्हावी व त्यात सातत्याने सुधारणी व्हावी हा शिक्षण कट्टा आयोजित करण्यामागचा प्रमुख उद्देश होता. या निमित्ताने मराठवाड्यात काम करणाऱ्या शिक्षणविषयक कार्यकर्ते, शिक्षक व पालकांचा एक अभ्यासगट तयार होणार आहे.

यावेळी मेधा कुलकर्णी, अपर्णा कक्कड, रेखा शेळके आदी मान्यवर' उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक राजेंद्र वाळके, रुपेश मोरे, त्रिशूल कुलकर्णी यांनीही यावेळी सादरीकरण केले.

**चित्रपट चावडी**

- **'इनव्हिक्टस' दि. २४ ऑगस्ट २०१४**

विभागीय केंद्र औरंगाबाद व एम. जी. एम. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने दरमहा राबविण्यात येणाऱ्या चित्रपट चावडी या उपक्रमात या महिन्यात सुप्रसिध्द दिग्दर्शक क्लाइंट ईस्टवूड यांचा 'इनव्हिक्टस' हा चित्रपट दाखविण्यात आला. २००९ साली प्रदर्शित झालेला हा चित्रपट प्रसिद्ध लेखक जॉन कार्लीन यांच्या गाजलेल्या 'प्लेइंग द एनिमीः नेल्सन मंडेला ॲण्ड गेम दॅट मेड अ नेशन' या पुस्तकावर आधारीत होता.

नेल्सन मंडेला आफ्रिकेचे अध्यक्ष झाले त्या क्षणापासून चित्रपटाची सुरुवात होते. यानंतर, नेल्सन मंडेला आफ्रिकेतील वर्णभेद ज्या खुबीने हाताळतात व तो संपवण्यासाठी रगबी या खेळाचा ज्या पध्दतीने वापर करतात, याचे चित्रण दिग्दर्शकाने वास्तववादी पध्दतीने केले आहे. यावेळी विभागीय संघटक सुबोध जाधव, उमेश राऊत, त्रिशूल कुलकर्णी, राजेंद्र वाळके, सत्यजित जाधव यांची उपस्थिती होती.

- **'परस्युट ऑफ हैपिनेस' दि. १४ सप्टेंबर २०१३**

सुप्रसिध्द दिग्दर्शक गैब्रिएल म्युचिनो यांचा 'परस्युट ऑफ हैपिनेस' हा चित्रपट दाखविण्यात आला. २००६ साली प्रदर्शित झालेला हा चित्रपट प्रसिद्ध लेखक स्टिवन कॉनरेड यांच्या गाजलेल्या पुस्तकावर आधारीत आहे.

क्रिस गार्डनर या अमेरिकन व्यक्तिभोवती चित्रपटाची कथा फिरतो. एक दारोदार भटकणारा सेल्समन ते यशस्वी शेअर ब्रोकर असा या अमेरिकन व्यक्तिचा प्रवास चित्रपटात अतिशय रंजकतेने चित्रित केला आहे. चित्रपटातील मुख्य अभिनेता विल स्मिथ याला या चित्रपटातील अभिनयासाठी अकादमी पुरस्कार आणि गोल्डन ग्लोब पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते.

- **'द साँग ऑफ स्पॅरो' दि. २६ ऑक्टोबर २०१३**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक माजिद माजिदी यांचा 'द साँग ऑफ स्पॅरो' हा इराणी चित्रपट दाखविण्यात आला. २००८ साली हा चित्रपट प्रदर्शित झालेला आहे.

रेझा नाजी यांनी साकारलेल्या करीम नावाच्या इराणी व्यक्तीरेखेच्या आयुष्यावर आधारीत असलेल्या चित्रपटात पालक व पाल्यांच्या नात्यातील भावविश्व दिग्दर्शकाने अत्यंत खुबीने दाखविले आहे. चित्रपटातील अभिनेता रेझा नाजी यांना उत्कृष्ट अभिनयासाठी एशिया पॅसिफिक स्क्रिन अवॉर्ड-२००८ मिळाला आहे. यावेळी रेखा शेळके, विभागीय केंद्राचे सुबोध जाधव, मंगेश निरंतर, उमेश राऊत यांची उपस्थिती होती.

- **'टू ब्रदर्स' दि. ३० नोव्हेंबर २०१३**

सुप्रसिद्ध चित्रपट जिन जॅक्यूस ॲन्यूद यांचा 'टू ब्रदर्स' हा चित्रपट दाखविण्यात आला. २००४ साली हा चित्रपट प्रदर्शित झालेला आहे.

चित्रपटाची कथा ही कुमल आणि संघ या दोन वाघांवर आधारीत असून ते दोघे भाऊ असतात परंतु त्यांच्या कुटुंबावर आलेल्या संकटामुळे दोन्ही भावांची ताटातूट होते. दोन्ही भाऊ वेगवेगळ्या ठिकाणी वाढतात व कथा उत्तरोत्तर अधिक रोमांचक होत जाते. हे संपूर्ण वास्तववादी चित्रीकरण दिग्दर्शकाने अत्यंत खुबीने हाताळले आहे.

- **'नॉटिंग हिल' दि. २८ डिसेंबर २०११**

सुप्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक रोजर मिशेल यांचा १९९९ साली प्रदर्शित 'नॉटिंग हिल' हा चित्रपट दाखविण्यात आला.

ज्युलिया रॉबर्टस् आणि ह्यू ग्रांट अभिनित या चित्रपटाची कथा रोमँटिक कॉमेडी अशी आहे. चित्रपटाला बाफ्टा पुरस्कार मिळाला होता व इतर दोन श्रेणीमध्ये त्यांना नामांकन मिळाले होते. १९९९ सालची सर्वात जास्त कमाई करणारा चित्रपट असाही चित्रपटाचा लौकिक आहे. तसेच चित्रपटाला १९९९ ब्रिटीश कॉमेडी पुरस्कारही मिळाला आहे. यावेळी नीलेश राऊत, अपर्णा कक्कड, रेखा शेळके, सुबोध जाधव, उमेश राऊत यांची उपस्थिती होती.

- **'जाने भी दो यारो' दि. २७ जानेवारी २०१३**

सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक कुंदन शाह यांचा १९८३ साली प्रदर्शित झालेला 'जाने भी दो यारों' हा चित्रपट दाखविण्यात आला. भ्रष्टाचार आणि पत्रकारिता या विषयावर आधारीत असून बॉलिवूडचे दिग्गज कलाकार ओम पुरी, नसरुद्दीन शाह, सतिश कौशिक, पंकज कपूर, रवि बासवानी आदींनी या चित्रपटात उत्कृष्ट अभिनय केला आहे.

नसीर व रवी या दोन फोटो स्टुडिओ, पोट भरण्यासाठी खटाटोप, शोध पत्रकारिता करणारी संपादक आणि तिच्या कामात दोघांचा सहभाग या नाट्यमय घडामोडीतून कथानक घडते. पत्रकाराला मदत केल्यास पैसे मिळणार असल्यामुळे दोघांचीही धडपड व दुसऱ्या बाजूला भ्रष्ट अधिकारी बिल्डर लॉबी यांच्याशी टक्कर, या परस्पर विसंगत घटनांतून चित्रपट खुमासादार ठरातो. विशेषतः नसिरुद्दीन शाह यांच्या अभिनयानाने अधिक धमाल उडविली आहे. चरितार्थसाठी झटणारा सामान्य माणूस विरुध्द टोलेजंग इमारतीत राहणारी भ्रष्ट लॉबी अशी विसंगती मांडली आहे. सामाजिक विसंगतीवर सुधीर मिश्र यांच्या चपखल संवादांनी नेमके बोट ठेवले आहे. त्यामुळे चित्रपट उठावदार होतो. तीस वर्षांनतरही जाने भी दो यारों चे रसिकांना आकर्षण आहे. या उपक्रमाला चित्रपटाची माहिती असलेले अनेक रसिक प्रेक्षक उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सुबोध जाधव, उमेश राऊत, दीपक जाधव, त्रिशूल कुलकर्णी, कुलदिप माने, राजेंद्र वालके आदींनी सहकार्य केले.

- **'गर्जा महाराष्ट्र' दि. ११ जानेवारी २०१४**

विभागीय केंद्र औरंगाबाद व एम.जी.एम. जर्नलिझम महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांची शनिवार, दि. ११ जानेवारी २०१४ रोजी एम.जी.एम.च्या आईन्स्टाइन सभागृहात सायं. ५ वाजता प्रकट मुलाखत आयोजित करण्यात आली होती. प्रसिद्ध निवेदक दत्ता बाळसराफ यांनी ही मुलाखत घेतली. सदर मुलाखत त्यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'गर्जा महाराष्ट्र' या पुस्तकावर आधारीत होती.

डॉ. सदानंद मोरे यांचे 'गर्जा महाराष्ट्र' पुस्तकाचे प्रकाशन सकाळ प्रकाशनातर्फे करण्यात आले आहे. ज्येष्ठ विचारवंत, संशोधक आणि लेखक डॉ. सदानंद मोरे यांच्या आंतरविद्याशाखीय व तौलनिक अभ्यासदृष्टीतून तयार झालेला हा ग्रंथ आहे. या ग्रंथात महाराष्ट्राच्या भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय, ऐतिहासिक, भाषिक, सामाजिक, तात्विक, प्रशासकीय जडणघडणीची, मुत्सद्देगिरीची, पराक्रमाची, साहसाची गाथा मांडली आहे. यानिमित्ताने महाराष्ट्राचा दोन हजार वर्षांचा झगमगता इतिहास प्रथमच नव्याने डॉ. सदानंद मोरे यांनी उलगडला आहे. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे मधुकरराव मुळे, अंकुशराव कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

- **'दारव्हेकर स्मृती अभिवाचन महोत्सव' दि. १९ जानेवारी २०१४**

रंगगंध कलासक्त न्यास चाळीसगावच्या वतीने पुरुषोत्तम दारव्हेकर स्मृती अभिवाचन महोत्सवाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. या वर्षी ही स्पर्धा देश पातळीवर चाळीसगाव येथे होणार आहे. या

स्पर्धेची प्राथमिक फेरी औरंगाबाद येथे दिनांक १९ जानेवारी रोजी होणार आहे. प्राथमिक फेरीतील प्रथम क्रमांकाच्या संघात अंतिम फेरीत प्रवेश मिळणार आहे. प्राथमिक फेरीचे आयोजन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, औरंगाबाद, अखिल भारतीय नाट्य परिषद, औरंगाबाद शाखा आणि यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली.

हा महोत्सव स्पर्धात्मक असून कथा, कविता, आत्मवृत्त, नाटक, वैचारिक लेख किंवा संमिश्र अशा साहित्य प्रकारचे अभिवाचन करण्यात आली. वाचनाचा हा प्रयोग सलग नाट्यात्म अनुभूती देणारा होता. या महोत्सवात २५ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.

यावेळी विभागीय संघटक सुबोध जाधव, पद्मनाभ पाठक, ऊमेश राऊत, मंगेश निरंतर, दीपक जाधव आदी उपस्थित होते.

❑❑❑

## लोकशाहीचे अंतिम उद्दिष्ट

लोकशाहीशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक व आर्थिक क्षेत्रांतदेखील, लोकांचे समाधान हेच आपले अंतिम उद्दिष्ट मानले पाहिजे. राजकारण आणि प्रशासन या दोन्ही क्षेत्रांतील लोकांचे हेच उद्दिष्ट असले पाहिजे. कारण या दोन्ही क्षेत्रांतील व्यक्ती शेवटी जनतेतूनच आलेल्या असतात आणि त्यांना जनतेचे भवितव्य घडवून आणण्याचे कार्य करावयाचे असते. राज्यशास्त्र आणि लोकशाहीतील प्रशासन यांना सांधणारा दुवा हाच आहे, असे मला वाटते.

निवडणूक हा लोकशाहीचा एक भाग आहे, आणि लोकशाहीमध्ये निवडणुकीला फार महत्त्वाचे स्थानही आहे यात शंका नाही. परंतु निवडणुकीला किंवा लोकशाहीच्या बाह्य स्वरूपाला जनतेच्या समाधनापेक्षा अधिक महत्त्व नाही. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात काम करीत असा, जनतेचे समाधान हीच अंतिम कसोटी राहील.

**– यशवंतराव चव्हाण**

# विभागीय केंद्र पुणे कृषी व सहकार व्यासपीठ, पुणे
## कार्यवृत्त

कृषी व सहकार व्यासपीठाचे कामकाज मा. अजित निंबाळकर यांचे अध्यक्षतेखाली चालते. मा. अंकुश काकडे सचिव व श्री. शांतीलाल सुरतवाला कोषाध्यक्ष यांचे मार्गदर्शन या कामी मिळते. व्यासपीठाचे दैनंदिन कामकाज श्री. श. त्रि. भिडे आणि श्री. मोरेश्वर परळीकर पाहतात. त्यांना या कामी श्री. सुनील कदम व श्री. रवी सरनाईक, श्री. सुनील खंताळ यांचे सहकार्य मिळत असते.

- दि. ३१ ऑगस्ट २०१३ व दि. ५ सप्टेंबर २०१३ रोजी कृषी व सहकार व्यासपीठाची सभा केंद्र शासनाचे राष्ट्रीय जमीन सुधारणा धोरण मसुदा यावर चर्चा करण्यासाठी घेण्यात आली त्यास अनुसरून ॲग्रोवन संयोजक श्री. भिडे यांचे ''भू सुधारणा धोरण सामाजिक न्यायातून व्हावा विचार'' आणि ''सामाजिक मालमत्तेच्या समस्या लागतील निकाली''. या शीर्षकाचे दोन लेख प्रसिध्द करण्यात आले.

- **आदर्श उपविधी**

९७व्या घटना दुरुस्तीस अनुसरुन शासनाने वेगवेगळ्या सहकारी संस्थांचे आदर्श उपविधी स्विकारण्या संबंधाने सहकार आयुक्तांनी सहकारी संस्थांना परिपत्रकीय सूचना निर्गमित केल्या होत्या. त्या बाबतीत प्रतिष्ठानच्या मुख्यालयातील पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्थेसंबंधीच्या उपविधी बाबतीत सादर संस्थेचे पदाधिकारी यांचेकडून काही विचारणा झाल्यावरुन मा. सहकार आयुक्त यांनी प्रसिध्द केलेल्या पगारदार नोकरांच्या सहकारी पसंस्थाचे आदर्श उपविधी तपासून त्या संबंधी काही अडचणी येत असल्याने या बाबात दिनांक ३0 ऑगस्ट २०१३ रोजी एक सविस्तर अर्धशासकीय पत्र पाठवून जरूर ते मार्गदर्शन मा. मधुकरराव चौधरी, सहकार आयुक्त, यांचे कडून मागविण्यात आले. तसेच प्रतिष्ठानचे मुख्यालयास अन्य जरुर ती माहिती पुरविण्यात आली. उपविधी मान्यतेसंबंधी सर्व प्रकरणे, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मध्ये जरुर त्या सुधारणा अंतिमरित्या मान्य झाल्यावरच निकाली काढण्याच्या निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा आता विचार असल्याने, उपविधी दुरूस्ती प्रकरणे प्रलंबित असल्याचे समजते.

- **सहकारी चळवळी पुढील आव्हाने**

या विषयावर एक परिषद इचलकरंजी येथे ए. आर. पाटील कन्या महाविद्यालयामध्ये योजना आयोग, नवी दिल्ली यांच्या सहाय्याने आयोजित करण्यात आली होती. त्या साठी ''९७व्या घटना दुरुस्तीचा सहकारी चळवळीवरील परिणाम'' हा शोध निबंध सदर परिषेदसाठी कृषी व सहकार व्यासपीठाचेवतीने सादर करण्यात आला.

- **महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा दुरुस्ती बिल नं २, २०१३**

या संबंधाने कृषी व सहकार व्यासपीठात चर्चा केल्या नंतर एक सविस्तर टिपण मा. दिलीप वळसेपाटील, सभापती महाराष्ट्र विधानसभा, यांना सादर करण्यात आले होते.

- **कृषी निर्धार परिषद पुणे**

'महाराष्ट्र कृषी निर्धार परिषद' ही कृषी विद्यापीठ राहुरी, ॲग्रीकल्चर व हार्टीकल्चर कॉलेज पुणे व इन्स्टिटयूट ऑफ रुरल डेव्हलपमेन्ट ॲड एज्युकेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ सप्टेंबर २०१३ रोजी कॉलेज ऑफ हॉर्टीकल्चर पुणे येथे भरली होती. सदर परिषदेसाठी कोरडवाहू शेकऱ्यासांठी सुयोग्य धोरण या विषयावर प्रतिष्ठानतर्फे एक प्रबंध सादर करण्यात आला. सदर परिषदेस संयोजक श्री. श. त्रिं भिडे हे हजर राहून त्यांनी त्यामध्ये सहभाग घेतला. त्या अनुषंगाने आणंद विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. वाष्णेय यांच्याशी चर्चा करुन त्यांचे एक व्याख्यान प्रतिष्ठानच्या पुणे केंद्रात आयोजित केले.

- **शांतीदूत लालबहादूर शास्त्री प्रश्नमंजुषा, निबंध व वक्तृत्व स्पर्धा**

अ) **प्रश्नमंजुषा स्पर्धा:-**

वरील विषयावरील प्रश्नमंजुषा स्पर्धेत ५५

शाळातील ४०६७ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेवून स्पर्धा यशस्वी केली. त्या स्पर्धेचा बक्षीस समारंभ दि. २ ऑक्टोबर २०१३ रोजी विशाल सह्याद्री सदन सभागृहात संपन्न झाला.

ब) **वक्तृत्व स्पर्धा:-**

१२ डिसेंबर रोजी मा. ना. शरदचंद्रजी पवार कृषी मंत्री भारत सरकार यांचे वाढदिवशी २५ शाळांतील ६३ विद्यार्थ्यांनी ''शांतीदूत लालबहादूर शास्त्री-एक चारित्र्य संपन्न आदर्श'' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतला. त्या पैकी गुणनुक्रमाने पहिल्या दहा विद्यार्थ्यांना मा. अजित निंबाळकर व माजी प्राचार्य वाडिया कॉलेज डॉ. व. कृ. नूलकर यांचे हस्ते पारितोषिके वितरीत करण्यात आली. या स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून मा. नूलकर, संयोजक श्री. भिडे व माजी सहसंचालक (साखर) श्री. कुलकर्णी यांनी काम पाहिले. पहिली दोन बक्षिसे वामनराव ओतुरकर विद्यालयातील १) कु. शुभम झेंडे २) कु. कृतिका कामठे तर भोकराई माता विद्यालयातील ३) कु. प्रतिक्षा मिसाळ हीस तिसरे बक्षीस वितरीत करण्यात आले.

क) **निबंध स्पर्धा:-**

शांतीदूत लालबहादूर शास्त्री या विषयावर इ. ८वी व इ ९वीतील विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेमध्ये २६ शाळांच्या ३२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी निवडक गुणवंत विद्यार्थ्यांची स्वतंत्रपणे निबंध स्पर्धा डॉ. वसंतदादा विद्यानिकेतन शुक्रवार पेठ पुणे येथे घेण्यात आली. त्यामध्ये १२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पहिल्या १८ विद्यार्थ्यांना दिनांक २४/०१/२०१४ रोजी वनराईच्या एको हॉल मध्ये पारितोषिक वितरण समारंभात पारितोषिके वाटण्यात आली. पारितोषिक गुणनुक्रमे ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे देण्यात आली. कर्नल भिडे व वनराईचे प्रतिनिधी व साने गुरूजी कथामालाच्या श्रीमती. स्मिता परदेशी यांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. या शिवाय सर्व विद्यार्थ्यांना भिडे प्रतिष्ठान तर्फे केंद्र शासनाने अर्थसहाय्याने, रामकृष्ण मिशन, पुणे यांनी स्वामी विवेकानंद यांचे १५०व्या जयंती निमित्त तयार केलेले पुस्तक संच वितरीत करण्यात आले. कर्नल भिडे यांनी भूदलातील कामकाजाबाबत माहिती आपल्या अध्यक्षीय भाषणात दिली.

- **सहकारी संस्था लेखापरीक्षण**

सहकार कायदा दुरूस्तीनुसार आता लेखापरीक्षण करुन घेण्याची जबाबदारी सहकारी संस्थांवर टाकण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे असे आढळून येते की गृहनिर्माण व तत्सम अनेक प्रकारच्या संस्थांचे हिशोब मानद सचिवामुळे वेळचेवेळी न लिहिले गेल्यामुळे दरवर्षी ५०% पेक्षाही कमी संस्थांचे लेखापरीक्षण होत असते. लेखापरीक्षण वेळेत व दरवर्षी पूर्ण होण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण संस्थांसाठी सहकारी खात्यामर्फत जी संहिता (manual) तयार करण्यात येत होती त्यामध्ये ऑडीटर्सच्या पॅनेल प्रमाणेच स्वंतत्रपणे हिशोब लिहून देणाऱ्या हिशोबनिसांचे पॅनेल तयार करून देण्यात यावे अशी सूचना मा. अंकुशराव काकडे केली.

- **महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१३**

या विषयावर दिनांक १९/११/२०१३ रोजी अ‍ॅड. जयंत कुलकर्णी सचिव, पुणे जिल्हा सहकारी गृहरचना संस्था अधिसंघ मर्यादीत, यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

- **महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ ची दुरुस्ती**

मा. दिनेश ओउळकर यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मध्ये दुरुस्ती करुन मा. सहकार आयुक्त यांचे वेबसाईट वर प्रसिद्ध केल्याचे प्रतिष्ठानचे श्री. भिडे यांनी सांगितल्यावरून सदर नियमांवर चर्चासत्रे दि. २ व १९ नोव्हेंबर २०१३ रोजी आयोजित करण्यात आली होती.

- **कृषी विषयावरील व्याख्याने / चर्चासत्र**

बळीराजा मासिकाच्यावतीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी शेतकरी मंडळाची एक सभा प्रतिष्ठानमध्ये आयोजित केली जाते. या सभेत एक कृषीतज्ज्ञ सभेस

संबोधित करण्यासाठी निमंत्रिक केले जातात. त्याचे कडून शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांवर व्याख्याने आयोजित केली जातात व चर्चा घडवून आणल्या जातात व शेकऱ्यांसाठी मार्गदर्शन करण्यात येते. ऑगस्ट २०१३ ते जानेवारी २०१४ या सहा महिन्यांच्या कालावधीत पुढील सहा वक्त्यांनी त्यांना नेमून दिलेल्या विषयांवर शेतकयांना प्रबोधन केले.

- **जेष्ठ नागरिकांसाठी पर्वती चढणे – उतरणे स्पर्धाः–**

प्रतिवर्षा प्रमाणे वरील स्पर्धा पंडित नेहरुंचे जयंतीदिनी दि. १७ नोव्हेंबर रोजी घेण्यात आली. वय वर्षे ५१ ते ६०, ६१ ते ७०, आणि ७१ ते ८० वर्षापुढील पुरुष व महिलांसाठी ही स्पर्धा सायंकाळी ४ ते ६ या वेळात आयोजित करण्यात आली. तरुण पिढीने मोकळ्या हवेत फिरण्याची व टेकडी चढणे-उतरणे या दृष्टीने व्यायाम करावा या उद्देशाने ज्येष्ठ नागरीकांनी तरुण पिढीपुढे आदर्श ठेवावा व आपली प्रकृतीही सुदृढ राखावी या उद्देशाने या स्पर्धा प्रतिवर्षी आयोजित करण्यात येतात. यंदा १६५ स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला. पुरुष व महिलांच्या प्रत्येकी वय वर्षे ५१ ते ६०, ६१ ते ७०, ७१ ते ८० या तीन गटात प्रत्येकी तीन तीन पारितोषिके व ८१ चे पुढील गटात एक/एक पारितोषिक वितरीत करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| शनिवार ३/८/२०१३ | शेकऱ्यांसाठी नवीन व सोप तंत्रज्ञान आणि त्याचा प्रसार | श्री. सचिन मालगुडे |
| शनिवार ७/९/२०१३ | शेतकऱ्यांच्या जमीन धारण मर्यादाबद्दल केंद्र सरकारच्या सूचना | श्री. शं. त्रि. भिडे संयोजक कृषी व सहकार व्यासपीठ पुणे ३०. |
| शनिवार ५/१०/२०१३ | वनस्पती आणि प्राण्यांसाठी नवीन तंत्रज्ञान | डॉ. सुरेश गंगावणे. |
| शनिवार ९/११/२०१३ | अन्नसुरक्षा विधेयक आणि पाणी व्यवस्थापन | श्री. शिरीष पटवर्धन ॲक्वा सेवियो, पुणे. |
| शनिवार ७/१२/२०१३ | सेंद्रिय शेती – उणीव व उपाय | डॉ. भीमराज भुजबळ |
| शनिवार ४/१/२०१४ | संकरीत संशोधनातील समज-गैरसमज | डॉ. डी. आर. बापट ज्वारी संशोधक |

बक्षीस समारंभ गुरवार दिनांक ५ डिसेंबर २०१३ रोजी आयोजित केला होता. मा. श्री. श्रीकांत शिरोळे यांचे हस्ते वरील प्रमाणे तीन गटात महिला व पुरुषांना पारितोषिक वितरीत करण्यात आली. तसेच ८१ वर्षावरील प्रत्येक गटातील एक महिला व पुरुष स्पर्धकास पारितोषिक वितरीत करण्यात आले. तसेच यावर्षी श्री. दादासाहेब कोरपे यांना पर्वती भूषण पुरस्कार २०१३, रुपये अकरा हजार मा. सदानंद मोहोळ (माजी रणजीपटू) यांचे हस्ते वितरीत करण्यात आले.

- **दिवाळी पहाटः-**

प्रतिवर्षी प्रमाणे रंगरंग दिवाळी पहाट २०१३ हा सुरेल संगीतावर आधारीत कार्यक्रम रविवार दिनांक ३ नोव्हेंबर २०१३ रोजी पहाटे ५.१५ वाजता सारसबागेत आयोजित करणेत आला होता. या मध्ये सनई व सुंदरी वादन हा कार्यक्रम प्रमोद गायकवाड व कु. नम्रता गायकवाड यांनी सादर केला. ताशा वादन व लाठी काटी हा कार्यक्रम कु. आर्य काकडे (वय ७) याने सादर केला. हसवा हसवी हा कार्यक्रम श्री. संतोष चोरडीया याने सादर केला. तर मुख्य गितोंका सफर हा कार्यक्रम गायक जितेंद्र भुरुक व सहकारी यांनी सादर केला.

या समारंभाच्या निमित्ताने यावर्षी ज्येष्ठ इतिहासकार प्रा. डॉ. सदानंद मोरे यांना स्मृती चिन्ह, शाल व श्रीफळ असा 'दिवाळी पहाट पुरस्कार' श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे यांचे हस्ते देण्यात आला. तर गायक पुरस्कार श्री. इकबाल दरबार यांना देण्यात आला. पारितोषिक वितरण कार्यक्रमास पुण्याच्या महापौर सौ. चंचला कोद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

❑❑❑

# विभागीय केंद्र, नागपूर
## कार्यवृत्त

- **मैत्री - दिन काव्यसंध्या - शनिवार दि. ३ ऑगस्ट, २०१३**

विभागीय केंद्र, नागपूर व आधार बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने मैत्रीदिनानिमित्त शब्द-काव्य-प्रतिभा यांच्यावर आधारलेला कविता व काव्य गप्पा या कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि ३ ऑगस्ट, २०१३ रोजी सायं ६.०० वाजता सांस्कृतिक संकुल, सीताबर्डी, नागपूर येथे करण्यात आले.

याप्रसंगी विदर्भ साहित्य संघ, नागपूरचे अध्यक्ष श्री. मनोहर म्हैसाळकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच दै. लोकशाही वार्ताचे संपादक मा. श्री. शैलेश पांडे, दै. महाराष्ट्र टाईम्सचे विशेष प्रतिनिधी मा. श्री अविनाश महालक्ष्मे, दै. पुण्यनगरीचे संपादक मा. श्री. बाळ कुळकर्णी, दै. लोकशाही वार्ताचे सहाय्यक संपादक मा. श्री. श्याम पेठकर, यवतमाळचे ज्येष्ठ पत्रकार मा. श्री. सुरेश मांजरे सहभागी झाले.

- **कथा संग्रह प्रकाशन सोहळा- शनिवार दि २४ ऑगस्ट, २०१३**

विभागीय केंद्र, नागपूर व राघवी प्रकाशन नागपूरच्या संयुक्त विद्यमाने नवोदित लेखिका डॉ. सौ. रोहिणी राजेश कळमकर यांच्या ''मन आक्रंदले ............ शब्द उमटले'' या कथा संग्रहाचा प्रकाशन सोहळा शनिवार दि. २४ ऑगस्ट, २०१३ रोजी सायं ६.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला.

हा प्रकाशन सोहळा सुप्रसिध्द, समीक्षक लेखिका आशाताई सावदेकर यांच्या शुभहस्ते व मा. डॉ गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

- **ग्रंथ प्रकाशन सोहळा : रविवार दि. १ सप्टेंबर, २०१३**

विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने भास्कर दवे यांच्या "EXPLOSIVE THRILLS - An Octogenarian Looks Back" व ज्योती अतुल भट यांच्या "How Krishna Came into their Lives" या दोन ग्रंथांचा प्रकाशन सोहळा रविवार दि.१ सप्टेंबर, २०१३ रोजी सकाळी १०.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

हा प्रकाशन सोहळा माजी कुलगुरू, दत्ता मेघे इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस. नागपूर मा. डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या शुभहस्ते व मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यांप्रसंगी मा. पी. आर. थॉमस. Chief Controller of Explosive, Govt. of India हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

- **प्रकाशन सोहळा - दि. २८ सप्टेंबर, २०१३**

विभागीय केंद्र, नागपूर, संत कबीर बहुउद्देशीय शिक्षण संस्था, चंद्रपूर, सम्यक थिएटर, नागपूर व कश्यप पब्लिकेशन, गाजियाबाद (नई दिल्ली) च्या संयुक्त विद्यमाने किरण काशीनाथ यांच्या ''अब हालात काबू में है..'' या हिंदी कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा शनिवार दि. २८ सप्टेंबर, २०१३ रोजी सायं. ५.३० वाजता कीर्तनकेसरी भाऊसाहेब शेवाळकर सभागृहामध्ये पार पडला.

हा प्रकाशन सोहळा कवी कार्यकर्ता मा. अशोक कुमार पांडे, ग्वालियर, मध्यप्रदेश व सामाजिक कार्यकर्ता मा. सुरेश खैरनार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी

यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

याप्रसंगी कवी मा. मंसूर एजाज जोश व कवी मा. लोकनाथ यशवंत यांनी आपले विचार प्रकट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. अब्रार काशिफ यांनी केले.

- **सी.डी. विमोचन सोहळा : बुधवार दि. २ ऑक्टोबर, २०१३**

विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने सूरमणी डॉ. साधना शिलेदार यांनी संपादीत केलेल्या विदर्भातील ४१ बंदिशकारांच्या निवडक बंदिशींच्या पुस्तकाचा व सी.डी. प्रकाशन सोहळ्याचे आयोजन बुधवार दि. २ ऑक्टोबर, २०१३ रोज सायं. ५.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह नागपूर येथे करण्यात आले.

हा प्रकाशन सोहळा मा. डॉ. विकास कशाळकर, पुणे यांच्या शुभहस्ते व मा.डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

याप्रसंगी सूरमणी श्रीमती कमल भोंडे, अमरावती ह्या प्रमुख अतिथी म्हणून व मा. ना. वा. गोखले हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

- **स्त्री शक्ती पुरस्कार वितरण सोहळा – शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर, २०१३**

विभागीय केंद्र, नागपूर व पद्मागंधा प्रतिष्ठानच्या संयुक्त वतीने देण्यात येणारा सौ. मोहना मार्डीकर पुरस्कृत स्व. सुधा डोंगरे स्त्री शक्ती पुरस्कार – २०१३ ह्या वर्षी मराठीतील ख्यातनाम लेखिका मा. आशा बगे यांना प्रदान करण्यात आला.

शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर, २०१३ रोजी सायं ५.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या पुरस्कार वितरण सोहळयाचे उद्घाटक म्हणून मा.डॉ.मदन कुळकर्णी नागपूरचे अध्यक्ष मा.डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. डॉ. आशाताई सावदेकर, डॉ. प्रज्ञा आपटे यांचा सहभाग होता.

- **ज्येष्ठ नागरिकांचा कृतज्ञता सोहळा – दि. १२ ऑक्टोबर, २०१३**

विभागीय केंद्र, नागपूर व राष्ट्रवादी अकादमी फॉर स्पोर्टस्, कल्चर अॅन्ड एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर शहरातील विविध क्षेत्रात आयुष्यभर कार्यरत असणाऱ्या काही मान्यवर नागरिकांचा सत्कार समारोह दि. १२ ऑक्टोबर, २०१३ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री साई सभागृह, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

हा सत्कार समारोह मा. श्री विजयबाबू दर्डा यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार मा. मधुकरराव भावे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

या सोहळ्यात श्री.डी.के.मनोहर, श्री.अरुण मोरघडे,डॉ. उषा पारखी, श्री हरीश अड्याळकर, श्रीमती लिलाताई चितळे, श्री. उमेश चौबे, श्री. अण्णजी मेंडजोगे, श्री. रामभाऊ खांडवे, श्री दामू मोरे, श्री जयंत हरकरे, कर्नल सुनील देशपांडे, श्री. गणेश नायडू, सौ. आशाताई पांडे, डॉ. ओ.एल.राठी, प्रा.सौ.निर्मलाताई राठी, श्री राजाभाऊ चिटणीस, श्री प्रभाकर देशकर, श्री. शेख मोहम्मद हाशीम, डॉ. प्रणोती चक्रवर्ती डॉ. हरभजनसिंह हंसपाल इ. जेष्ठ मान्यवर यावेळी उपस्थित होते.

- **पुरस्कार वितरण समारंभ – रविवार दि. २७ ऑक्टोबर, २०१३**

महाराष्ट्रातील प्रख्यात कवयित्री स्व. अरुणाताई पवार–चवरे यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त विदर्भस्तरीय काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला नवोदितांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ विभागीय केंद्र, नागपूर व युवा स्पंदन समाजिक व सांस्कृतिक, साहित्य सेवा संस्था नागपूरच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.२७ ऑक्टोबर, २०१३ रोजी सायं ६.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे

सभागृह, नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी सुप्रसिध्द साहित्यिक मा.डॉ.सुधाकर मोगलेवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व सुप्रसिद्ध कवी मा. डॉ. बळवंत भोयर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

- **श्रद्धांजली कार्यक्रम – दि. २९ ऑक्टोबर, २०१३**

विभागीय केंद्र, नागपूर व आकांक्षा प्रकाशन, नागपूरच्या संयुक्त वतीने ज्येष्ठ कवी डॉ. श्रीधर शनवारे यांच्या श्रद्धांजलीचा कार्यक्रम मंगळवार दि २९ ऑक्टोबर, २०१३ रोजी सायं ५.३० वाजता आयोजित करण्यात आला होता.

हा कार्यक्रम मा.डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी मा.डॉ. यशवंत मनोहर, डॉ. वि.स. जोग, डॉ. अक्षयकुमार काळे, प्रा. अजय चिकाटे, अरुणाताई सबाने यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

- **प्रा. फ. मुं. शिंदे यांचा सत्कार समारोह – मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर, २०१३**

समाजनिष्ठ जाणिवांचे संवेदनशील कवी म्हणून ज्यांचा लौकिक महाराष्ट्रात आहे व ज्यांना ग्रामीण भागात लोककवी म्हणून ओळखले जाते ते सुप्रसिध्द कवी, लेखक व विचारवंत मा.प्रा.फ.मु.शिंदे यांचा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार समारोह सोहळा विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर, २०१३ रोजी सायं ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, येथे आयोजित करण्यात आला होता.

हा सत्कार समारोह प्रसिद्ध वक्ते व विधान सभेचे माजी अध्यक्ष मा. अरुणभाई गुजराथी यांच्या शुभहस्ते व महाराष्ट्रातील ज्येष्ठ कवी डॉ. यशवंत मनोहर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. बबनराव तायवाडे हे विशेष अतिथी म्हणून व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गिरीश गांधी होते.

- **स्व. यशवंतराव चव्हाण यांची २९ वी पुण्यतिथी – दि. २५ नोव्हेंबर, २०१३**

महाराष्ट्रातील शिल्पकार व देशाचे माजी उपपंतप्रधान स्व. यशवंतराव चव्हाण यांची दि.२५ नोव्हेंबर, २०१३ रोजी एकोणतीसावी पुण्यतिथी ! या निमित्ताने विभागीय केंद्र, नागपूर व विश्वास एज्युकेशन सोयायटी, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिध्द विचारवंत व समीक्षक मा. डॉ. कुमार शास्त्री यांच्या व्याख्यानाचे आयोजन दि. २५ नोव्हेंबर, २०१३ रोजी नागपूर येथे करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य मा. श्रीराम काळे हे प्रमुख अतिथी म्हणून तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. गिरीश गांधी होते.

- **चालता बोलता दिवाळी अंक – २०१३ प्रकाशन समारंभ – दि. १५ डिसेंबर, २०१३**

विभागीय केंद्र, नागपूर व अभिव्यक्ती वैदर्भीय लेखिका संस्था, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने एका आगळ्यावेगळ्या साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन रविवार दि. १५ डिसेंबर २०१३ रोजी नागपूर येथे करण्यात आले.

कथा, कविता, मुलाखती तसेच दिवाळी अंकात असणारी अन्य खुसखुशीत सदरे व्यासपीठावरून सादर करण्याचा हा अभिनव प्रयोग होता. या दिवाळी अंकाचे उद्घाटन मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या हस्ते झाले.

- **सत्कार समारंभ – दि. १९ डिसेंबर, २०१३**

महाराष्ट्र सरकारच्या वतीने सांस्कृतिक धोरणात भरीव कामगिरी केल्याबद्दल तसेच सांस्कृतिक क्षेत्र वृद्धींगत होण्यासाठी वेळोवेळी घेण्यात आलेले निर्णय सांस्कृतिक कार्य संचालनालय विभागीय कार्यालयाची नागपूर येथे शाखा सुरू करण्याचा निर्णय व शुभारंभ आम्हां सर्वांसाठी भूषणावह बाब आहे. त्याप्रित्यर्थ महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक मंत्री मा.ना. श्री. संजय देवतळे यांचा सत्कार सोहळा विभागीय केंद्र, नागपूर व अ.भा.मराठी नाट्य परिषद नागपूरच्या संयुक्त विद्यमाने

गुरूवार दि.१९ डिसेंबर, २०१३ रोजी सायं ६.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, नागपूर येथे आयोजित करण्यात आला. याप्रसंगी मा.ना.अॅड शिवाजीराव मोघे यांच्या शुभहस्ते सत्कारमूर्ती मा.ना.श्री. संजय देवतळे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा.डॉ. गिरीश गांधी होते. नाट्य रसिक संस्कृती प्रेमी यांची या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती. सत्काराला उत्तर देतांना सांस्कृतिक क्षेत्रासाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देऊन विदर्भातील कलावंतांनी जास्तीतजास्त योजनांचा लाभ घ्यावा आणि विदर्भातील रंगभूमी आपण सर्वांनी मिळून वृध्दींगत करण्याचा प्रयत्न करावा असे निक्षूण सांगितले. मा.ना. अॅड्. शिवाजीराव मोघे यांनी सांस्कृतिक क्षेत्राबरोबरच त्यांच्या मनातील योजनांची माहिती देत कलावंतांची ओळख सर्वदूर पोहचण्यासाठी आपण खरंच दखल घेतली पाहिजे आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय विभागीय कार्यालय नागपूरला सुरू झाल्याबद्दल मंत्रीमहोदयांचे सर्वांनीच अभिनंदन केले. व्यासपीठावर किशोर आयलवार, प्रफुल्ल फरकसे डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. सुनील रामटेके स्थानापन्न होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रमोद भूसारी यांनी केले. संचालन प्रभा देऊस्कर यांनी केले तर आभार श्रद्धा तेलंग यांनी मानले.

- **सुवाच्च हस्ताक्षर स्पर्धा - दि २५ डिसेंबर, २०१३**

मुलांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर आपण जे केले तेच मुलांनी केले पाहिजे असा आग्रह पालकांनी धरू नये. मुलांना उमलू द्या, मात्र उमलताना त्यांच्यावर केवळ लक्ष ठेवा, असे प्रतिपादन बालविहारचे संस्थापक अरविंदमामा जागीरदार यांनी केले.

विभागीय केंद्र, शिक्षण उपसंचालक महापालिका शिक्षण विभाग, रायसोनी ग्रुप, रामन विज्ञान केंद्र आणि अक्षरभूषण मधुकर भाकरे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या सुंदर हस्ताक्षर स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात मा. जहागीरदार बोलत होते. शिक्षक सहकारी बँकेच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला महापौर अनिल सोले, मनसे चे विदर्भ विभागीय संघटक हेमंत गडकरी, शिक्षक आमदार नागोराव गाणार, ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. संजीव चौधरी, वि.भ. करगुटकर, रामन विज्ञान केंद्राचे प्रकल्प संचालक विश्वनाथ जोशी, मधुकर भाकरे प्रतिष्ठानचे अध्यक्ष अण्णाजी मेंडजोगे, नारायण समर्थ, विष्णू मनोहर, रायसोनी ग्रुपचे उपाध्यक्ष हेमंत सोनारे, नगरसेवक बंडू राऊत, राजाभाऊ चिटणीस आदी उपस्थित होते.

यावेळी महापौर अनिल सोले यांच्या हस्ते धनगर समाजाचे नेते आणि सेवानिवृत्त शिक्षक विष्णूपंत कोल्हे यांचा शिक्षक जीवन गौरव पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. २१ हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. संस्थेतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या 'अक्षरधन' या मासिकाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महापौर अनिल सोले यांचे भाषण झाले. कार्यक्रमाचे संचालन संजय भाकरे तर पारितोषिक व मानपत्राचे वाचन अजय भाकरे यांनी केले. अभय भाकरे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

- **लिहित्या स्त्रियांची द्वितीय कार्यशाळा - दि. २८ व २९ डिसेंबर, २०१३**

माहेर संस्थेद्वारा प्रकाशित 'आकांक्षा' मासिक आणि विभागीय केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय विदर्भस्तरीय लिहित्या स्त्रियांची द्वितीय कार्यशाळा शंकनगरातील श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेचे उद्घाटन नागपूर विभागाचे पदव्युत्तर विभाग प्रमुख, प्रसिध्द समीक्षक डॉ. अक्षयकुमार काळे

यांच्या हस्ते झाले. त्यावेळी उर्मिला पवार या विशेष अतिथी म्हणून तर मा.डॉ. गिरीश गांधी हे अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी आशा बगे यांची प्रमुख उपस्थिती होती. संचालन विजया मारोतकर यांनी तर आभारप्रदर्शन मुख्याध्यापिका उज्ज्वला अंधारे यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. सीमा साखरे, सुमती वानखेडे, वीणा कुळकर्णी, संध्या अमृते, सुचित्रा कातरकर आदी उपस्थित होते.

रविवार दि. २९ डिसेंबर, २०१३ रोजी या कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक वीणा आलासे, डॉ. प्रज्ञा आपटे आणि प्रतिष्ठानचे सचिव रमेश बोरकुटे यांची उपस्थिती होती, तर आकांक्षाच्या संपादक अरुणा सबाने व्यासपीठावर उपस्थित होत्या. अरूणा सबाने यांनी कार्यशाळेसाठी दीड महिना राबणाऱ्या कार्यकर्त्यांप्रती विशेष आभार व्यक्त केले, सूत्रसंचालन डॉ. स्मिता वानखेडे यांनी केले. कार्यशाळेच्या समारोपाच्या दिवशी शालिनी कुकडे, सुजाता लोखंडे, डॉ. छाया कावळे आणि ज्योती मोहन पुजारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

- **प्रकाशन समारंभ – मंगळवार दि १४ जानेवारी, २०१४**
विभागीय केंद्र, नागपूर व विसा बुक्स, नागपूर यांच्या संयुक्त वतीने मा. श्री उल्हास मनोहर यांच्या 'कविता तुझ्या माझ्या' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा खालील मान्यवरांच्या उपस्थितीत मंगळवार, दि १४ जानेवारी, २०१४ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

हा प्रकाशन सोहळा मा. सविता प्रभूणे यांच्या शुभहस्ते व सुप्रसिध्द कवी ज्ञानेश वाकुडकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

याप्रसंगी मा. श्री. रमेश बोरकुटे, मा.श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी व मा.सौ. मनीषा साधू ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

- **प्रकाशन समारंभ – शनिवार दि. २५ जानेवारी, २०१४**
विभागीय केंद्र, नागपूर व अभिव्यक्ती वैदर्भीय लेखिका संस्था, नागपूर यांच्या संयुक्त वतीने सौ. नलिनी खडेकर यांच्या 'जलमोत्यांची उधळण' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा शनिवार, दि. २५ जानेवारी, २०१४ रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

हा प्रकाशन सोहळा माजी मराठी विभाग प्रमुख, रा.तु.म.नागपूर विद्यापीठ मा.डॉ.मदन कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली व मा.रमेश बोरकुटे यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी मा.प्रा.डॉ.सौ शुभा साठे व मा.डॉ. जोगिंदर कौर महाजन हे काव्यसंग्रहाचे अंतरंग उलगडून दाखवले तर या काव्यसंग्रहातील काही कवितांचे गायन मा. सौ. सुचित्रा कातरकर यांनी केले.

❑❑❑

'मराठा' हा शब्द जातिवाचक नाही. आचार्य अत्र्यांनी आपल्या वर्तमानपत्राला 'मराठा' हे नाव दिले ते काय तो शब्द जातिवाचक आहे म्हणून दिले? 'मराठा' शब्दामागे महाराष्ट्राच्या एकजिनसी जीवनाची भावना आहे. 'मराठा' शब्दाचा हाच अर्थ आम्हाला अभिप्रेत आहे आणि म्हणून मराठी राज्य हे कोणा एका जमातीचे राज्य मुळीच होता कामा नये, या गोष्टीवर माझा जरुर विश्वास आहे.

– यशवंतराव चव्हाण

# विभागीय केंद्र, कऱ्हाड
# कार्यवृत्त

**ऑगस्ट, २०१३ स्वातंत्र्यदिन :**

स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट, २०१३ या दिवशी सकाळी ८.०० चे आत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र कऱ्हाड, विरंगुळा, त्याचप्रमाणे सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कऱ्हाड या दोन्ही ठिकाणी सचिव श्री. मोहनराव डकरे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. दोन्ही संस्थाचे सर्व कर्मचारी, अभ्यासिकेतील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी वाचक ध्वजवंदनाच्या कार्यक्रमास उपस्थित होते.

- **ति. विठामाता (स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या मातोश्री) स्मृतिदिन १८ ऑगस्ट, २०१३ :**

  प्रति वर्षाप्रमाणे ति. विठामाता यांच्या स्मृति दिनानिमित्त देवराष्ट्रे (स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांचे जन्मगाव) येथे प्रतिष्ठानमधील सेवकवर्गासह जाऊन यशवंतराव चव्हाण विदयालयात कार्यक्रम घेण्यात आला. श्री. मोहनराव डकरे ति. विठामाताची थोरवी अत्यंत समर्पक शब्दांत सांगितली.

- **आदरणीय स्व. पी.डी. पाटील पुण्यतिथी : (१७ सप्टेंबर २०१३)**

  यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे थोर हितचिंतक आणि कराड नगराचे भागयविधाते आदरणीय स्व. पी.डी. पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र कराड आणि सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे सर्व सेवक वर्गासह आदरणीय पी.डी.पाटील साहेब यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रतिमेस हार घालून भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

- **महात्मा गांधी जयंती (२ आक्टोबर २०१३) :**

  जागतिक कीर्तीचे थोर विचारवंत, शांतीदूत अहिंसेचे पुजारी महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. स्वातंत्र्य लढ्यातील त्यांच्या महान कार्याची माहिती वाचकांना सांगण्यात आला. छोडो हिंदुस्थान, करेंगे या मरेंगे या त्यांच्या घोषणामागील कार्याचा सविस्तर वृत्तांत सांगण्यात आला.

- **यशवंतरावजी चव्हाण साहेबांची पुण्यतिथी (२५ नोव्हेंबर २०१३) :**

  महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार पृथ्वीराज चव्हाण, नामदार बाळासाहेब थोरात, नामदार विखेपाटील, आमदार विक्रमसिंह पाटणकर आ. बाळासाहेब पाटील आदी मान्यवरांनी स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांच्या समधीचे दर्शन घेऊन पुष्पचक्रे वाहण्यात आली. स्व. आदरणीय पी.डी.पाटील प्रतिष्ठानच्या वतीने बारा हजार विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय गीत सुमनांची आदरांजली वाहिली. करान्ड शहरातील आणि जिल्हयातील मान्यवर नेतेमंडळी व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

  यशवंतराव चव्हाण साहेबाचे अनुयाई श्रीयुत शंकराप्पा संसुद्दी यांच्या सहस्त्रचंद्र दर्शन सोहळयाच्या निमित्ताने ना. पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. लिबर्टी मजदूर मंडळ व करान्ड शहरातील जुने खेळाडु कार्यकर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यावर लिहलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन मुख्यमंत्र्याच्या हस्ते झाले. सायंकाळी चार वाजता श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या यशवंतराव चव्हाण

कॉलेज ऑफ सायन्स, सौ. वेणूताई चव्हाण कला वाणिज्य महाविद्यालय, ति. विठामाता हायस्कूल, शिवाजी हायस्कूल कराड महाराष्ट्र हायस्कूल कराड या शिवाय शिक्षण मंडळ करान्ड, चे टिळक हायस्कूल, रामबिलास लाहोटी कन्या शाळा, महिला महाविद्यालय करान्ड या सर्व शाळातील, महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक बंधू भागिनी यांच्या सहभागाने सजविलेल्या रथावर यशंवतरावांची प्रतिमा ठेवून कराड शहरातील प्रमुख रस्त्यावरून प्रतिसंगम बागेतील यशंवतरावजींच्या समाधावर जाऊन त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली, शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव मा. प्रकाशबापू पाटील, शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. मुकुंदराव कुलकर्णी (धनी) श्री भास्करराव कुलकर्णी, सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक आवर्जून उपस्थित होते. समाधी परिसरातील पर्णकुटी समोर झालेल्या सभेत मान्यवरांनी आपल्या यशंवतरावाजीच्या सहवासातील आठवणी सांगितल्या.

मिरवणूकीचा शुभारंभ सौ. वेणूताई ट्रस्ट समोर मा. अशोकराव चव्हाण (स्व. यशंवतरावांचे पुतणे) यांच्या हस्ते झाला.

सायकांळी ७ वाजता सौ. वेणुताई सभागृहात मा. उल्हास पवार (पुणे) यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले. मा. उल्हास पवार यांच्या व्याख्यानास बहुसंख्य श्रोते उपस्थिती होते.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन (६ डिसेंबर २०१३) :**

करान्ड नगरपरिषदेच्या नजीक असलेल्या स्व. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान करान्ड केंद्र व सौ. वेणुताई चव्हाण ट्रस्टमधील सर्व सेवक या उपक्रमात सहभागी झाले.

- **स्व. गणपतराव बळवंतराव चव्हाण स्व. यशवंतराव बळवंतराव चव्हाणांचे वडील बंधू जयंती व पुण्यतिथी (१५ डिसेंबर २०१३) :**

स्व. गणपतराव चव्हाण यांची जन्मतारीख आणि मृत्यूची तारीख एकच २५ डिसेंबर होय काही काळ ते करान्ड पालिकेचे अध्यक्षही होते. यशवंतरावांच्या जडण घडणीत त्यांचा महत्वाचा सहभाग होता. त्याना भावूपर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

- **प्रजासत्ताकदिन २६ जानेवारी २०१४ :**

विभागीय केंद्र करान्ड आणि सौ. वेणुताई चव्हाण प.चॅ. ट्रस्ट या दोन्ही ठिकाणी दोन्ही संस्थाचे सर्व सेवकांच्या उपस्थितीत व वाचनालयातील सर्व विद्यार्थ्यांच्या समवेत श्री. मोहनराव डकरे यांनी राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण केले. सर्व कर्मचारी व उपस्थिताना चहापान त्याचप्रमाणे जिलेबीचे वाटप करण्यात आले. गेल्या १० वर्षापासून हा उपक्रम दोन्ही संस्थात मोठया निष्ठेने आणि नियमीतपणे साजरा केला जातो.

- **हळदीकुंकू कार्यक्रम (२७ जानेवारी २०१४) :**

कराड नगर पालिकेच्या अध्यक्ष सौ. टिंगमीरे सर्व नगरसेविका या पुढाकाराने सौ. वेणूताईच्या पुतन्या हळदीकुंकू कार्यक्रम झाला. संक्रान्तीनंतर रथसप्तमीपर्यंत एक दिवस सौभाग्यावती स्त्रिया हा कार्यक्रम करतात. संक्रान्तीचे वाण पण दिले जाते. १५०० पेक्षा जास्त सौभाग्यवती या कार्यक्रमास उपस्थित होत्या, या सर्व कार्यक्रमाचा खर्च नगरपरिषदेने केला. एक नाविन्यपूर्ण असा कार्यक्रम करण्यात आला.

❑❑❑

# विभागीय केंद्र, नाशिक
## कार्यवृत्त

- **'यशवंतराव ते विलासराव' व्याख्यान**

**(वक्ते : ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे) बुधवार, दि. १४ ऑगस्ट :**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंत चव्हाण यांनी समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी दूरदृष्टीने प्रयत्न केले. नीती आणि राजकारणाचा समन्वय साधून कला-साहित्य-संस्कृतीच्या विकासासाठी कृतिशील योगदान दिले. तीच परंपरा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आपापल्या परीने जोपासली आहे. महाराष्ट्र ही उत्कृष्ट नेतृत्वाची खाण आहे पण आजच्या राजकारणाचे चित्र पाहता फार आशा नाही. त्यासाठी जबाबदार नेतृत्वाची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी केले. यशंवतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिकतर्फे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांचे 'यशवंतराव ते विलासराव या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, सातत्याने महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करणारी ही व्यक्तिमत्त्वे माणूस म्हणूनही मोठी होती. लोकहितासाठी त्यांनी राजकीय द्वेष बाजूला ठेवला. हे त्यांचे मोठेपण होते. विचार, व्यवस्था, परिवर्तन यांचा सातत्याने विचार करणारी ही सर्व समाजकारणी होती. त्यांचा आदर्श आजच्या नेत्यांनी घेण्याची गरज आहे. संस्कारांचे राजकारण पुन्हा सजविण्याची आवश्यकता आहे. यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी केलेल्या विधायक आणि विकासात्मक कार्याचा वेध घेत श्री. भावे यांनी अनेक आठवणी कथन केल्या.

कार्यक्रमास विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इस्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रतिष्ठानच्या वाटचालीचा मागोवा कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी घेतला. प्रतिष्ठाने अध्यक्ष विनायक पाटील यांनी मधुकर भावे यांचा सन्मान केला.

याप्रसंगी आमदार जयप्रकाश छाजेड, प्रतिष्ठाने विश्वस्त डॉ. शोभा बच्छाव, संजय नागरे, जयप्रकाश जातेगावकर, डॉ. दिनेश बच्छाव, श्रीकांत बेणी, प्रा. यशवंत पाटील, दामोदर मानकर, मोठाभाऊ भामरे, शरद पुरणिक, हंसराज पाटील व नाशिककर रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **'सृजनशीलता आणि नाट्य कार्यशाळा'**

**अभिनेते, दिग्दर्शक व लेखक : संदेश कुलकर्णी (शुक्रवार दि. १६ ऑगस्ट ते रविवार दि. १८ ऑगस्ट २०१३):**

रसिकांच्या मनातल्या घडणाऱ्या प्रक्रियेचा शोध लेखकाने घेतला पाहिजे आणि आपल्या अभिव्यक्तीतून समाजाच्या बऱ्यावाईट घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब आपल्या लेखनातून मांडले पाहिजे. त्यासाठी समर्पित भावनेने वास्तवाशी नाळ जोडावी, असे प्रतिपादन अभिनेते, लेखक व दिग्दर्शक संदेश कुलकर्णी यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक व दि जिनियस, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सृजनशीलता आणि नाट्य कार्यशाळा' या विषयावरील तीन दिवशीय कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी प्रकट मुलाखतीच्या वेळी संदेश कुलकर्णी बोलत होते.

यावेळी त्यांनी आपला नाट्यप्रवास उलगडून दाखवला. लहानपणी गणेशोत्सवात होणाऱ्या नाटकांच्या कुतुहलापोटी नाट्यवेड मनात शिरलं आणि त्यातून नाटकातून काहीतरी मांडता येते ही जाणीव मनात रुजली. अभियांत्रिकीचे शिक्षण सुरू असताना महाविद्यालयीन

स्पर्धांतून आत्मविश्वास मिळाला आणि नवनवीत संहिता शोधून प्रयोग केले. विजय तेंडूलकरांच्या 'कोवळी उन्हं' या स्तंभलेखांचे नाट्य रूपांतर केलं आणि आपल्या शक्यता आजमावता आल्या. याच काळात लंडनच्या रॉयल कोर्ट थिएटरतर्फे नवनाटककारांसाठी असलेल्या शिबिरात सहभागी होण्याची संधी मिळाली आणि जागतिक रंगभूमीत लेखकाला किती महत्त्व आहे याचाही प्रत्ययं आला. तरुण कलावंतांनी मुंबई-पुण्याच्या ग्लॅमरच्या दुनियेचं आकर्षण न बाळगता आपल्यातलं बाहेर काढा, अविष्कारात सातत्य ठेवा, प्रेक्षकांची अभिरूची घडविण्यासाठी प्रयत्न करा आणि आपले वेगळेपण सिध्द करा, असेही श्री. कुलकर्णी म्हणाले, सुप्रसिध्द नाटककार दत्ता पाटील यांनी ही मुलाखत घेतली. शिबिरास विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ. एम. यांचे सहकार्य लाभले.

कार्यशाळेत साठहून अधिक शिबिरार्थी सहभागी झाले होते. या शिबिरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले, त्यात डॉ. राजीव पाठक यांनी 'ओळख शरीराची', सुप्रसिध्द शास्त्रीय गायिका मंजिरी असनारे-केळकर यांनी गायन, रियाज आणि आवाज, सुप्रसिध्द उद्योजक सुधीर मुतालिक व ज्योस्त्ना मुतालिक यांनी 'आमचा प्रवास', मानसोपचार तज्ज्ञ डॉ. उमेश नागापूरकर यांनी 'तरुणांपुढील ताणतणाव व त्याचे नियोजन, मुक्ती', प्रशांत केळकर यांनी 'आपला जन्म', चित्रकार अशोक धिवरे यांनी 'चित्र कसे वाचावे' तर विश्वास ठाकूर यांनी 'सहकार व बचत गट' या विषयावर मार्गदर्शन केले.

यावेळी शिबिरार्थींना प्रमाणपत्राचे वाटप पोलिस उपायुक्त संदीप दिवाण यांचे हस्ते करण्यात आले. शिबिरार्थींच्यावतीने स्वराली हरदास व मल्हार मुतालिक यांनी मनोगत व्यक्त केले.

- **'आठवणी नाशिकाच्या'**

**मुलाखतींच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या ज्येष्ठ व्यक्तींच्या सत्काराचे आयोजन**

**(शनिवार दि. १७/०८/२०१३) :**

नाशिकमध्ये वास्तव्यास असलेल्या विविध क्षेत्रात कर्तृत्व सिध्द केलेल्या ज्येष्ठ व्यक्तींच्या आठवणींवर आधारीत 'आठवणी नाशिकाच्या' हा मुलाखतींचा कार्यक्रम रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम.ने नाशिककर श्रोत्यांना १४ भागांच्या प्रसारणातून सादर केला. सदर कार्यक्रम नाशिकाच्या कलासंस्कृतीची अनोखी ओळख करून देणारा ठरला. यात नाशिकच्या सामाजिक, उद्योग, कला, साहित्य, संगीत, नृत्य, पत्रकारिता अशा निरनिराळ्या क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग होता. या कार्यक्रमातून नाशिकाबद्दलची दुर्मिळ आणि वैशिष्ट्यपूर्ण माहिती व आठवणी रसिकांसाठी सुवर्णयोग ठरल्या.

विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को - ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इस्टिट्यूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'आठवणी नाशिकच्या' या मुलाखतींच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या ज्येष्ठ व्यक्तींच्या सत्काराचे आयोजन गंगापूर रोड, आनंदवल्ली येथील विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या सभागृहात करण्यात आले होते. यात देवकिसनजी सारडा, कमलाकर वारे, मधुकर झेंडे, श्रीकांत केळकर, नेताजी भोईर, संजीवनी कुलकर्णी, किशोर पाठक, सदानंद जोशी या मान्यवरांचा समावेश होता. या सर्वांचा सत्कार विश्वास को - ऑप. बँकेचे संस्थापक अध्यक्ष व रेडिओ विश्वासचे सचिव विश्वास ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेडिओ विश्वासचे विश्वास शेरीकर यांनी केले. याप्रसंगी डॉ. कैलास कमोद, डॉ. सुभाष पवार, विवेक ठाकूर व नाशिककर श्रोते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सदानंद जोशी यांनी केले.

- **शाडू मातीपासून गणपती मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा मार्गदर्शक : शिल्पकार भास्कर सदाशिव भानोसे, शनिवार दि. ३१/०८/२०१३ :**

विभागीय केंद्र नाशिकतर्फे इको फ्रेंडली गणरायाचे स्वागत करण्यासाठी, पर्यावरण जागृतीचा संदेश देण्यासाठी शाडू मातीपासून गणेश मूर्ती तयार करण्याच्या प्रात्याक्षिक शाळेचे आयोजन सावरकरनगर येथील विश्वास लॉन्स येथे करण्यात आले होते. सामाजिक जाणीवेतून पर्यावरणाचा प्रबोधनपर विचार रुजविण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेस विश्वास को - ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास, ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

सुप्रसिद्ध शिल्पकार सदाशिव भानोसे यांनी कार्यशाळेत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. शाडू मातीचे शास्त्रीय व पर्यावरणाच्या दृष्टीने त्यांनी महत्त्व विशद केले. शाडू मातीत पर्यावरणास घातक ठरणारे कुठल्याही प्रकारचे रासायनिक मिश्रण नसते, त्यामुळे मूर्तीला तडा जात नाही तसेच पाण्यात सहजपणे विरघळते. मातीत चिकटपणा असल्याने हाताळण्यासाठी व आकार देण्यासाठी सहजता असते, असे त्यांनी वैशिष्ट्य विशद केले. यावेळी श्री. भानोसे यांनी कार्यशाळेत सहभागी शिबिरार्थींकडून मूर्ती बनवून घेतल्या. यावेळी उपस्थित शिबीरार्थींच्या प्रश्नांचे त्यांनी निरसन केले.

कार्यशाळेस विश्वास को - ऑप. बँकेचे सहाय्यक महाप्रबंधक सारिका देशपांडे, महेंद्र पवार, किशोर त्रिभुवन, व्यवस्थापक राजेंद्र जाधव, वैशाली दाणी, जनसंपर्क अधिकारी मनिषा पगारे, अधिकारी रमेश बागुल तसेच कर्मचारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **'सृजन' उपक्रमांतर्गत ' गणेशाचे चित्र रंगविणे' स्पर्धाः रविवार, दि.०१/०९/२०१३**

मुलांच्या सृजनशीलतेला वाव देण्यासाठी त्यांच्या मूलभूत कला-गुणांना दिशा देण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व विश्वास को - ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'सृजन' या उपक्रमांतर्गत 'गणेशाचे चित्र रंगविणे' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याला मुलांचा उस्फूर्त सहभाग लाभला. या उपक्रमास विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ. एम. यांचे सहकार्य लाभले. सावरकरनगर येथील विश्वास लॉन्स येथे ही स्पर्धा संपन्न झाली.

सर्व कलांचा नायक, विघ्नहर श्री गणेशाच्या विविध रूपांचे, आकारांचे कलात्मक आविष्कार मुलांनी आपल्या रंगरेषातून घडवले. 'श्री गणेश' आपला सर्वांचा मित्र, देव या जाणीवेतून जलरंग, खडूरंग व कोलाज अशा विविध माध्यामातून मुलांनी चित्रांतून नाविन्यपूर्ण रंगअविष्कारातून आपल्यातील चित्र जाणिवांचे दर्शन घडविले. रोजच्या जगण्याच्या विषयांचे गणरायाशी नाते किती अतूट आहे, हेही चित्रांतून व्यक्त केले.

या स्पर्धेसाठी तीन गट करण्यात आले होते. यातील

१) लहान गट : प्रथम क्रमांक - सांची अभय जाधव, द्वितीय क्रमांक - ईश्वरी मंगेश शिरसाठ, तृतीय क्रमांक - सार्थक कालिदास अवसरकर

२) मध्यम गट : प्रथक क्रमांक (विभागून) - राम राजेंद्र पवार, प्रथम क्रमांक (विभागून) - वैष्णवी वैभव उपासनी, द्वितीय क्रमांक - दुर्वाक्षी शिंपी, तृतीय क्रमांक - हर्षिता राजेंद्र जाधव, उत्तैजनार्थ - शुभम संतोष पगारे

३) मोठा गट : प्रथम क्रमांक - देव राजेंद्र पवार, द्वितीय क्रमांक - अनय हिंगणकर, तृतीय क्रमांक - रिद्धी विजय नेवे.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून चित्रकार कैलास ह्याळीज यांनी काम पाहिले. स्पर्धेत ७० हून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

- **'सोशल मिडीया – दुधारी तलवार' 'लोकसंवाद' उपक्रमांतर्गत समूहचर्चेचे आयोजन बुधवार, दि. ११/०९/२०१३ :**

सोशल मिडीयाने जगभरातील जनतेची मानसिकता बदलविण्याचे काम सुरु केले असून या स्वायत्त माध्यमाचा प्रत्येकाने किती वापर करावा, याचा गांभीर्यपूर्वक विचार करणे गरजेचे आहे. विश्वासार्हता आणि सार्वजनिक संकेतांची जोपसना करणे हिच या माध्यमाची मूलतत्त्वे आहेत, असे मत प्रा. अनंत येवलेकर यांनी व्यक्त केले.

सोशल मीडियांच्या वापरामुळे होणारे फायदे व तोटे यांची साधकबाधक अभ्यासपूर्ण चर्चा व्हावी, या उद्देशाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व क्रांतिवीर वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक संस्था, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकसंवाद' उपक्रमांतर्गत 'सोशल मिडीया – दुधारी तलवार' या विषयावरील समूह चर्चेचे आयोजन क्रांतिवीर वसंतराव नाईक महाविद्यालयात करण्यात आले होते. सदर समूहचर्चासत्रास विश्वास को–ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

यावेळी प्रा. अनंत येवलेकर, महाराष्ट्र टाइम्सच्या नाशिक आवृत्तीचे प्रमुख सचिन अहिरराव, मराठी वर्ल्ड डॉट कॉमच्या निर्मात्या भाग्यश्री केंगे, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. उमेश नागापूरकर, प्राचार्य डॉ. वैशाली रोकडे, मोमेन्टम संस्थेच्या समुपदेशक ऊर्जा पाटील यांची सहभाग घेतला.

यावेळी सचिन अहिरराव म्हणाले की, रोजचे जगणे आणि सोशल मिडिया यांची सरमिसळ होण्याचा हा काळ आहे. माध्यम क्रांतीचा बदलाचा हा वेगवान काळ आहे. यातूनच व्यावसायिकतेचा एक नवा पर्याय समोर आला आहे. सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सोशल मिडियाचा प्रभावी वापर होऊ शकतो. या माध्यमाचा वापर करताना बुध्दी आणि भान जागृत ठेवण्याचा सल्लाही त्यांनी दिला. भाग्यश्री केंगे म्हणाल्या की, सोशल मिडियातून व्यावसायिकता आणि व्यक्तीचे ग्राहकात रूपांतर होण्याची प्रक्रिया वेगाने घडत असते. या माध्यमातून येणाऱ्या माहितीची विश्वासार्हता व चिकित्सा करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. डॉ. उमेश नागापूरकर म्हणाले की, त्वरीत प्रतिसाद देणाऱ्या सोशल मिडियासारख्या माध्यमातून आभासी आणि वास्तव यातील सीमारेषा पुसण्याची मानसिकता निर्माण होत आहे. क्रांतिवीर वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष तुकराम दिघोळे म्हणाले की, व्यापक विचारातून, ज्ञान प्राप्तीसाठी जबाबदारीच्या जाणीवेतून मिडियाचा वापर केल्यास यातून विधायक परिणाम समोर येतात.

प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी प्रास्ताविक केले तर विश्वस्त संजय नागरे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला.

- **'माहिती व तंत्रज्ञानाचा शिक्षणातील वापर' 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत समूहचर्चेचे आयोजन गुरुवार, दि. २६/०९/२०१३ :**

शिक्षण व्यवस्थेतील प्रगतीशील बदलांची व्यापक पातळीवर चर्चा व्हावी, विचारमंथन व्हावे, तसेच शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्याशी संवाद साधणे, या उद्देशाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व मॉडर्न एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'माहिती व तंत्रज्ञानाचा शिक्षणातील वापर' या विषयावरील समूहचर्चेचे आयोजन मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालय अशोकनगर, सातपूर, नाशिक येथे करण्यात आले होते. सदर समूहचर्चासत्रास विश्वास को–ऑप. बँक. लि., नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट व

विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ. एम. यांचे सहकार्य लाभले.

शिक्षणतज्ज्ञ अरुण ठाकूर म्हणाले की, आधुनिक शिक्षण व्यवस्थेत शिक्षकांनी आपली पारंपारिक भूमिका बदलणे गरजेचे आहे. माहिती तंत्रज्ञानाची सांगड ज्ञानाशी जोडावी आणि त्यात आपले कौशल्य निर्माण करावे, त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांना निश्चित दिशा देण्याबरोबरच बदलत्या जगाची आव्हानात्मक जाणीव त्यांच्यात निर्माण करावी.

स्वागत व प्रास्ताविक करताना प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर म्हणाले की, शिक्षण व्यवस्थेत होणारे रचनात्मक बदल विद्यार्थ्यांसाठी किती अभ्यासपूर्ण आहेत आणि ज्ञान मिळविण्याच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांशी त्यांचे किती जवळकीचे नाते आहे, याचीही चर्चा व्हावी, या उद्देशाने ही समूहचर्चा आयोजित करण्यात आली आहे. शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. झेड. एस. भंदुरे म्हणाले की, शिक्षणाच्या क्षेत्रात घडणाऱ्या नवनवीन आव्हानांची साधकबाधक चर्चा होऊन देश घडवण्यासाठी याचा वापर विद्यार्थी करतील.

समूहचर्चेचे सूत्रसंचालन 'मोमेन्टम' च्या प्रशिक्षिका ऊर्जा पाटील यांनी केले तसेच वक्त्यांचा परिचय निलेश तिवारी, नीलांबरी क्षीरसागर व मुख्याध्यापिका पद्मा जाधव यांनी करून दिला. याप्रसंगी पालक, विद्यार्थी,शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **'नाशिकऑनग्रीनव्हील' सायकलरॅलीलानाशिककरांचा जोरदार प्रतिसाद शनिवार दि. १९/१०/२०१३ :**

पुण्या-मुंबई नंतर नाशिकेने शिक्षण, आरोग्य या क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविला असून नाशिकची स्वतंत्र संस्कृती उदयास आली असून विविध उपक्रमांच्या माध्यमातून नाशिकचे वेगळेपण टिकून आहे. याचाच एक भाग म्हणून सायकल रॅलीचे आयोजन हा आरोग्यविषयक उपक्रम, जनजागृती व प्रबोधनपर जागृती करणारा आहे. त्यातून इंधनाची तसेच आर्थिक बचत होते. नाशिकचा हा आदर्श इतर शहरांनीही घ्यावा व सायकल रॅलीचा उपक्रम हा माणसे जोडण्याचाच उपक्रम आहे. असे प्रतिपादन खा. सुप्रिया सुळे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक, नाशिक इको ड्राईव्ह, जैन सोशल ग्रुप प्लॅटीनम नाशिक, क्युरी मानवता कॅन्सर सेंटर, साईबाबा हार्ट इन्स्टिट्यूट नाशिक, नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशन, रेडिओ विश्वास ९०.८ एफ. एम. (कम्युनिटी रेडिओ) यांच्या संयुक्त विद्यमाने 'नाशिक ऑन ग्रीन व्हील' या उपक्रमांतर्गत सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी खा.सुळे बोलत होत्या. सदर सायकल रॅलीत खा. सुप्रिया सुळे या सहभागी होऊन सायकलिंग केले. या रॅलीला नाशिककरांचा उत्स्फूर्त व जोरदार प्रतिसाद लाभला. परिसरातील नागरिकांनी खा. सुप्रिया सुळे यांचे स्वागत व औक्षण केले.

कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिकचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. उपस्थितांचे स्वागत नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष धनपाल शहा यांनी केले. रॅलीच्या मार्गाबाबत माहिती नाशिक इको ड्राइव्हचे अध्यक्ष किरण चव्हाण यांनी दिली. सायकल रॅलीची सुरुवात खा. समीर भुजबळ यांनी हिरवा झेंडा दाखवून केली. किरण चव्हाण, कमलेश कोठारी, डॉ. राज नगरकर, डॉ. अनिरूद्ध धर्माधिकारी, धनपाल शहा, विक्रम उगले, शरद कोशिरे, छबू नागरे, उदय सांगळे यांचा खा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

- **'कॉम्प्युटर युगातील मराठी भाषा' 'लोकसंवाद' उपक्रमांतर्गत समूहचर्चेचे आयोजन सोमवार, दि.२१/१०/२०१३ :**

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मराठी भाषेच्या समृध्दीसाठी करण्याचा प्रयत्नांना चांगले यश मिळत असून त्यामुळेच भाषेविषयी सजगता निर्माण होण्यास निश्चित मदत

होत आहे. भाषेमुळे संस्कृतीचे जतन होत असते आणि इतिहासाकडे बघण्याची दृष्टिही मिळते. हाच विचार मराठी भाषेला व्यापकतेकडे नेण्यासाठी महत्त्वाचा आहे. आपल्या लोकभाषा, बोलीभाषा यांचे दस्तऐवजीकरण करण्याची गरज असून त्यासाठी युवा पिढीने पुढाकार घेण्याची गरज आहे त्यातूनच भाषेचे जतन आणि संवर्धन वेगाने होईल, असे प्रतिपादन संगणकतज्ज्ञ सुनील खांडबहाले यांनी केले. मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनाबाबत चर्चा व्हावी या उद्देशाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, सिलिकॉन व्हॅली नाशिक, विश्वास को ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ. एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकसंवाद' उपक्रमांतर्गत 'कॉम्प्युटर युगातील मराठी भाषा' या विषयावरील समूहचर्चेचे आयोजन सिलिकॉन व्हॅली, विठ्ठल चरणी, विठ्ठ मंदिरासमोर, कॉलेज रोड, नाशिक येथे करण्यात आले होते.

- **'ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा' प्रमुख अतिथी : कवी अशोक नायगांवकर शुक्रवार, दि. २५/१०/२०१३ :**

बदलती गतीमान जीवनशैली, ढासळलेली मूल्यव्यवस्था, नात्यातून हरवत चाललेली आस्था, वाढता चंगळवाद असा आजच्या पिढीचा प्रवास सुरू असून त्यांना योग्य दिशा देण्यासाठी कुटुंबातील ज्येष्ठांचे मार्गदर्शन काळाचीच गरज आहे व त्यातून आदर्शवादी संकल्पना रुजण्यास निश्चित मदत होईल व सुसंस्कृत समाजासाठी ते पूरकच आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी अशोक नायगांवकर यांनी केले.

यशंवतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक व लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंच, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक शहरातील सर्व ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभासदांसाठी 'ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्याचे' आयोजन कुसुमाग्रज स्मारक, विद्याविकास चौक, गंगापूर रोड, नाशिक येथे करण्यात आले होते. मेळाव्यास विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ. एम. यांचे सहकार्य लाभले.

मेळाव्याचे स्वागत व प्रास्ताविक विश्वस्त गुरुमित बग्गा यांनी केले. अध्यक्षीय मनोगत प्रतिष्ठानचे सचिव ॲड. विलास लोणारी यांनी व्यक्त केले. लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचचे रमेश देशमुख यांनी आपले विचार व्यक्त केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन द.म. कुलकर्णी यांनी केले तर आभार मुक्तेश्वर मुनशेट्टीवार यांनी मानले. मेळाव्यास प्रतिष्ठानच्या विश्वस्त डॉ. शोभा बच्छाव, शरद बुरकुले तसेच शहारातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **संत साहित्याचे अभ्यासक डॉ.सदानंद मोरे यांची मुलाखत, मुलाखतकार : कवी किशोर पाठक, रविवार दि.२४/११/२०१३ :**

परंपरा आणि आधुनिकतेच्या समन्वयातून वर्तमानाशी नाते जोडण्याचा मी माझ्या लेखनातून सातत्याने प्रयत्न केला. त्यासाठी इतिहासाशी नाळही मी तुटू दिली नाही. घरातील वाचन संस्कारातून अभ्यासपूर्ण वाचनही झाले. संत तुकारामाचे लेखन वाचून यातून सामाजिक सुधारणेचा संदेश परिणामकारकपणे पोहोचला आहे याचीव जाणीव झाली आणि त्यातूनच महाराष्ट्राच्या समग्र बदलांचा वेध घेण्याचा प्रयत्न मी लेखनातून केला आहे, असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक, विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या २९ व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को - ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. सदानंद मोरे यांची प्रकट

मुलाखत शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी सभागृह, जुना गंगापूर नाका, गंगापूर रोड, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर मुलाखत कवी किशोर पाठक यांनी घेतली. ते पुढे म्हणाले की, तुकारामांच्या भाषेचा सामाजिक चळवळींवर, संस्कृतीवर प्रभाव आहे. तुकोबा ही जनमाणसांची अपरिहार्य गरज आहे. त्यांच्या विरोधकांनीही तुकोबांचाच आधार घेतला आहे. 'तुकाराम दर्शन' लिहिताना वर्तमानाशी नाते जोडण्याचा मी प्रयत्न केला आणि त्यालाही वाचकांनी प्रतिसाद दिला. 'लोकमान्य ते महात्मा' या ग्रंथातून महाराष्ट्राची सामाजिक जडणघडण, राजकरण यांचाही वेध घेतानाच समृध्द व परंपरेचा शोध घेणे मी आव्हान मानले आणि त्यातून व्यापक पट असलेला 'गर्जा महाराष्ट्र माझा' हा ग्रंथ, 'उजळल्या दिशा', शिवचरित्रावरील नाटके लिहून झाली. 'बालगंधर्व' व गोहरजान' यांच्यावर सध्या नाटक लिहित असून यशवंतराव चव्हाण यांच्या चरित्राचे लेखनही करणार असल्याचे डॉ. मोरे म्हणाले. यावेळी त्यांनी साहित्य, सांस्कृतिक, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक विचारधारा यावर अभ्यासपूर्ण विवेचन केले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले. कार्यक्रमास प्रतिष्ठानचे विश्वस्त माधवराव पाटील तसेच यशवंतराव पाटील, पां. भा. करंजकर, नानासाहेब बोरस्ते, ॲड. भगीरथ शिंदे, डॉ. सुधीर संकलेचा, विनायक रानडे, डॉ. मनोज शिंपी, श्याम अष्टेकर आदि मान्यवर व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **'विद्यार्थ्यांसाठी आचारसंहिता' 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत समूहचर्चेचे आयोजन, शुक्रवार, दि २९/११/२०१३ :**

विद्यार्थ्यांनी आत्मप्रेरणेने आपल्यात स्वयंशिस्त निर्माण करण्याची गरज असून आई-वडिलांशी संवादातून मनातल्या घुसमटीला वाट मोकळी करून घ्यावी, त्यांच्या अपेक्षांना ओझे न मानता आव्हान म्हणून स्वीकारावे, चांगूलपणाचा शोध घ्या, आचार-विचारातून आचारसंहितेचा आदर्श व्यक्त होत असते. तोच आदर्श व्यक्तिमत्वाची प्रभावी गुरूकिल्ली आहे असे प्रतिपादन निवृत्त शिक्षक व साहित्यिक नरेश महाजन यांनी केले.

शिक्षक व्यवस्थेतील प्रगतिशील बदलांची व्यापक पातळीवर चर्चा व्हावी, विचारमंथन व्हावे तसेच शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्याशी संवाद साधणे या उद्देशाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, नवरचना विद्यालय नाशिक, विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'विद्यार्थ्यांसाठी आचारसंहिता' या विषयावरील समूहचर्चेचे आयोजन नवरचना विद्यालय, सावरकर नगर, गंगापूर रोड, नाशिक येथे करण्यात आले होते.

नवरचना विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर पालखेडकर म्हणाले की, शाळेत म्हटल्या जाणाऱ्या प्रार्थना, सुविचार ही शुद्ध व पवित्र मनाची सुरूवात असते. आपण जी कृती करतो, अध्ययन करतो त्याच्या माझ्या जगण्यासाठी नेमका उपयोग काय ? हा प्रश्न स्वतःला विचारा. स्वयंशिस्तीतून जीवनाचा उज्ज्वल मार्ग सापडत असतो. वडीलधाऱ्यांच्या आदर करण्यातूनच समाजाविषयी काही करण्याची भावना रूजत असते, त्यासाठी विधायकतेचा स्वीकार करावा.

नवरचना विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुनील गायकवाड म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शिस्तीची सुरूवात कुटुंबातील संस्कारातून होत असते. त्यानंतर गुरूजन आणि समाज अशा त्रिस्तरीय पातळीवर असा त्याचा प्रवास असतो. खिलाडूवृत्ती, प्रमाणिकपणा हया गुणांचा अंगीकार करून स्वतःला घडवण्याची प्रक्रिया करावी व चांगला नागरिक बनण्यासाठी प्रयत्नशील रहावे.

नवरचना विद्यालयाच्या पुष्पा चोपडे म्हणाल्या

की, सभोवतालच्या निरीक्षणावरून मानसिक बदलांची क्रिया होत असते. शिक्षणातून व्यक्तीची जडणघडण होते त्याचबरोबर वृत्ती घडवली जाते ही मोठी उपलब्धी आहे. जिज्ञासू वृत्ती आणि समाजाचे आपण काही देणे लागतो याच भावनेतून सामाजिक बांधीलकीची भावना निर्माण होते. स्वतःची उन्नती करून उज्ज्वल देश घडविण्याचे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना यावेळी केले.

यावेळेस विद्यार्थी व विद्यार्थीनी वक्त्यांना विविध प्रश्न विचारले. कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक व परिचय प्रतिष्ठानच्या विश्वस्त दिपाली मानकर यांनी करून दिला, तर मान्यवरांचा सन्मान प्रतिष्ठानचे विश्वस्त विनायक रानडे यांनी केला. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **'मैत्री आकाशाशी' 'सृजन' उपक्रमांतर्गत स्लाईड शोसह व्याख्यान**

**मंगळवार, दि. १० /१२/ २०१३ :**

विश्वाच्या अंतरंगात दडलेल्या अद्भूत आणि माहितीपूर्ण ज्ञानाचा खजिना खगोलशास्त्राचे अभ्यासक रमाकांत देशपांडे यांनी उलगडून दाखविला. विश्वाचा शोध, निर्मिती, आकाशगंगा, सूर्यग्रहण, मंगळावरील जीवसृष्टी, गुरुत्वाकर्षण, तारा तुटणे म्हणजे काय ? अशी अनेकविध उत्तरे स्लाईड शोसह व्याख्यानातून सोप्या भाषेत त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली आणि खऱ्या अर्थाने मुलांची 'आकाशाशी मैत्री' झाली.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयक आवड निर्माण व्हावी, विज्ञानातील बदलत्या शोध व संशोधनाविषयी माहिती व्हावी या उद्देशाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, विश्वास को-ऑप. बँ. लि., नाशिक, एकलव्य निवासी स्कूल नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ. एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'सृजन' उपक्रमांतर्गत 'मैत्री आकाशाशी' या विषयावर स्लाईड शोसह व्याख्यानाचे आयोजन एकलव्य निवासी स्कूल, पेठ रोड, पंचवटी, नाशिक येथे करण्यात आले होते त्याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

लघुग्रह, धुमकेतू, उल्का, चंद्रावर मानवाची स्वारी व तेथील वातावरण यांचा समावेश होता. यावेळी श्री. देशपांडे यांनी विद्यार्थ्यांनी उघड्या डोळ्यांनी आकाशाकडे बघा, कुतुहलातून नवनवीन शोधांचा जन्म होतो त्यासाठी विज्ञानाची कास धरा, विज्ञानाचे साहित्य वाचा तसेच पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करण्याचा संदेशही दिला.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक एकलव्य निवासी स्कूलचे मुख्याध्यापक अशोक बच्छाव यांनी केले. परीचय सुनील भाकरे यांनी करून दिला, तर सूत्रसंचालन सदानंद गावीत यांनी केले. कार्यक्रमास भालचंद्र नंदन, दौलत उगले, गजानन पायघन, भाऊराव गुंजाळ, मिलिंद पाटील आदी शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

- **कागदी पिशव्या बनविण्याची कार्यशाळा**

**बुधवार, दि. ०१/०१/२०१४ :**

महिलांमधील मूलभूत कार्यकौशल्याला संधी उपलब्ध करून देणे म्हणजे त्यांच्या आर्थिक उन्नतीच्या प्रक्रियेला बळ देणे होय. यासाठी समाजातील सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेऊन विविध प्रशिक्षण शिबिरे व कार्यशाळांचे आयोजन करून महिलांना रोजगारातून सबलीकरणाला मदत करावी असे प्रतिपादन विश्वास को-ऑप. बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई. विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. याच्या संयुक्त विद्यमाने पेपर बॅग्ज तयार करण्याच्या कार्यशाळेचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते, यावेळी मार्गदर्शन

करताना ते बोलत होते. श्री. ठाकूर यांनी महिला बचत गटांच्या सक्षमीकरण, महिलांचे अधिकार, आरक्षण यामुळे परिवर्तनशील बदलांचा आढावा घेतला.

पर्यावरण रक्षण होण्यासाठी कागदी पिशव्यांचा वापर करणे ही काळाची गरज आहे या उद्देशाने या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात शंभरहून अधिक महिलांना उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यशाळेला विश्वास को-ऑप. बँकेच्या जनसंपर्क अधिकारी मनीषा पगारे यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणातून स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिक प्राप्ती होईल असे प्रशिक्षणार्थी महिलांनी सांगितले. यावेळी दिपाली मानकर व कविता निकम यांनी महिलांच्या सुरक्षेविषयी, कायद्यांविषयी मार्गदर्शन केले.

- **'जागर अभ्यासाचा' व 'सृजनशील पालक' या विषयावर कार्यशाळा 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत दोन दिवशीय कार्यशाळेचे आयोजन**

**शनिवार, दि ११/०१/२०१४ व रविवार, दि. १२/०१/२०१४ :**

विद्यार्थ्यांनी अभ्यासाला तणाव न मानता हसतखेळत अभ्यास करावा, त्यातून मिळणारा आनंद हा आत्मविश्वास निर्माण करणारा असतो. अभ्यासाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकास, संघटनकौशल्य, संवाद साधण्याची कलाही अवगत करण्यासाठी प्रयत्न करावे व जीवनात आलेल्या संधीचे सुवर्ण संधीत रुपांतर करावे असे प्रतिपादन भारत संचार निगमचे नाशिक व धुळ्याचे महाप्रबंधक डॉ. नितीन महाजन यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक, सृजन कन्सलटन्टस् नाशिक, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, विश्वास को-ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ. एम. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'जागर अभ्यासाचा' व 'सृजनशील पालक' या विषयावरील दोन दिवशीय कार्यशाळेच्या शुभारंभ डॉ. महाजन बोलत होते. ते म्हणाले की, भारतीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील प्रगती ही थक्क करणारी आहे. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाने देशाचे नाव उज्ज्वल केले आहे त्याचा सर्वांनी आदर्श घ्यावा. उद्योजक अनिल लाड म्हणाले की, कुठलाही उद्योग करतांना त्यात अभ्यासूवृत्ती आणि मेहनत यांची सांगड घालणे आवश्यक आहे. त्यातून यशस्वी उद्योजक निर्माण होत असतात. यासाठी उद्योग जगतातील प्रयोगशील बदलांचा अभ्यास करावा. सदर कार्यशाळा प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाली.

प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांमधील उपजत कौशल्याला दिशा मिळावी व त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळावी या उद्देशाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सातत्याने अशा कार्यशाळा भविष्यातही आयोजित करण्याचा मानस आहे.

कार्यशाळेस सृजन कन्सलटन्टचे शंतनु गुणे, पुणे येथील ज्ञान प्रबोधिनीचे दीपक गुप्ते, ज्योती केमकर यांनी मार्गदर्शन केले. यात वाचन, नोट्स लिहिणे, ध्येय निश्चिती, वेळापत्रक, अभ्यासाच्या विविध पध्दती, स्मरणशक्ती, बहुआयामी बुध्दिधमत्ता, स्वतःतील क्षमता जाणणे, उत्तम असा ध्यास या विषयाचर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पालक संवादाचेही आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेस चाळीसहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

- **विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा**

**शनिवार, दि. २५ / ०१/२०१४ :**

उत्तम वक्ता होण्यासाठी चौफेर दृष्टी, समाजातील बदलत्या घटनांचे निरीक्षण, अवलोकन, विविध विषयांवरील वाचन, तीक्ष्ण संवेदनशक्ती त्याचबरोबर आपले म्हणणे प्रखरपणे पटवून देण्याची हातोटी, देहबोली

या मूलभूत गुणांची गरज आहे. यासाठी वक्तृत्व स्पर्धा मार्गदर्शक ठरतात, असे प्रतिपादन डॉ. कैलास कमोद यांनी केले.

यशंवतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक, राजा शिवाजी मार्गदर्शन केंद्र नाशिक, विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ. एम. यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'वक्तृत्व स्पर्धेचे' आयोजन राजा शिवाजी मार्गदर्शन केंद्र, सिबल फर्निचर शोरुम जवळ, मायको सर्कस, त्र्यंबक रोड, तिडके कॉलनी, नाशिक येथे करण्यात आले होते. याप्रंसगी पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, की जगातल्या उत्कृष्ट वक्त्यांनी आपली स्वतंत्र शैली निर्माण केली आहे. शब्दोच्चारातील स्पष्टपणा हा त्यांच्या वक्तृत्व कलेतील महत्त्वाचा गुण होता, त्याचा सर्वांनी आदर्श घ्यावा. आत्मविश्वास आणि सभाधीटपणा यातूनच चांगला वक्ता होण्याचा मार्ग सुकर होता असेही ते म्हणाले.

वक्तृत्व स्पर्धेत इयत्ता ५ वी ते ७ वी च्या गटात सिध्दी संदीप देशपांडे प्रथम, पुष्कर मंगेश भालेराव द्वितीय व साक्षी नरेंद्र पुजारी हिने तृतीय क्रमांक पटकावला. इयत्ता ८ वी ते १० वी च्या गटात आदिनाथ संजय चौधरी प्रथम, ज्ञानदा मनोहर कुलकर्णी द्वितीय व प्रिया दिलीप जैन हिने तृतीय क्रमांक पटकावला. महाविद्यालयीन गटात मुग्धा प्रसाद जोशी प्रथम, श्वेता सुरेश भामरे द्वितीय व विवेक मोहन चित्ते याने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच सहभागी स्पर्धकांस प्रशस्तीपत्रे देण्यात आली. स्पर्धेत १५० हून अधिक विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून सुधा डमरे, ॲड. विजया कुऱ्हे, मैथिली गोखले, ॲड. गायत्री दुसाने, प्रमोद तेंब्रे व ॲड. भगवान भडांगे यांनी काम पाहिले.

याप्रसंगी राजा शिवाजी मार्गदर्शन केंद्राचे अध्यक्ष गोपाळ पाटील, डॉ. शरद महाले, डी. एम. कुलकर्णी, दत्ता नागपूरे, शैलजा औटी, मेजर सुधाकर पिसोळकर तसेच विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

- **'चित्रपट चावडी' द स्टोरी ऑफ क्यू जू (चिनी भाषेतील चित्रपट)**

**शनिवार, दि. २४/०८/२०१३**

विभागीय केंद्र नाशिक व दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व विश्वास को - ऑप.बँक लि., नाशिक यांच्या सयुंक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत चित्रपट रसिकांसाठी दर महिन्याला जागतिक व भारतीय भाषातील अभिजात व कलात्मक चित्रपट दाखविण्यात येत आहेत. यावेळेस सुप्रसिध्द दिग्दर्शक झांग चिमू (चीन) यांच्या 'द स्टोरी ऑफ क्यू जू' हा चिनी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट,नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

'द स्टोरी ऑफ क्यू जू' मध्ये एका सामान्य ग्रामीण स्त्रीची कथा आहे. तिच्या नवऱ्याचा सरपंचाकडून झालेला अपमान व शारीरिक इजा ती सहन करू शकत नाही. गरोदर अवस्थेतही ती न्याय्य मागण्याकरिता अत्यंत संयमाने पण निर्धाराने पाठपुरावा करते. त्या निमित्ताने आपल्याला कम्युनिस्ट चीनमधील ग्रामीण भागातल्या जनजीवनाची ओळख होते. खूपदा आपल्याला भारतीय ग्रामीण परिस्थितीशी साधर्म्यही जाणवेल. अत्यंत साधी सरळ व नैसर्गिकरित्या टिपलेली 'द स्टोरी ऑफ क्यू जू' ची कहाणी व चिनी सुपरस्टार असलेल्या गॉंग ली यांच्या अप्रतिम अभिनयाने नटलेला हा चित्रपट शेवटपर्यंत खिळवून ठेवतो.

- **'चित्रपट चावडी' साँग ऑफ द स्पॅरोज् (फार्सी भाषेतील चित्रपट) शनिवार, दि. ०७/०९/२०१३ :**
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक व दादासाहेब फळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत चित्रपट रसिकांसाठी दर महिन्याला जागतिक व भारतीय भाषातील अभिजात व कलात्मक चित्रपट दाखविण्यात येत आहेत यावेळेस सुप्रसिध्द दिग्दर्शक माजिद मजिदी (इराणा) यांचा 'साँग ऑफ द स्पॅरोज्' हा फार्सी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

- **'चित्रपट चावडी' यी यी (अ वन अँड अ टू) - तैवानी भाषेतील चित्रपट, शनिवार, दि.२१/०९/२०१३ :**
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक व दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत चित्रपट रसिकांसाठी दर महिन्याला जागतिक व भारतीय भाषातील अभिजात व कलात्मक चित्रपट दाखविण्यात येत आहेत. यावेळेस प्रसिध्द दिग्दर्शक एडवर्ड यँग (तैवान) यांचा 'यी यी' हा तैवानी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

- **'चित्रपट चावडी' स्टाविस्की - फ्रेंच भाषेतील चित्रपट शनिवार, दि. २६/१०/२०१३ :**
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व विश्वास को-ऑप. बँक. लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत चित्रपट रसिकांसाठी दर महिन्याला जागतिक व भारतीय भाषांतील अभिजात व कलात्मक चित्रपट दाखविण्यात येत आहेत. यावेळेस प्रसिद्ध दिग्दर्शक अलेन रेन्वा (फ्रेंच) यांचा 'स्टाविस्की' हा फ्रेंच भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ. एम. यांचे सहकार्य लाभले.

- **'चित्रपट चावडी' दि रिटर्न - रशियन भाषेतील चित्रपट शनिवार, दि. २३/११/२०१३ :**
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व विश्वास को-ऑप. बँक लि, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत चित्रपट रसिकांसाठी दर महिन्याला जागतिक व भाषांतील अभिजात व कलात्मक चित्रपट दाखविण्यात येत आहेत. यावेळेस सुप्रसिद्ध दिग्दर्शक आंद्रे, जिगिनीस्तेव (रशिया) यांचा 'दि रिटर्न' हा रशियन भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड इन्स्टिट्यूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ. एम. यांचे सहकार्य लाभले.

- **'चित्रपट चावडी' डाऊनफॉल - जर्मन भाषेतील चित्रपट, शनिवार, दि. २१/१२/२०१३ :**
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व विश्वास को - ऑप. बँक लि., नाशिक यांच्या सयुंक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत चित्रपट रसिकांसाठी दर महिन्याला जागतिक व भारतीय भाषांतील अभिजात व कलात्मक चित्रपट दाखविण्यात येत आहेत. यावेळस सुप्रसिद्ध दिग्दर्शक ऑलिव्हर हर्षबिगल (जर्मनी) यांचा

'डाऊनफॉल' हा जर्मन भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. याचे सहकार्य लाभले.

जर्मनी म्हटल्यावर विसाव्या शतकातील अनेक ऐतिहासिक घडामोडींचा व हिटलरचा उल्लेख अनिवार्य आहे. ऑलिव्हर हर्षाबिल ह्यांच्या 'डाऊनफॉल' हिटलरच्या जीवनातील शेवटच्या दहा दिवसातील घटनांचा पट ट्रुडी युंग ह्या तरूण वैयक्तिक सहाय्यीकेच्या नजरेतून मांडतो. बर्लीनवर मित्रपक्षांच्या व रशियाच्या फौजांनी एप्रिल १९४५ मध्ये पूर्णपणे कब्जा केला आहे. व बंकरमध्ये हिटलर आपल्या जनरल जर्मन विजयाची ग्वाही देण्याचा केवीलपणा पण निकराचा प्रयत्न करतो आहे. एके काळचा सर्वशक्तीमान, जगज्जेता होऊ पाहणारा हिटलर केवीलवणा वाटू लागतो. अतिशय तटस्थपणे ह्या शेवटच्या दहा दिवसातील हिटलरचे आयुष्य व त्याचा आत्महत्येत झालेला शेवट दिग्दर्शकाने टिपला आहे.

सत्य हे कल्पिताहून अद्भूत असते हा वस्तुपाठ म्हणजे 'डाऊनफॉल'. साठ वर्षानंतर एका ऐतिहासिक घटनेला चित्रपटातून साकार करण्याचे शिवधनुष्य दिग्दर्शकाने लिलया पेलले आहे. हिटलरचा उफाळून येणारा आशावाद व तितक्याच वेगाने येणारे निराशेचे आवेग ह्यांच्या हिंदोळ्यावर मंत्रमुग्ध करणारा अनुभव आहे. २००४ मध्ये प्रदर्शित झालेल्या या रंगीत चित्रपटाचा कालावधी १५० मिनिटांचा आहे.

- **'चित्रपट चावडी' विंटर लाईट - स्वीडिश भाषेतील चित्रपट, शनिवार, दि. २५/०१ /२०१४ :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व विश्वास को-ऑप. बँक. लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत चित्रपट रसिकांसाठी दर महिन्याला जागतिक व भारतीय भाषांतील अभिजात व कलात्मक चित्रपट दाखविण्यात येत आहेत. यावेळेस सुप्रसिध्द दिग्दर्शक इंगेमार बर्गनान (स्वीडन) यांचा 'विंटर लाईट' हा स्वीडिश भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ. एम. यांचे सहकार्य लाभले.

स्वीडिश सिनेमा व इंगेमान बर्गमना ह्या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ह्यांच्या साठ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी चित्रपट, रंगभूमी व टेलिव्हिजनसाठी दिग्दर्शक, लेखक, निर्माता म्हणून प्रचंड योगदान दिले आहे. त्यांच्या सिनेमावर त्यांच्या जडणघडणीचा (ऑटोबायोग्राफिकल) प्रभाव आहे. तसेच बहुतांश चित्रपट कौटुंबिक पार्श्वभूमीवरचे आहेत.

'विंटर लाईट' नावाप्रमाणे ऋतूंचे स्वीडिश असलेले महत्त्व अधोरेखित करतो. स्वीडनमधल्या छोटया खेडयात व काही तासांमध्ये घडणारे कथानक चर्चभोवती फिरते. चर्चचे पॅस्टर टोमास गावातील शिक्षिका मार्था व गावातील इतर पात्रांमध्ये घडते. चित्रपट चर्च, धर्म, देव व मानवी संवेदना ह्यांचा परस्पर संबंध मांडतो. बर्गमन आपल्या आयुष्यात पडणारे प्रश्न व त्यातून निर्माण होणारे त्यांचे तत्त्वज्ञान ह्यांचा एक कोलज उभा करतो. अत्यंत साध्या व सरळ टिपिकल बर्गमनशैलीचा हा चित्रपट म्हणजे एक वस्तुपाठच आहे. हा चित्रपट पाहिल्यावर बर्गमनविषयी एक अनामिक ओढ प्रेक्षकांच्या मनात निर्माण झाल्याशिवाय रहात नाही हेच 'चित्रपट चावडी' ह्या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. १९५३ मध्ये प्रदर्शित झालेल्या या कृष्णधवल चित्रपटाचा कालावधी ८१ मिनिटांचा आहे.

❑❑❑

# विभागीय केंद्र, लातूर
## कार्यवृत्त

- **गुरूवार दिनांक १ ऑगस्ट २०१३ अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त कार्यक्रम** :

  १ ऑगस्ट २०१३ रोजी तळागाळातील लोकांच्या दुःखाची कहानी सांगून आपल्या शाहीरीतून लोकांचे प्रबोधन करणारे थोर साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा' या मौलिक कादंबरीबद्दल विभागीय केंद्राच्या वतीने परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादात प्रा.ए.एस. गायकवाड, प्रकाश जोगदंड यांनी भाग घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे हे होते.

- **शुक्रवार दिनांक ९ ऑगस्ट २०१३ ऑगस्ट क्रांतिदिन** :

  आपल्या मातृभूमीला स्वातंत्र्य मिळाले म्हणून ज्या थोर देशभक्तांनी आपले बलिदान दिले त्या स्वातंत्र्यसैनिकांना विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

- **भारतीय स्वातंत्र्यदिन** :

  गुरूवार दि. १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्यदिननिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने भारतीय नागरिकांची शान व मान या दिवसाच्या निमित्ताने स्वातंत्र्यपूर्वी जन्मलेल्या जेष्ठ नागरिकांचे स्वातंत्र्यपूर्वीचे अनुभव कथनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

- **डॉ. नरेंद्र दाभोळकर यांना श्रध्दांजली** :

  दि. २० ऑगस्ट २०१३ रोजी थोर परिवर्तनवादी पुरोगामी विचाराचे महामानव, अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष कै. नरेंद्र दाभोळकर यांची २० ऑगस्ट रोजी क्रुर हत्या करण्यात आली. याबद्दल विभागीय केंद्राच्या वतीने व अंधश्रद्धा निर्मुलन समिती त्याचबरोबर इतर पुरोगामी विचाराच्या वेगवेगळ्या संघटनेच्या वतीने लातूर शहरात श्रध्दांजली आयोजित करण्यात आली. दाभोळकरवर जो भ्याड हल्ला झाला तो पशुपक्षांनाही लाजवणारा आहे. याप्रसंगी ॲड. किसनराव देशमुख अहमदपूर, प्रा. दत्ता सोमवंशी निलंगा, विभागीय केंद्राचे उस्मानाबाद जिल्हा संचालक प्राचार्य डॉ. रमेशराव दापके तसेच शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील, अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे प्रमुख माधवराव बावगे, प्राचार्य अनिरूध्द जाधव इ. मान्यवरांनी नरेंद्र दाभोळकरांना श्रध्दांजली अर्पण केली.

- **बुधवार दि. ९ सप्टेंबर २०१३ अहिल्याबाई होळकर यांची पुण्यतिथी** :

  आज भारतीय स्त्रीयावर होत असलेले अन्याय अत्याचार याबद्दल आजच्या माता भगिनीचा प्रश्न या विषयावर परिसंवाद ठेवण्यात आला होता. या परिसंवादात प्रा सौ. सरोजिनी कुलकर्णी, शिक्षीका सौद्य स्वामी इ. नी अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. याप्रसंगी प्रा. एस. बी. कुलकर्णी म्हणाल्या की, आता आपल्या देशाचे माता भागिनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राष्ट्रमाता जिजाऊ थोर राजनितीज्ञ अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी होणे किती गरजेचे आहे हा मुद्दा विशद केला.

- **मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०१३ मराठवाडा मुक्तिसंग्राम दिवस** :

  जवळजवळ दीडशे वर्ष मराठवाड्यावर निजामाचे राज्य होते. आपला मराठवाडा भारत स्वतंत्र होवूनही स्वतंत्र झाला नव्हता. हे निजामाचे वेगळे सरकार होते. मराठवाडा मुक्त व्हावे म्हणून ज्या थोर स्वातंत्र्यसैनिकांनी आपले प्राण दिले त्या महामानवास विभाग व केंद्राच्या

वतीने अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी थोर स्वातंत्र्यसेनानी गुरगप्पा खुमसे हे होते. या कार्यक्रमात एस.जी. भोसले, गोविंदराव लांडगे इ. नी मोलाचे मार्गदर्शन केले.

- **सोमवार दि. ३० सप्टेंबर २०१३ भूकंपग्रस्त जनतेचा काळा दिवस :**

३० सप्टेंबर. १९९३ रोजी लातूर व उस्मानाबाद जिल्ह्याची सीमा असलेल्या तरणा नदीच्या काठावर वसलेले किल्लारी, सास्तूर, मंगरूळ इ. गावचा परिसर एका क्षणात निसर्गकोपाने भूईसपाट झाला. हजारो माणसे प्राणास मुकली. आपले घरदार, संसार उध्वस्त झाले. यात विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांचा जन्मगाव भूंकपग्रस्त मंगरूळ असून या भूकंपात त्यांची जन्मदाती आई, भावजय, चुलता, काका, मामा वगैरे ५० च्या पुढे माणसे क्षणात जग सोडून गेले. या माताभगिनींना ३० सप्टेंबर २०१३ रोजी विभागीय केंद्राच्या वतीने श्रध्दांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

- **ज्येष्ठ नागरिक आनंदोत्सव :**

बुधवार दि. २ ऑक्टोबर २०१३ रोजी विभागीय केंद्राच्या वतीने ज्येष्ठ नागरिक आनंदोत्सव साजरा करण्यात आला. हा आनंदोत्सव यावर्षी मातोश्री वृध्दाश्रमत राहणाऱ्या वृध्दाचे अनुभव ऐकण्यात व सहवासात पार पडण्यात आला. या कार्यक्रमात पांडूरंग पंढरपूरकर या वयोवृध्द माणसाने उपस्थित असलेल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांना आपले अनुभव कथन केले. यादिवशी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती असल्यामुळे त्यांचे विचारही सभागृहाला ऐकवण्यात आले. याप्रसंगी प्रा. श्रीरंग कुर्ले म्हणाले की, आपला देश महात्मा गांधीच्या विचारांपासून दूर जात आहे. कारण आज आपण वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर भ्रष्टाचार, बलात्कार, खून, दरोडा इ. मनाला उब आणणाऱ्या बातम्या वाचतो. हे सर्व आपल्या देशाच्या उज्वल अशा संस्कृतीला लाजवणाऱ्या बाबी आहेत. याप्रसंगी हरिभाऊ जवळगे यांची भ्रष्टाचारविरोधात लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावरील तीन अंकी नाटकाचे सामुदायिक वाचन झाले.

- **रविवार दि. १३ ऑक्टोबर २०१३ :**

आजची विजयादशमी (दसरा) उत्सव व निसर्गात होत असलेला बदल यावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यात जाणकार वाचकांची एस.टी. भास्कर एस.बी. कांगावाला इ. नी मुलाखती घेतल्या.

- **सोमवार दि. ४ नोव्हेंबर २०१३ :**

''महागाईच्या उच्चांकातील दिपावली व आजच्या भाऊबीजेचे महत्त्व यावर चचासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात अनेकांनी आजच्या महागाईबद्दल चिंता व्यक्त केली. मागील काळात माणसाच्या गरजा फारच कमी होत्या आता त्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.

- **२५ नोव्हेंबर २०१३ स्व. यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी :**

आज स्व. यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी. यानिमित्त मराठवाड्यातील प्रख्यात वक्ते प्राचार्य डॉ. संजयजी वाघमारे हे प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते तर प्रा. व्ही. एन. इंगोले हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. वाघमारे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण साहेबांनी सर्व जातीपंथाच्या तळागावातील मुलामुलीच्या फीमाफीचा निर्णय घेतला नसता तर माझ्यासारखी सामान्य माणसे एका नामांकित कॉलेजच्या प्राचार्यपदापर्यंत पोहचू शकले नसते. चव्हाण साहेबांची

दृष्टी ही भविष्याचा विचार करणारी होती. म्हणूनच त्यांनी शेती, सहकार, शिक्षण, आरोग्य अशा मौलिक प्रश्नात लक्ष घालून या राज्याची सेवा केली. त्यांना स्वतः ला गरीबीचे चटके बसल्यामुळे त्यांच्या त्या जीवघेण्या परिस्थितीमुळे त्यांनी जीवनभर गरीबाच्या हिताचे राज्य केले. असे विचार प्राचार्य डॉ. एम. आर. पाटील यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी मागे झालेल्या कार्यक्रमाचा आढावा व पुढे घ्यावयाच्या कार्यक्रमाचे नियोजन केले. सर्वांचे आभार प्रा. एस.बी. गायकवाड यांनी मानले.

- **निराधार मुलामुलींचे आधारकेंद्र :**

विभागीय केंद्राचे उस्मानाबाद जिल्हाप्रमुख प्राचार्य दापके हे निराधार मुलामुलींचे निराधारकेंद्र चालवतात. त्या केंद्रात अनेक लोकापयोगी कार्यक्रम घेतले जातात. या मुलामुलींसाठी निराधार केंद्रामार्फत भव्य असा कार्यक्रम घेण्यात आला.

- **दिनांक १० डिसेंबर २०१३ :**

यादिवशी विभागीय केंद्राला सदैव सहकार्य करणारे लातूर येथील ज्येष्ठ चार्टर्ड अकौटंट मा.श्री. सुनिलजी कोचेटा यांचा विभागीय केंद्राच्या वतीने सत्कार करण्यात आला. सुनिल कोचेटा यांची केंद्रीय अर्थमंत्रालयाने चार्टर्ड अकौटंट प्रवर्गातून तज्ञ संचालक म्हणून ३ वर्षासाठी नियुक्ती केली. या त्यांच्या यशाबद्दल विभागीय केंद्राच्या वतीने हरिभाऊ जवळगे यांनी हृदयस्पर्शी सत्कार केला. याप्रसंगी शिवकुमार थळकरती, श्री. सी. एल. भंडारी, दिपकराव नवटक्के इ. मान्यवर उपस्थित होते.

- **दिनांक १२ डिसेंबर २०१३ लोकनेते शरदचंद्रजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम :**

लोकनेते शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेल्या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते खा.डॉ. जनार्दनजी वाघमारे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी खा.डॉ. जनार्दन वाघमारे म्हणाले, शरदचंद्र पवार साहेबांनी मला माझ्या जीवनात मोलाची संधी दिली. त्यांच्यामुळेच मी खासदारकीपर्यंत येवून पोहोचलो. पवार साहेब यांच्या जीवनावर त्यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन याप्रसंगी झाले. याप्रसंगी लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोकराव चिंचोले, प्राचार्य डॉ. शिवाजी माळी, लोकमतचे विभागीय प्रतिनिधी यादवराव व्यंकटराव पाटील इ. मान्यवर उपस्थित होते.

- **ख्रिस्मस २५ डिसेंबर २०१२ :**

विभागीय केंद्राच्या वतीने लातूर शहरातील ख्रिस्मस बांधवांना मनोमन शुभेच्छा देण्यात आल्या.

- **भारतीय प्रजासत्ताक दिन :**

२६ जानेवारी २०१४ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त आजच्या आपल्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे यश व अपयश याबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली.

- **३० जानेवारी २०१४ :**

बेवारस मुलामुलींना आधार देणारे चाईल्ड लाईन नावाचं उस्मानाबाद येथील आधारकेंद्र व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने विभागीय केंद्राचे उस्मानाबाद जिल्हाप्रमुख प्राचार्य डॉ. रमेशराव दापके आपले हे निराधार मुलामुलींचे केंद्र चालवतात. या आधारकेंद्रात बालकांना जनाधार दिला जातो जे मातापिता रस्त्यावर मुलांना टाकतात अशा मुलांना आधार देण्याचं काम हे केंद्र करते. त्या केंद्रात विभागीय केंद्र सदैव कार्यरत असते. आपल्या मुलामुलींना बेवारस टाकून दिल्याचे अनेक उदाहरणे पहावयास मिळतात. अशाच एका मुलास आधार देण्याचे काम हे केंद्र करते.

❑❑❑

# माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी
## कार्यवृत्त

**General**

1. During the period August 2013 to January 2014, IT training continued as per schedule.

**Training**

2. Between August 2013 to January 2014, we conducted the following courses
   - C-DAC Course = 08
   - MKCL Courses = 03
   - Special Courses = 08
3. Admission was continued for PG-DAC & DACA August 2013 batch.
4. PG-DAC and DACA course commenced on 27th August 2013 and will be concluding on 14th February 2014.
5. Diploma In JAVA Technology Course under BARTI (Dr. Babasaheb Ambedkar Research and Training Institute) commenced on 27th October 2013.
6. Final Examination for PG-DAC August 2013 batch was conducted between 8th January & 10th January 2013.
7. YCP's AIT announced Diwali and Christmas Vacation Batches for Kids. In Kids course we focused on Basic Computers and Multimedia Creations. Kids are very much encouraged by our ANIMATION sessions.
8. From January 2014, YCP is an Authorized Learning Centre (ALC) for MSCIT Course.

**INDUSTRIAL VISIT**

9. DACA August 2013 students visited MULTIVERSITY, Pune on 10th January 2014.

**FORTH-COMING EVENTS**

10. Arranging Mock Interview for PG DAC August 2013 students on 1st February 2014
11. Workshop will be arranged for DACA February 2014 batch on 18th & 20th February 2014.
12. Arranging send off for S.S.C. Students in Colaba BMC School & Waghe High School at Colaba for introducing MSCIT Course.
13. For standard 10th and 12th students we are announcing Special Batch for MSCIT.
14. For Standard 10th and 12th students we are announcing Special Summer Vacation batches for Basic Computers, Multimedia, Animation and Computerized Accounting in the month of March and April 2014.
15. Special Kids Course will start in the month of April 2014.
16. PG DAC and DACA course for February 2014 batch will commence on 24th February 2014. Admissions are in progress.
17. A Farewell function will be organized for DAC and DACA August 2013 batch on 2nd March 2014.
18. Centralized Common Placement Programme for PG DAC August 2013 will be starting from 07th February 2014.

**PICNIC**

19. A picnic was organized for DAC and DACA August 2013 courses at a local amusement park on 15th January 2014. After a strenuous training schedule the students relaxed and enjoyed the outing.

❑❑❑

# ! भावपूर्ण श्रद्धांजली !

# मा. प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील, संस्थापक विश्वस्त व माजी सरचिटणीस

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे विश्वस्त व माजी सरचिटणीस, मा. प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील यांचे रविवार दिनांक २३/०२/२०१४ वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले.

डॉ.पी.बी.पाटील यांचा जन्म १४ जानेवारी १९३२ साली सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील मु. पो. चिकुर्डे येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण चिकुर्डे व इस्लामपूर येथे झाले व पदवी शिक्षण त्यांनी राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर येथून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी पुणे विद्यापीठातून सन १९५७ मध्ये राज्यशास्त्र व अर्थशास्त्र हे विषय घेऊन पदव्युत्तर (एम.ए.) शिक्षण पूर्ण करुन मौनी विद्यापीठामध्ये प्राध्यापक म्हणून काम करण्यास सुरुवात केली.

सन १९६० - ६१ मध्ये त्यांनी यू.के. मधील युनिव्हर्सिटी ऑफ लंडन येथे कम्युनिटी डेव्हलपमेंट अॅन्ड एक्सटेन्शन या विषयातून पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला. डॉ. पाटील हे विद्यार्थी दशेपासूनच सेवा दलाच्या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेऊन त्या विभागातील भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना मदत पोहोचविण्याचे जोखमीचे काम करत असत. हे काम करीत असतांना त्यांनी समाजवादाचे त्याचप्रमाणे राष्ट्रीय चळवळीचे पहिले धडे घेतले. याच जाणीवेतून त्यांनी सन १९५२ साली आचार्य जावडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गरीब विद्यार्थ्यांसाठी इस्लामपूर, जिल्हा सांगली येथे आश्रम सुरू केला. या विभागातील ग्रामीण भागातील युवकांना दर्जेदार शिक्षण प्राप्त करुन देण्यासाठी प्राचार्य पी.बी. पाटील यांनी आचार्य जावडेकर, बॅ. बाळासाहेब खर्डेकर, डॉ. जे.पी. नाईक, मा. यशवंतराव चव्हाण, मा. वसंतदादा पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, ले.जन. एस.पी.पी. थोरात अशा थोर विचारवंतांच्या तसेच समाजसुधरिणांच्या मार्गदर्शनाखाली सन १९५८ मध्ये सांगली येथे नवभारत शिक्षण मंडळ या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. या माध्यमातून त्यांनी सांगलीत शांतिनिकेतन शैक्षणिक संकुल उभे केले. राज्यभरातून तसेच कर्नाटकाच्या सीमा भागातून गरीब विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात. आज या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सांगली व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शाळा, कॉलेजचा विस्तार केला आहे.

पाटील यांनी सन १९७५ मध्ये महाराष्ट्र विधान सभेच्या सांगली मतदार संघातून निर्णायक आघाडी घेऊन कॉंग्रेस पक्षामार्फत निवडणुक जिंकली. सन १९७२ ते १९७८ मध्ये ते महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस होते. तसेच ते सन १९९० पर्यंत ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे सदस्य होते. प्रा. पी. बी. पाटील यांनी महाराष्ट्र राज्याच्या पंचायत राज मूल्यमापन समितीचे अध्यक्ष म्हणून केलेले काम ऐतिहासिक स्वरुपाचे ठरले आहे. कारण महाराष्ट्र शासनाने अलीकडे लोकसहभागातून ग्रामविकासाच्या ज्या योजना आणल्या आहेत त्याची मुळे पी.बी.पाटील यांच्या पंचायत राज अहवालात आहेत.

याच दरम्यान मा. यशवंतराव चव्हाण यांचे सन १९८४ मध्ये निधन झाल्यानंतर आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यांच्या विचारांचा वारसा पुढे चालू रहावा म्हणून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई या संस्थेची स्थापना करण्यामध्ये प्रारंभापासून प्रा.पी.बी. पाटील यांचा सहभाग होता. प्रतिष्ठानचे पहिले सरचिटणीस म्हणून प्रा.पी.बी.पाटील यांनी १९८५ ते १९९२ या कालावधीत निष्ठेने व कल्पकतेने काम केले. त्या काळात संपूर्ण महाराष्ट्रभर प्रतिष्ठानमार्फत परिसंवाद, चर्चासत्रे, शिबीरे आयोजित करुन तरुण युवकांना व युवतीना एकत्र एकाच व्यासपीठावर आणण्याचे काम त्यांनी केले. तसेच प्रतिष्ठानमध्ये नवमहाराष्ट्र युवा आंदोलन, महाराष्ट्र युवा आंदोलन, महाराष्ट्र महिला व्यासपीठ या विभागांची निर्मिती केली. मा.प्रा.पी.बी.पाटील यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या स्थापनेसाठी तसेच केंद्र इमारतीसाठी अपार कष्ट केलेले आहेत. त्यांच्या कार्यकौशल्याने त्यांनी प्रतिष्ठानला नावलौकिक मिळवून दिला.

डॉ.पाटील यांना विविध स्तरावरील अनेक नामांकित पुरस्कारानी सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यापैकी शिवाजी लोकविद्यापीठ, अमरावतीची सन्माननीय डी. लिट पदवी, इंडियन मर्चंटस् चेंबर्सच्या वतीने प्लेटिनम ज्युबिली एंडोमंट ट्रस्ट अवार्ड, स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर सामाजिक पुरस्कार, फाय फाऊंडेशन पुरस्कार, आबासाहेब वीर सामाजिक पुरस्कार, राजर्षी शाहू पुरस्कार, भाई चंदेले ट्रस्ट, सोलापूरच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार, सांगली भूषण पुरस्कार आदींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. प्रा.पाटील यांची कालप्रदक्षिणा (काव्यसंग्रह), क्रांतीसागर (कादंबरी) समाज परिवर्तन (वैचारिक लेखसंग्रह), विचारधन : जन-गण-मन (३ खंड) इत्यादी पुस्तके प्रसिध्द आहेत.

प्रा.पी.बी. पाटील यांच्या निधनाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने एक कर्तृत्ववान् विश्वस्त व सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा खंदा समर्थक गमावला आहे. त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो ही प्रार्थना.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

❑❑❑

# MS-CIT का करावं?

- कंप्यूटरचा 'स्मार्ट' आणि सिरीअस यूझर होण्यासाठी
- आयटीत एक पाऊल पुढे राहण्यासाठी... करिअर घडविण्यासाठी...
- दैनंदिन व्यवहारात **MS-Office** आणि **Internet** चा आत्मविश्वासाने उपयोग
- कंप्यूटर क्षेत्रातील बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत अद्ययावत प्रशिक्षण
- कंप्यूटरमधील स्मार्ट कट्स आणि व्यावसायिक उपयोग



MKCL

९० लाख जिज्ञासूंनी अनुभवलेला परिपूर्ण कंप्यूटर कोर्स!

# MS-CIT

आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान

५वा मजला, यशवंतराव चव्हाण केंद्र, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग,
मंत्रालयाजवळ, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी क्र. २२८१७९७५ / २२०४३६१७ भ्रमणध्वनी क्र. ९७६९२५६३४३

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने :

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे - भाग १ - संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०२. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस-विधिमंडळ - भाग २ - संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट-वाय. बी. चव्हाण - खंड १ ते ४ - संपादन : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | १०.०० |
| ०५. | सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ०६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ०७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ०८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन - अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ०९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह - संपादन - दादासाहेब रूपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास - संपादन पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन - पी. बी. पाटील | १००.०० |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास - संशोधक /लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण - चरित्र - लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य - संपादन - राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाऊंटीफूल बनियन - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र - खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक - ना.धो. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई' बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य/फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम: वेचक-वेधक - डॉ वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्री रत्न सावित्रीबाई फुले - श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. | 'संवादिनी - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २८. | Appraising Schools - डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| २९. | 'शाळांचे प्रगतिपुस्तक' - डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| ३०. | Yashwantrao Chavan an Autobiogrephy | ३९५.०० |
| ३१. | यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र-कृष्णाकाठ | ३००.०० |
| ३२. | यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व आणि कर्तृत्व | ५००.०० |
| ३३. | शिक्षणव्रती - डॉ. कुमुद बन्सल | २००.०० |
| ३४. | कट्टा शिक्षणाचा - बसंती रॉय | २५०.०० |

# डि.व्ही.डि व व्हिडिओ कॅसेट्स

- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु.ल. देशपांडे यांचा जीवनपट
  वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शन - श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शन - विनय नेवाळकर
- 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मैं' माहीतीपट, दिग्दर्शक - जयप्रद देसाई
- 'जागर हा जाणीवांचा -----' लघुपट, दिग्दर्शक - चंद्रकांत कुलकर्णी
- यशवंतराव चव्हाण - बखर एका वादळाची - दिग्दर्शक - डॉ. जब्बार पटेल

# यशवंतराव चव्हाण – बखर एका वादळाची

आधुनिक, पुरोगामी महाराष्ट्राचे शिल्पकार.... महात्मा गांधी आणि पंडित नेहरु यांच्या ध्येय धोरणांचा एकनिष्ठ, खरा वारसदार... लोकशाही तत्वांचा खंदा पाठीराखा..... कार्यक्षम लोकाभिमुख राज्य म्हणून महाराष्ट्राचा लौकिक भारतभर नेणा-या आणि आपल्या कर्तृत्वानं जगाच्या पटावर भारताची राजनीती, राजकीय चातुर्य प्रस्थापित करणारा एक द्रष्टा, जाणता नेता... अशा यशवंतराव चव्हाण यांच्या रोमहर्षक आयुष्याचा नाट्यमय प्रवास अर्थात ''यशवंतराव चव्हाण – बखर एका वादळाची''!!!
महाराष्ट्र राज्य शासनाची प्रस्तुती आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची निर्मिती असलेला ''यशवंतराव चव्हाण – बखर एका वादळाची'' हा चित्रपट एस्सेल व्हिजनच्या सहयोगाने येत्या १४ मार्च रोजी संपूर्ण महाराष्ट्रात दाखल होतोय.

ही कथा आहे आधुनिक आणि पुरोगामी महाराष्ट्राच्या शिल्पकाराची!!
उत्कट देशाभिमान, प्रखर पुरोगामी विचार, नि:स्वार्थ लोकसेवा, सर्वजनमत, सामंजस्य, स्वच्छ प्रशासन आणि निष्कलंक चारित्र्य याच्या जोरावर कार्यक्षम लोकाभिमुख राज्य म्हणून महाराष्ट्राचा लौकिक भारतभर नेणाऱ्या आणि आपल्या कर्तृत्वानं भारताची राजनीती, राजकीय चातुर्य जागतिक पातळीवर प्रस्थापित करणाऱ्या एका जाणत्या नेत्याची.

कराड तालुक्यातील देवराष्ट्रे या लहानशा गावात एका गरीब कुटुंबात जन्मलेले यशवंतराव शालेय वयातच स्वातंत्र्य आंदोलनात सामील झाले.
महात्मा गांधी, आणि पंडित नेहरुंच्या विचारानेच हा देश आधुनिक आणि प्रगत होउ शकतो हे सत्य स्वीकारुन अखिल भारतीय कॉंग्रेसचा मन:पूर्वक स्वीकार केला आणि स्वत:च्या हिंमतीने, बुध्दिमत्तेने व कर्तृत्वाने राष्ट्रीय नेतृत्वाचे शिखर गाठण्याची किमया यशवंतराव चव्हाणांनी केली.

राज्य व देश यांच्या सरकारापुढे ज्वलंत परिस्थिती उभी रहावी आणि ती शमवण्याची जबाबदारी यशवंतराव यांनी पार पाडावी असे प्रसंग सतत घडत गेले. महाराष्ट्र मोठा व्हावा, हे तर त्यांचे स्वप्न होतेच. पण देश मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल, अशी विवेकी आणि विधायक भूमिका घेउन संसदीय सचिव ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, नंतर देशाचे संरक्षण मंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री अशा अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशवंतरावांनी लीलया पेलल्या. कृष्णाकाठी जन्मलेला महाराष्ट्राच्या घडणीतला अत्यंत महत्त्वाचा असा हा शिलेदार, कर्तृत्ववान मराठी नेता राष्ट्राच्या पंतप्रधान पदापर्यंत पोहोचू शकला नाही, याची खंत मराठी माणसाला आजवर कायम राहिली आहे.

अशा यशवंतराव चव्हाणांच्या वादळी, लक्षवेधक आणि रोमहर्षक आयुष्याच्या नाट्यमय प्रवासाचा आलेख म्हणजे ''यशवंतराव चव्हाण – बखर एका वादळाची.''

# यशवंतराव चव्हाण – बखर एका वादळाची

यशवंतराव चव्हाण या महान व्यक्तिमत्वाचा जीवनपट मांडत असताना महाराष्ट्राच्या राजकीय, समाजकारण, कला, साहित्य आणि सांस्कृतिक जडणघडणीचा संपूर्ण आलेख या महत्त्वाकांक्षी चित्रपटातून मांडण्याचे शिवधनुष्य ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी पेलले आहे. तर यशवंतरावांच्या वादळी आयुष्याचा पट केवळ अडीच तीन तासांच्या मर्यादित बसवणे हे पटकथालेखकांसाठी मोठे आव्हान होते.
हे आव्हान पेलले आहे,

ज्येष्ठ पत्रकार लेखक अरुण साधू यांनी. या चित्रपटाचे पटकथा आणि संवादलेखन केले आहे.
महाराष्ट्राचा हा लाडका नेता आपल्या अभिनयातून साकार करण्याची
किमया साधलीय अशोक लोखंडे यांनी.
तर वेणुताईच्या भूमिकेत रंग भरलेत लुब्ना सलीम या समांतर रंगभूमीवरील अभिनेत्रीने.
या शिवाय ओम भूतकर, वैशाली दाभाडे, मीना नाईक, रेखा कामत, सुप्रिया विनोद,
सतीश आळेकर, राहुल सोलापूरकर, यशपाल सारनाथ, बेंजामिन गिलानी यांच्या
अन्य भूमिका आहेत.

यांच्याबरोबरच या चित्रपटात प्रसिध्द अभिनेते नाना पाटेकर एक महत्वपूर्ण भूमिका साकारत आहेत.

महाराष्ट्राच्या निर्मिती काळात साहित्यातील उर्जितावस्था, लोकसंगीत,
लोककलांचे महत्त्व लक्षात घेउन संगीताची महत्त्वाची जबाबदारी आनंद मोडक यांनी
सांभाळली आहे. शाहिर अण्णाभाउ साठे, कवी विनायक करंदीकर, कुसुमाग्रज,
ना. धों. महानोर, विठाबाई चव्हाण यांच्या गाण्यांना आनंद मोडक यांनी संगीतसाज चढवला आहे.

तर रवींद्र साठे, शंकर महादेवन, रघुनंदन पणशीकर, आरती अंकलीकर,
श्रीकांत कुलकर्णी, आनंद शिंदे, नंदेश उमप, विभावरी आपटे, उर्मिला धनगर यांच्या
आवाजातील गीतांनी महाराष्ट्राच्या संपूर्ण कलासंस्कृतीचे दर्शन घडवले आहे.

**महाराष्ट्राच्या अत्यंत लाडक्या लोकनेत्याचे दर्शन येत्या १४ मार्च पासून संपूर्ण महाराष्ट्राला रुपेरी पडद्यावरुन घडणार आहे.**


आपल्या कणखर हाताने महाराष्ट्र घडवणारा जाणता नेता
UFO digital cinema
महाराष्ट्र शासन प्रस्तुत
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित
Essel Vision
यशवंतराव चव्हाण
बखर एका वादळाची
दिग्दर्शक जब्बार पटेल
14 मार्च
पासून संपूर्ण महाराष्ट्रात
मिडिया पार्टनर
वितरक एस्सेल